म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय कथा
दा क्र २४०६
IRBK-0102406
IRBK-0102406
IRBK-0102406

दा. क्र
२४०६.
कक्षा
८८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

19 JAN 1982

23 JUL 1990

( क्र. मा. प. )
५०००-४-८०

# काहीं म्हातारे

व

# एक म्हातारी

[illegible]

लेखक

विठ्ठलराव घाटे, एम्. ए., बी. टी., टी. डी.

IRBK-0102406

IRBK-0102406

स्वस्तिक पब्लिशिंग हाऊस मुंबई, ४

२३५८
२०/१२/

# कैफीयत

जगाकडे पहाण्याचे अनेक प्रकार आहेत. कुणी जग हें काढेचिराइताचा एक भला मोठा काढा आहे असें समजतात व कण्हत, कुंथत जन्मभर तो काढा घेत असतात. कुणी जगाला कॉडलिव्हर ऑईलची भली मोठी बाटली समजतात. रुचि अगदीं वाईट पण गुण मात्र उत्तम प्रकारचा. आल्या गेल्याला ही बाटली दाखवून, तिच्या गुणाचें रसभरित वर्णन करीत तोंड वांकडें करून हे लोक कॉडलिव्हर ऑईल घेत असतात.

कुणी जगाला अफाट असा दवाखाना समजतात, स्वतःच्या घराला त्यांतील एक वॉर्ड मानतात व स्वतःला या दवाखान्यांतील एक तहाहयात इन् डोअर पेशंट आणि बायकामुलांना आपल्या वार्डांतील नर्सेस व वॉर्डबॉइज् लेखतात. या रुग्णशय्याबहाद्दरांच्या चेहऱ्यांवर तुम्हांला कधीं हंसें दिसावयाचें नाहीं. नेहमीं कपाळाला आठ्या, नेहमीं तक्रारी व कुरकुर. रोगांचीं नांवें यांना पाठ असतात व असे दोन चार रोगी एकत्र आले म्हणजे त्यांच्या शिळोप्याच्या गप्पांचा विषय म्हणजे परस्परांना झालेले किंवा झालेत असे वाटणारे रोग ! त्यांच्यात स्पर्धाहि याच बाबतींत असते. एक म्हणतो, "माझें ब्लडप्रेशर सबंध महिनाभर डेंजर पॉइंटला आहे' तर दुसरा त्याला तुच्छतेनें झिडकारून म्हणतो, "अरे चल, गेल्या सहामाहींत माझें श्युगरचें परसेंटेज किती वाढलें आहे." एकजण फ्रुटसॉल्टचा आपल्यावर आतां कांहीं परिणाम होत नाहीं अशी शेखी मिरवितो, तर दुसरा क्रूशन सॉल्टची आपल्या बाबतींत कांहीं मात्रा चालत नाहीं असें जाहिर करून पहिल्याला गप्प करितो. स्वतः-खेरीज हे लोक फक्त डॉक्टरांना मात्र चर्चेचा विषय समजतात. एक म्हणतो मुंबईचे माझे सारे डॉक्टर संपले, तर दुसरा डॉक्टरांच्या जोडीला वैद्यांचा तांडा आणून बसवितो. फलाणा डॉक्टर ऑपरेशन करितांना चिरूट कसा ओढतो, दुसरा डॉक्टर दोन ऑपरेशनच्या दरम्यान कसा शांतपणें ऑपरेशन-

रूममध्यें चहा पितो, तिसरा डॉक्टर ऑपरेशन करून तसाच स्टेशनचा रस्ता धरून हवा खाण्यास कसा जातो–हे या बहाद्दरांचे कौतुकाचे विषय असतात. रोग हें एक तंत्र व रोगी हे एका Esoteric circle चे सदस्य, असा यांचा विश्वास असतो.

जगाकडे पाहण्याचे आणखीहि कांहीं प्रकार आहेत.

कांहीं जणांना आपलें जीवित "अर्पित" (dedicated) आहे व जग ही आपल्या कार्याची एक प्रयोगभूमि आहे असें वाटतें. या लोकांना आपल्या अर्पित जीवनाची अहोरात्र जाणिव असते व आल्यागेल्याला ती जाणिव करून दिल्याखेरीज त्यांना चैन पडत नाहीं. यांचे चेहरे सुतक्यांसारखे गंभीर व उदास असतात. यांना विनोद येत नाहीं व समजत नाहीं. हे चार मंडळींत गेले कीं बैठकीचा रंग बिघडलाच म्हणून समजा. यांचा आपण जितका तिटकारा करावा तितके हे आपल्याला अधिक बिलगतात व आपल्या उद्धारासाठीं धडपड करितात.

कांहींजण 'कमलभक्षक' असतात. ते उमर खय्यामच्या संप्रदायांतले असतात. ते उद्यांला—भविष्यकाळाला जाणीत नाहींत. आलेल्या क्षणांतच ते मशगूल असतात. जग हा यांचा झेलम कांठचा गालिचा असतो; बायका-मुलें, आप्तेष्ट यांना सुखसोई पुरविणारे गुलाम असतात. यांच्या जेवणाच्या, चहाच्या वेळा बांधलेल्या. त्यांत चूक होतां कामा नये. बायको आजारी असली तरी यांची बडदास्त यथासांग झाली पाहिजे. यांच्या बायका बहुधा बाळंतरोगानें किंवा क्षयानें मरतात.

कांहीं लोकांच्या दृष्टीनें जग ही मोठी थोरली घसरगुंडी आहे. या घसर-गुंडीवरून हे लोक जन्मभर घसरत घसरत जात असतात. त्यांना क्षणभर एका ठिकाणीं थांबून, स्थिर राहून, स्वतःकडे व जगाकडे पाहण्यास संधि मिळत नाहीं हे प्रवाहपतित असतात व प्रवाहाबरोबर वाहून जातात!

आणखीहि जगाकडे पाहण्याचा एक प्रकार आहे. हा प्रकार या पुस्तकांत दाखविला आहे. मला स्वतःला माणसांचें वर्गीकरण करणें फारसें आवडत नाहीं. माणसांत इतरांहून वेगळें काय आहे हें पाहण्याकडे माझी दृष्टी असते. माझे म्हातारे माझ्या नजरेंत जर कशामुळें भरले असतील तर त्यांच्या व्यक्तिमहत्वामुळें—वेगळेपणामुळें. त्या सर्वांना शेजारीं शेजारीं उभें करून

मी विचार करूं लागलों, " हे मला कां आवडतात ? मीं वाङ्मय सोडून दिलें असतां परत या म्हाताऱ्यांनीं मला वाङ्मयक्षेत्रांत कां खेचून आणिलें ? "

माझें मन मला सांगूं लागलें, " तुला जसें आजवर जगतां आलें नाहीं, पण जसें जगण्याची तुझी तीव्र इच्छा होती, तसें हे म्हातारे जगत आहेत. त्यांच्या जीवनांत तुला नकळत तुझी इच्छापूर्ति ( Wish fulfilment ) झाली आहे. म्हणून परत तूं या भानगडींत पडलास. "

माझे हे म्हातारे थोडे चमत्कारिक आहेत. पहिली गोष्ट म्हणजे आपण म्हातारे झालों आहोंत हें अजून यांना माहित नाहीं. दुसऱ्या कोणीं तुम्ही म्हातारे झाले आहांत हें त्यांना सांगण्याची सोय नाहीं. मृत्यु जवळ येऊन ठेपला आहे, पण त्याची यांना दाद नाहीं. ते सर्व कामांत गुंतलेले आहेत. त्यांना स्वतःच्या स्वार्थाचा–सुखसोईचा–अगर दुसऱ्यांच्या कल्याणाचा विचार करण्यास फुरसत नाहीं. त्यांचा जीवनावर निस्सीम विश्वास आहे. ते सर्व कसल्यातरी कल्पनेच्या मागें – ध्येयाच्या मागें लागलेले आहेत. त्यांचें सर्व आयुष्य त्या कल्पनेला–ध्येयाला वाहिलेलें आहे. मात्र या आपल्या " अर्पित " आयुष्याची त्यांना जाणीव नाहीं व दुसऱ्या कोणीं ती त्यांना करून दिली तर ते त्याला बडगा दाखवतील. आपल्या आयुष्याचें विकलन ( analysis ) करून त्याची चिवडाचिवड करणें त्यांच्या प्रकृतीस मानवत नाहीं. ते आत्मलक्षी नाहींत व परलक्षीहि नाहींत. ते ध्येयलक्षी, कल्पनालक्षी आहेत.

गड्या वाचका, या म्हाताऱ्यांची लवकर ओळख करून घे. हीं कार्यांतलीं माणसें. त्यांना तिष्ठत उभें ठेवून भागायचें नाहीं. त्यांना कामें आहेत व त्यांच्या कामांवर जग जगत आहे.

दादर, मुंबई.
६ एप्रिल १९३९

वि. द. घाटे

# अनुक्रमणिका


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | एक प्रार्थनासमाजिस्ट | ९ |
| २ | आबासाहेब जहागिरदार | १३ |
| ३ | शंकरभैय्या बिनीवाले | १९ |
| ४ | एक कारकून | २६ |
| ५ | श्रीमंत सयाजीराव महाराज | ३१ |
| ६ | इंग्रज मुत्सद्दी–आर्थर बाल्फर | ३९ |
| ७ | एक इंग्रज व्यापारी | ४३ |
| ८ | एक जर्मन म्हातारा | ५१ |
| ९ | एक इतिहाससंशोधक | ५७ |
| १० | नाना न्हावी | ६२ |
| ११ | आमचे प्रोफेसर | ७२ |
| १२ | म्हाताऱ्यांचें गांव | ८१ |
| १३ | कविराज चंद्रशेखर | ८९ |
| १४ | आईचें मरण | ९७ |

# १
# एक प्रार्थनासमाजिस्ट

" काय विठ्ठलराव, केव्हां आलांत ? "

बुधवारांतून चाललों असतां वरील उद्गार माझ्या कानीं पडले. उद्गार कोणाचे होते ते तात्काळ ओळखून भक्तिभावानें मीं मागें पाहिलें.

माझ्यासमोर एक ऐशीं वर्षांचा म्हातारा उभा होता. डोकीला भांडारकरी पद्धतीचें पांढरें मळकट पागोट, अंगांत नुसताच कोट, त्याच्या खिशांत अंग पुसावयाचें खादीचें एक लहानसें फडकें, हातांत भला जाडा उंच सोटा, काना-नाकांतून केसांचे पुंजक्यांचे पुंजके ! डोळ्यांच्या कोंपऱ्यांतून व नाकांतून पाणी गळत होतें. डोळे ? डोळ्यांत तेज नव्हतें, जीव नव्हता, भावना नव्हत्या; दोन निर्जीव कांचेच्या तुकड्यांप्रमाणें ते मजकडे पहात होते; पण ओंठ मात्र हासत होते--सजीव होते.

म्हातारबुवा काठीच्या मदतीनें एक एक पाय कष्टानें उचलीत चालले होते. बुवा पुढें म्हणाले, " काय, काय खबर नगरची ? ऑल राइट ? आमचा गंप्या कसा काय आहे ? चांगला चालत असेल गुलाम आतां ! समाज ठीक चालला आहे ना ? रविवारची सर्व्हिस कधीं चुकत नाहीं ना ? छान, व्हेरि गुड. थँक्स ! ( बुवांना विनाकारण थँक्स म्हणण्याची संवय होती. ) बरें चला आतां आमच्या घरीं.

जवळच आहे. चला तुम्हांला आमची गॅरेट दाखवितों. टाइम आहे ना ? आम्ही काय ओल्ड फोक, उद्योग ना धंदा ! ह्यं ! हं ! हं !"

मीं बुवांचा हात धरला. घर जवळच होतें; परंतु तेथपर्यंत जाण्यास आम्हांला दहा बारा मिनिटें लागलीं.

आम्हीं घराच्या अंधेऱ्या जिन्यानें वर चढूं लागलों. खालीं एक मुलगी उभी होती. म्हातारबुवा तिला म्हणाले, " बगे, जा बरें. चांगला छान दोन कप चहा करून आण. नाइस् गर्ल्. अहो, नाहीं म्हणूं नका. तुमच्यामुळें आम्हांलाहि मिळेल. ह्य : ! ह्य : ह्य : !"

आम्ही वर एका लहानशा खोलींत गेलों. सामानसुमान फारसें नव्हतें. एक सतरंजी, तिच्यावर गादीची वळकटी; जवळच प्रार्थना-संगीत पडलें होतें. वर भिंतीला राजा राममोहनराय, न्यायमूर्ती रानडे आणि सर रामकृष्ण भांडारकर यांचीं चित्रें होतीं. खोलींत येतांच बुवांनीं या त्रिमूर्तीला प्रणाम केला. काठी खालीं टाकली, भिंतीला टेंकले व घसरत खालीं बसले. दोन मिनटें बोलवेना. खिशांतील खादीच्या रुमालानें डोळे व नाक पुसून बुवा म्हणाले, " समाजाचें ठीक चाललें आहे म्हणतां ? व्हेरी गुड—व्हेरी गुड, थँक्स. रविवार चुकतां कामा नाहीं बरें ! आतांच सर्व्हिसचें जमणार नाहीं; होईल संवय हळु हळु. प्रार्थनासंगीत उघडावें, एकदोन तुकोबाचे अभंग म्हणावे, प्रेअर करावी, आरती म्हणावी. पुष्कळ झालें. कोणची आरती म्हणतां नेहमीं ? ' शरण मी जगन्नाथा 'च म्हणत जा. फार पॅथेटिक !"

नात चहा घेऊन आली. मी चहा घेऊं लागलों. म्हातारबुवांनीं कांपऱ्या हातानें चहा बशींत ओतला. बशी ओठाजवळ आली.

इतक्यांत ओठावर तें सात्विक बालहास्य चमकलें. बशी थांबली. बुवा म्हणाले, " समाज–समाजाच्या कार्यांत खंड पडतां कामा नये. माधवरावजी गेले. दादा ( डॉ. भांडारकर ) गेले. पूर्वींचें लाइफ आतां राहिलें नाहीं; पण समोर खंदकांत प्रेतें पडलीं तरी सोल्जरनें पुढें झालेंच पाहिजे. A Soldier must fight; must fight. मंदिरांत चार पांच माणसें येतात, कधीं कधीं तर मी एकटाच असतों. A Soldier must fight. दादांच्या मागें उपासनेंत खंड पडूं दिला नाहीं. तसाच रखडत पीठापर्यंत जातों, बसतों, प्रार्थना करतों. बोलणारा मी, ऐकणारा मीच! must fight! दरबारांत हजेरी दिलीच पाहिजे. ह्यः! ह्यः! ह्यः!"

मी चहा पिण्याची आठवण दिली. बशी रिकामी झाली. परत बुवा म्हणाले, " यंदां थाटानें उत्सव झाला पाहिजे. बरें का? तुमच्या समाजाला यंदां पन्नास वर्षें झालीं. स्थापनेच्या वेळीं उमियाशंकरांच्याबरोबर मी होतोंच खटपटीला. मुंबईला, अहमदाबादला उत्सवाचीं पत्रें पाठवा बरें. येऊं का मी? फार दिवसांपासून नगरला यावेंसें वाटतें. पण नेणार कोण! नेत असाल तर येईन बापडा. कौटुंबिक उपासना करीन. थोडाबहुत प्रोपोगांडा करीन. मेंबर्सच्या घरीं जाऊन त्यांच्या मुलीबाळींना भेटेन, त्यांच्या चुलीपाशीं प्रार्थना करीन. नेणार असाल तर आधीं कळवा. एंगेजमेंट करा म्हणजे इकडे कांहीं काम अंगावर घेणार नाहीं. बरें, तुम्हांला उशीर होत असेल. दोन मिनिटें थांबा. थोडी प्रेअर करूं, मग जा."

बुवांनीं डोळे झांकले. डोळ्यांतून पाणी वाहूं लागलें. कांपऱ्या खोल आवाजानें बुवांनीं तुकारामाचा एक अभंग म्हटला व लहानशी

प्रार्थना केली. प्रार्थनेच्या अखेर बुवा म्हणाले, " परमात्मन्, समाजाचें कार्य हातून घडण्यास आम्हाला इच्छा दे, शक्ति दे. तुझ्या नामाचा आमच्याकडून सर्वत्र प्रसार होऊं दे. शांतिः! शांतिः! शांतिः! " नंतर खोल अगदीं खोल अस्पष्ट तुटक स्वरांत 'तमसो मा ज्योतिर्गमय ' म्हणाले.

माझ्या डोळ्यांसमोरून त्या घाणेरड्या खोलींतील तो घाणेरडा म्हातारा नाहींसा झाला. हिमालय ओलांडून येणाऱ्या पहिल्या आर्यांचें सूर्याचें मंत्रोच्चारपूर्वक आवाहन मला ऐकूं येऊं लागलें. नैमिषारण्यांत गायिलेला सामवेद माझ्या कानीं पडला.

म्हातारबुवांना नमस्कार करून मी जिना उतरून खालीं आलों. बुवा दाराला धरून जिन्यावर उभे होते. फडक्यानें डोळे पुसून ते म्हणाले, " विठ्ठलराव, समाज—समाजाला विसरूं नका. "

मृत्यु आ वासून समोर उभा होता. तरी केवढा हा अदम्य आशावाद !

परवां मी परत पुण्याला गेलों. मंदिरांत बुवांची जागा रिकामी होती !

# २

# आबासाहेब जहागिरदार

गांवची पेठ ओलांडून मी डावीकडे वळलों—

समोर एक प्रचंड जुना पडका वाडा उभा होता. पडतांपडतां त्यानें आपलें अंग सावरून धरलें होतें व कसाबसा तो उभा होता. काळानें—भवितव्यतेनें—त्याच्यावर मर्मी प्रहार केले होते, ठिकठिकाणीं जखमा झाल्या होत्या, डोक छिन्नविच्छिन्न झालें होतें. एक हात गळून पडला होता, डोळे मिटत चालले होते. अशा वेळीं जमिनीवर अंग टाकण्यापूर्वी क्षणभर तोल सावरून, डोळ उघडून तो मजकडे संतापानें व दु:खानें पहात होता.

वाडा चार चौकी होता. परंतु मागचे जनान्यासाठीं बांधलेले दोन चौक केव्हांच ढासळून पडले होते. माती—दगड—विटांच्या राशीवर गांवचा उकिरडा उभारला गेला होता. ज्या भागांत पडक्या भिंतीचा थोडा बहुत आसरा होता त्याचा प्रातर्विधीकडे उपयोग होत होता. तेथें गांवचीं डुकरें लोळत पडलीं होतीं. वाड्याच्या दुसऱ्या मजल्यानें सवाई माधवरावाप्रमाणें खालील चौकांत उडी मारली होती. फक्त प्रवेशद्वारावरील एक दालन शाबूत होतें.

प्रवेशद्वार घोड्यावरून आंत जाण्याइतकें उंच होतें. दरवाजांना ठिकठिकाणीं अणकुचीदार खिळे ठोकलेले होते. परंतु एक दरवाजा नाहींसा झाला होता व दुसरा झुकला होता. दाराबाहेरील चबुतरा

छानदार काळ्या घोटिव दगडाचा होता. त्यावर एक ८५ वर्षांचे म्हातोरेबुवा उभे होते.

तें एक हृदयस्पर्शी चित्र होतें. अनंत असें निळसर आकाश; त्याच्या पार्श्वभूमीवर तो प्रचंड पडका वाडा; त्या वाड्याच्या—त्या झुकलेल्या वाड्याच्या—पार्श्वभूमीवर तो ८५ वर्षांचा ताठ उभा असलेला म्हातारा !

म्हातारबुवांनीं शिंदेशाही जुनें पागोटें घातलें होतें. अंगावर एक नुसतें फाटकें उपरणें होतें. नेसतें धोतर पंचेवजा होतें. बुवांचें कप-ड्यांचें दारिद्र्य कपाळावरील भव्य त्रिपुंडानें व भरगच्च गलमिशांनीं भरून काढलें होतें. बुवांच्या भुवयांमध्यें शेंदूर शोभत होता. मला पहातांच लवून मुजरा करून बुवा म्हणाले, " यांवत यांवत, रावसाहेब. उशीर झाला, तेव्हां मला वाटलं शाळा पाहून तसेच फिरलां जणूं. आमचा जुना दस्तुर आहे. कोणी अमलदार आला तर रायाजी पाटलांच्या वाड्यांत त्याचे हात ओले झालेच पाहिजेत. चला वर, बिछायत घातली आहे. वाइच आराम करा. भाऊसाहेब, इकडे या असे. साहेबांना मुजरा करा."

एक आठ वर्षांचें पोरगें माझ्यासमोर आलें. त्यानें सणासुदीसाठीं जपून ठेवलेला लालभडक अंगरखा घातला होता. डोकीला टिकल्यांची टोपी होती. खालीं लंगोटीच होती. या लंगोटीवाल्या 'भाऊसाहेबांनीं' मला लवून मुजरा केला.

म्हातारबुवांनीं मला दर्शनी चौकांत नेलें. हजार पांचशें माणसें बसतील इतका मोठा चौक होता. चौकाभोंवतालच्या भिंतींत दगडी रांझण काढलेले होते व दोन-तिनशें घोडा ठाणबंद करण्याची सोय

केली होती. आज मात्र त्या विस्तीर्ण चौकांत एकच घोडें ठाणावर दिसलें. घोड्याजवळ जाऊन त्याला प्रेमानें थोपटून म्हातारबुवा म्हणाले, "साहेब, हा आमचा खंड्या. भारी चलाख जनावर आहे बघा. हें आमचें शेवटचें वैभव. अर्धपोटीं राहतों पण खंड्याला कमी पडूं देत नाहीं. बसतां का आपण थोडें?" खेड्यांतील घोड्यांच्या खोडी मला अनुभवानें ठाऊक होत्या. नवीन अनुभव मिळविण्याची माझी इच्छा नव्हती, मी म्हणालों, "छे, आतां नको. पण काय हो आबासाहेब, आतां खंड्यावर कोण—तुमचे भाऊसाहेब बसत असतील? तुम्हाला काय तो दाद देतोय?" बुवा अभिमानानें म्हणाले, तें कां? साहेब, जुनें खोड आहे. खंड्याच काय, दुसरी कोणाचीहि अवलाद आणा. सुतासारखें नरम करून देतों. तालुक्यांत मामलेदार प्रांतांकडे अझून मी खंड्यावर बसून जातों. तुमच्या आगगाड्या--मोटारींत मला भोंड येते बघा. खंड्यावर एक चक्कर घेऊन दाखवूं का?"

मी होय म्हणण्यापूर्वींच त्या ८५ वर्षांच्या म्हाताऱ्यानें खंड्याला सोडून बाहेर नेलें. धन्याचा हेतु हेरून खंड्याहि आनंदानें फुरफुर करून खुरानें जमीन उकरूं लागला. बुवा खोगीर चढवायच्या किंवा लगाम काढणी लावावयाच्या भानगडींत पडले नाहींत. मुंडासें जरा घट्ट करून उपरणें सावरून वीस पंचवीस वर्षांच्या बाप्याप्रमाणें फुरताईनें उघड्या पाठीवर त्यांनीं उडी मारली अन् 'रावसाहेब, बघा जरा गंमत' म्हणून खंड्याला टांच दिली. क्षणार्धांत तिरासारखा सर सर सर जावून खंड्या नाहींसा झाला! अंमळशानें बुवा परतले. खंड्या मोराप्रमाणें नाचत आला. त्याच्या मानेच्या बाकाचा असा

कांहीं नोकझोक होता कीं, कंबुग्रीव नायिकांनीं आपल्या माना खालीं लपवाव्या.

खंड्याला बांधून बुवांनीं मला वर नेलें. वरच्या बहुतेक भितींचा अधःपात होऊन तिन्हीं बाजूस उघडीं ओकींबोकीं दालनें दिसत होतीं. फक्त दर्शनी दिवाणखाना शाबूत होता. त्याच्या भिंतीवरील वेलपत्त्या अझुन कायम होत्या व चौकटीच्या नक्षीदार लाकडी छतानेंहि बराच टिकाव धरला होता. दिवाणखान्याच्या मध्यभागीं एक जुनें पण स्वच्छ बसकर घातलें होतें, व गादीच्या वळकटीला उपरणें गुंडाळून तकिया तयार केला होता.

वर गेल्यावर आमच्या गप्पा सुरू झाल्या. बुवांनीं सयाजी पाटलांच्या, नाना फडणिसांच्या व रघुनाथराव दादांच्या किती तरी गोष्टी सांगितल्या. त्यांना वर्तमानकालाची—त्या पडक्या दारिद्र्याची जाणीव नव्हती. ते मराठेशाहींत वावरत होते; नाना फडणीसाबरोबर मनसुब करीत होते. कोपरगांवीं स्नानसंध्या करीत बसलेल्या दादासाहेबांची रायाजी पाटलाबरोबर राखण करीत होते. गंगथडी तट्टावर चेमली वलांडून जात होते; सवाई माधवरावांच्या जमान्यांत रंग खेळत होते. बोलतां बोलतां अंधार पडला. बुवा म्हणाले, "आतां उशिर झाला. मुक्काम करावा. थाळा इथेंच करून जा. भाऊसाहेब, खालीं मुदपाकांत वर्दी द्या. म्हणावें रावसाहेब थाळा इथेंच करतील. बरें का, तुम्हीं पण खालीं बघा कांहीं लागलें सवरलें तर."

मी कष्टानें हसूं आवरलें. मुदपाकखाना म्हणजे खालची एक अंधारी खोली होती व तिच्यांत बटकी, पोरी, सोवळेकरी वगैरे कोणी राबत नसून भाऊसाहेबांची आई व आजी या साधे बांड नसलेल्या

दोन बाया भाकरी भाजीत होत्या. जेवणाचा बेत साधाच होता. ऊन ऊन भाकरी आणि वाड्याला लागून वाहणाऱ्या गोदावरींतले मासे. कांदा अर्थात होताच. बुवा माझ्या शेजारीं बसले होते. भाऊसाहेबांनीं वाढण्याचें काम केलें.

जेवण झाल्यावर घासून पुसून स्वच्छ केलेलें नक्षीदार रुंद तस्त व पाणी घालण्याचा तोटीचा तांब्या भाऊसाहेबांनीं आणला व दंडावर फाटका पण स्वच्छ रुमाल घेऊन हात धुण्यास मला पाणी घातलें.

रात्रौ मी नाना फडणिसांचीं व रायाजी पाटलांचीं कित्येक खल-बतें झालीं असतील अशा त्या दिवाणखान्यांत झोंपलों. त्या रात्रींच्या स्वप्नांत अनेक मागच्या पुढच्या चित्रांची भेसळ झाली. शेजारच्या कोपरगांवीं स्नानसंध्या करीत बसलेला राघोबादादा न दिसतां अटके-पार गेलेला राघोभरारी दिसला; त्याच्या शेजारीं ८५ वर्षांचा एक म्हातारा खंड्याला थोपटतांना आढळला; हें चित्र पुसट होतें तोंच लालभडक कोट घातलेलें लंगोटी नेसलेलें एक पोर पंजाबांत पकोडे मकोडे खातांना मला दिसलें. त्याच्या मागोमाग उंच हवेलीवर बसलेले नाना फडणिस दिसले. त्यांच्या हातांचीं बोटें लांबच लांब होतीं व तीं सारखीं वाढत होतीं. ते बोटानें कांहीं दाखवतात इतक्यांत हवेली कोसळली व दिवाणखान्याच्या जागीं ओकींबोकीं दालनें दिसूं लागलीं व खालीं डुकरें लोळूं लागलीं. स्वप्नांच्या धावत्या चित्रपटांत भूत व वर्तमानकाळांच्या चित्रांची बेमालूम सांगड न जमतां तीं एकमेकांत मिसळून गेलीं.

सकाळीं चार वाजतां मी जात्याच्या घरघर आवाजानें जागा झालों. खालीं भाऊसाहेबांची आई दळण दळीत होती व अगदीं हलक्या व

गोड आवाजांत ओंव्या म्हणत होती. आवाजांत नितांत मृदुता व कातरता होती. त्या अंधारांत मंद स्वरानें जात्याच्या साथीनें ती कंगाल बाई मराठेशाहीचें अंत्यगीत गात होती ! कांहीं वेळानें त्या दोघी बाया अंधारांतच नदीवरून पाणी घेऊन आल्या. खानदानी घराणें ! उपास पडला तरी गोषा पाळलाच पाहिजे. या मराठमोळ्यांच्या बाया पाणी भरणें, धुणीं धुणें वगैरे कामें उत्तर रात्रीच्या अंधारांतच करणार. ठिगळें लावलेल्या फाटक्या बांडांत कष्टानें झांकलेली अब्रू सूर्यनारायणासहि दिसावयाची नाहीं. असूर्यंपश्या ! असूर्यंपश्या ! !

याप्रमाणें अर्धपोटीं राहून, घरांत भिंतीआड काबाडकष्ट करून, अर्ध्या अंधारांत अर्ध्या प्रकाशांत बाहेर भीत भीत वावरून व लोकांसमोर मराठमोळ्याचा अस्सल बाणा दाखवून, मान न लववितां, हात न पसरतां रात्रीं भूतकाळचीं पुसट स्वप्नें पहात, दिवसा रात्रींच्या स्वप्नांच्या वाशा नशांत झिंगलेलीं कितीतरी घराणीं अद्याप गोदा–कृष्णा–प्रवराकांठीं दृष्टीस पडतील. दोस्त हो, लवकर जाऊन त्यांचें दर्शन घ्या. कारण त्या त्या नदीचे कांठीं त्यांचे अंत्यविधि आज चालू आहेत !

तांबडें फुटलें. बुवांचा निरोप घेऊन मी वाट चालूं लागलों. पेठेंत वळण्यापूर्वीं मी मागें वळून पाहिलें. पडक्या वाड्याच्या चौथऱ्यावर तो पंचायशीं वर्षांचा म्हातारा ताठ उभा होता व खंड्या जोरजोरानें फुरफुरत होता.

मीं मनांत म्हटलें, “ ही मराठशाही तुटेल मोडेल पण वांकणार नाहीं. ”

# ३

# शंकरभैय्या बिनीवाले

शंकरभैय्या हे × × × दरबारचे पिढीजाद गवयी. थोरल्या महाराजांना गाण्याबजावण्याचा फार शोक. शंकरभैय्याचे वडील बाळाभैय्या यांची एखादी चीज ऐकल्याखेरीज महाराजांना झोंप येत नसे. बाळाभैय्यांचा दूर्गा राग फार तयार. दूर्गा म्हणतांना भैय्या असा रंग भरून देत कीं कांहीं विचारूं नका. अलिकडची ठुंबऱ्या कवालीची गायकी बिनीवाले घराण्यास वर्ज होती. कोणी कवाली छेडूं लागला कीं शंकरभैय्यांस सचैल स्नान करावेसें वाटे. रागांत भेसळ केलेलीहि भैय्यांना खपत नसे. ध्रुपदाच्या गायकीबद्दल बिनीवाल्यांची तारीफ जम्मू–काश्मीरपर्यंत वाजत होती.

शंकरभैया कडकडीत स्मार्त होते. त्यांच्या खानदानींत चार पिढ्यांपासून अग्निहोत्र होतें. बिनीवाल्यांच्या घरीं सकाळ–संध्याकाळ कधीं होम चुकला नाहीं. भैया सकाळीं ८-८॥ ला उठत. त्यांच्या घरांत अद्यापि चहाचा प्रवेश झाला नव्हता–व तीं हेंदरी चिनीचीं भांडींहि दिसत नव्हतीं. स्नानानंतर होम, देवपूजा आटोपून भैय्या बारा मास लोटाभर 'असली' दुधिया शांकरीचें प्राशन करीत. त्यांच्या देवघरांत 'खासा' पाटा–वरवंटा ठेवलेला असे. थंडाई तयार करण्याचें काम कुटुंबाकडे असे. दुसऱ्या कोणीं सुना–लेकींनीं तयार केलेली भंग भैय्यांना चालत नसे.

भंग झोंकल्यावर भैय्या आपल्या शागीर्दांना गाण्याची तालीम देत. ही मंडळी भैय्यांना फार भिऊन असे. ताल चुकला तर कधीं कधीं तोंडांत फाडकन् ठेऊन देत. शिष्यांचा खुराक तर आपला नेहमीं असायचाच. इतर जुन्या सज्जनांप्रमाणें भैया अश्लील वाङ्मयाचे निस्सीम भक्त होते. मुलांना व शागीर्दांना या वाङ्मयाचा रोज प्रसाद मिळेच, पण लेकीसुनांना सुद्धां 'रांडरू' किंवा यापेक्षां 'असली' संबोधनें ऐकावीं लागत. कुटुंब म्हातारें झालेलें पण त्यांचीहि मधून मधून पाळी येई. नातवंडें तर भैयासमोर उभीं राहतच नसत. एकानें अलिकडची फ्याशन म्हणून थोडा मोठासा संजाब ठेवला अन् तेल चोपडून शेंडी तुळतुळीत केली. भैय्यांनीं त्याला असा फोडून काढला कीं त्याला जन्मभर आठवण राहील. बेवकूब अवलाद !

टळटळीत दोन प्रहर झाल्यावर भैय्या उठत. नैवेद्य वैश्वदेव उरकून भोजनाला बसत. कुटुंब पंखा घेऊन डावीकडे उभें असे. भोजन उरकल्यावर तांबूल तोंडांत चघळीत स्वारी आपल्या प्रेमपात्राच्या घरीं दुपारीं वामकुक्षीसाठीं जाई. छपरपलंगावर पडून गालुशी जवळच्या मोगऱ्याच्या गजऱ्याचा वास घेत भैय्याजी तीन चार तास आराम करीत.

गुलाब मुसलमान धर्माची रामजानी होती. ती अप्रतिम सुंदर होती. असें म्हणतात कीं मस्तानीप्रमाणें तिचा खाल्लेला विडा बाहेरून दिसे. तिचा कंठहि अति मधुर, सरस्वतीवीण्याच्या गोड लकेरीसारखा होता. गुलाब आरंभीं भैय्यांची शागीर्द होती. प्रथम शिष्या, नंतर प्रेमपात्र हा नियम मशहूरच आहे. आपण बिनीवाल्यांची

रखेली आहोंत याचा गुलाबला फार अभिमान वाटत असे. ती भैय्यांशीं एकनिष्ठेनें वागली. भैय्याहि तिचें बरेंचसें ऐकत. भैय्यांच्या कुटुंबाला त्यांच्याकडून एकादी महत्त्वाची गोष्ट करून घ्यावयाची असली म्हणजे त्या गुलाबला मध्यस्थ करीत. भैय्यांचीं मुलें गुलाबनेंच वाढविलीं असें म्हटलें तरी चालेल. मुलें गुलाबला अम्मा म्हणत. घरीं कडकडीत शिस्त; उलट गुलाबला मुलांची भारी हौस. ती त्यांचें सोर कोडकौतुक पुरवी. भैय्यांच्या मोठ्या मुलाची मुलगी बगडी तर अम्माच्या जवळ अष्टोप्रहर असावयाची. गुलाब कोठें गाण्याला गेली तर बगडी बरोबर जाई. "तूं लाड करून माझीं सारीं पोरं बिघडवलींस" असें म्हणून भैय्यांचें कुटुंब गुलाबशीं प्रेमानें भांडे. गुलाब तितक्याच प्रेमानें 'तीं माझीं मुलें आहेत' म्हणून उत्तर देई. पार्वतीबाई शेजारणीपाजारणींपाशीं हमेशा गुलाबचे गोडवे गात.

भैय्यांचें दोघींवरहि प्रेम होतें. स्मार्त अग्निहोत्री ब्राह्मण पडल्यानें प्रेम व्यक्त करण्याचे त्यांचे मार्ग निराळे होते. एकजण त्यांची गृहिणी होती, मुलांची आई होती, देवधर्म कुलाचार आचरण्यांत सहधर्मचारिणी होती. दुसरी त्यांची प्रियकरणी होती, प्रेमकलाकुशल रंभा होती, गानकलेची अधिष्ठात्री होती. पहिली "प्रजायै गृहमेधिनः" या रघुंतील उक्तीप्रमाण प्रजोत्पत्तीस—पितृऋण फेडण्यास अवश्य होती; धर्मपरंपरा कुलपरंपरा चालू ठेवण्यास योग्य होती. पहिलीच्या कर्तव्यक्षेत्राचें अतिक्रमण होऊं नये म्हणून दुसरीस मुलें झालीं नाहींत. चिरयौवना उर्वशीच्या पाठीमागें मुलांचें लटांबर कोणी पाहिलें आहे ? गुलाब केवळ निर्मळ कलाविलास व रतिविलास यांतील लाडकी सहचरी होती.

भैय्यांचें गुलाबवर निस्सीम प्रेम असे. तथापि त्यांनीं तिच्या हातचें पाणीहि कधीं घेतलें नाहीं. त्यांचें तांब्या-फुलपात्र वेगळेंच ठेवलेलें असे. चार साडे--चारला उठून दोन गुळणे टाकून भैय्या थोडा वेळ विनोद-वार्ता करीत व मग डुलत डुलत घरीं येत. घरीं आल्यावर स्नान होई. पार्वतीआई परत सकाळच्याप्रमाणें लोटाभर भंग देत. ती झोंकून स्वारी बाहेर जाण्याची तयारी करी. कुटुंबानें भक्तिभावानें धुतलेलें गुलाबी छापेचें धोतर, अंगांत बाराबंदी, तिच्यावर तलम मलमलीची मुंडीछाट चुणीदार पेहरण, गळ्यांत जुईची माळ, कानांत हिंन्याचा फाया, तोंडांत त्रयोदश गुणी तांबूल व काखेस तलम उपरण्याचा शेला अशा थाटानें श्री मार्कंडेयाच्या दर्शनास जात.

हें स्थान स्वयंभू जागृत होतें. देवालयामागें छानदार बगीचा होता, सुंदर, स्वच्छ विहीर होती. विहिरीजवळ दगडी चौथरा असून त्यावर भैय्या व त्यांचा मित्रगण संध्याकाळचा वेळ घालवीत असे. मंडळी जेठा मारून तंबाखूचा बार ठोकून वर्तुळाकार बसत असे. 'अरे भाई, जमानाच असा बुरा आला,' 'आमचे वालीद,' 'आमचे उस्ताद' वगैरे शब्द संभाषणांत येत असत. सखारामभैय्या पखवाजी जुन्या जमान्यांतला. तळहाताला बत्ताशे बांधून बोल काढणारा, लखनौ देहलीपर्यंत नांव गाजवून आलेला म्हातारा गडी. भिंवयांत लालभडक शेंदूर, खालीं लांब लांब गालमिशा. हासणें टप्पेदार! पखवाजाच्या आघाडी ख्या ख्या ख्या एकदां सुरवात झाली कीं भोंवतालचा भाग दणाणून जाई. सखाराम भैय्याकडे भंग छनण्याचें काम असे. शंकरभैय्या, "अरे भाई, मी आतांच घेऊन आलों. जास्ती होईल उगीच" म्हणत म्हणत एक दोन फुलपात्रें

श्रीमार्कंडेयांचा प्रसाद ग्रहण करीत. मंडळीची संध्या विहिरीवरच होई. घरीं आल्यावर भैय्या अग्नीला हवन देत. अलिकडे वयोमाना-प्रमाणें भैय्या एकभुक्तच असत. पार्वतीबाई त्यांना प्यालाभर मसाल्याचें आटीव दूध आणून देत. पतिराज दुग्धपान करीत असतां कुटुंब दिवसभरची खबरबात सांगत असे. भैय्या हूं हूं करीत श्रवणकार्य करीत. संसारांतल्या गोष्टी, देणें घेणें यांचा याच वेळीं खल होई.

रात्रौ भैय्या स्वतःच गात बसत; यावेळीं त्यांना गानशास्त्रांतल्या अवघड कसरती करण्यास मौज वाटे. खर्ज्यांतल्या अवघड ताना घेतांना ब्रह्मानंद होई. खोलींत कोणासहि येण्याची परवानगी नसे. भैय्यांचे भगत त्यांचें खरें जिव्हाळ्याचें गाणें ऐकण्यास मिळावें म्हणून नकळत खोलीबाहेर उभे राहून ऐकत. भैय्यांना यावेळीं देहभान नसे. त्यांची चर्या बदललेली असे. किती रात्र झाली याची त्यांना जाणीव नसे. कधीं बारा, कधीं एकएक दोनदोन वाजेपर्यंत हा ब्रह्मानंद चाले. थकवा आल्यावर तंबोरा बाजूस ठेऊन भैय्या निद्राधीन होत.

हा बहुधा रोजचा कार्यक्रम. अलिकडे भैय्या मैफलींत गाण्याचें टाळीत. दरबारांत प्रसंगविशेषीं मुजऱ्यास जात तेव्हां एखाद दुसरी चीज गादीपुढें छेडीत तेवढेंच. गुलाबचें कोठें गाणें असलें व तिनें अधिक आग्रह केलाच तर बैठकीला हजर राहात; पण ती मनासारखी गात नाहीं असें वाटल्यास भर मैफलींत ‘लवंडी’ ‘कमजात,’ ‘उल्लूकी पठ्ठी’ अशा शेलक्या शिव्या देण्यास कमी करीत नसत.

भैय्यांचें आतां वय झालें होतें. अलिकडे नव्या नव्या गायक्या निघाल्या होत्या. अण्णा किर्लोस्कर नांवाच्या एका माणसानें तर

गाण्यांचीं नाटकें काढलीं. भैय्यांना शाकुंतल नाटक पाहाण्याचा व बाळ्या नाटेकराचें गाणें ऐकण्याचा पुष्कळांनीं आग्रह केला; पण भैय्या नाटकास गेले नाहींत. 'आमचे का आतां लावण्या ऐकण्याचे दिवस आहेत?' असें ते म्हणत. हें शरसंधान अर्थात सौभद्रावर होतें.

आणखी कांहीं वर्षें गेलीं. खाडिलकर नांवाच्या दुसऱ्या माणसानें मानापमान नांवाचें नाटक लिहून लावण्याची प्रथा मोडली; रंगभूमीवर गवई थाटाची गायकी आणली. नानाभैय्या पण पाहून आला. म्हातारा याहि नाटकास गेला नाहीं. लोकांनीं विचारलें, "भैय्या, किर्लोस्कराचीं नाटकें लावण्याचीं म्हणून पाहिलीं नाहींत. आतां काय हरकत होती?" शंकरभैय्या संतापानें म्हणाले, "शिंच्या, त्या लावण्या पत्करल्या पण ही खिचडी नको. खरी गायकी काय तुमच्या पेटीच्या सुरावर पांचदहा मिनिटें गावून सजणार आहे थोडीच. खरें गाणें मैफलीचें. तें काय रंगभूमीवर धकणार आहे? गाण्याची किंमत मात्र कमी होणार. असो. आमचा जमाना गेला. चालूं द्या तुमची नाटकें."

शंकरभैय्यांचे सहचर एकामागून एक गळून पडले. कुटुंब वारलें. गुलाबहि पाठोपाठ गेली. मधला मुलगा वारला. एका नातीचा नवरा गेला. सखाराम पखवाजी, साठ वर्षें बैठकींत साथ दिलेला साथीदार, मध्येंच साथ सोडून गेला, हैदरखां सरोदियाहि गेला. बाळकृष्णबुवा गेले. नाना भैय्या त्यांचा मुलगा. शंकर भैय्याच्या देखत त्याचे दांत पडले, दमा जडला.

भैय्यांनीं अलिकडे बाहेर जाणें सोडून दिलें आहे. सून दोन्ही वेळां भंग करून देते ती घेतात व खोलींत तंबोरा घेऊन बसतात. भैय्यांनीं

आतां ब्रह्मकर्महि सोडलें आहे. ‘ आहे नाना भैय्या. करील तो.’ असें समाधान मानतात. पार्वतीबाई, गुलाब, मुलें, देव–भैयांचे प्रेमाचे, धर्माचे, कर्तव्याचे धागे एकामागून एक तुटले गेले. आतां एकमेव गानकलेच्या आराधनेंत भैया जीवनाची दीर्घकालीन संध्याकाळ घालवीत आहेत.

आपण एक दिवशीं मरणार आहोंत व तो दिवसहि जवळजवळ आला आहे हें मात्र भैय्यांच्या ध्यानीं-मनीं नाहीं. परलोक, पुनर्जन्म, पापपुण्य वगैरे प्रश्नांवर चिंतन करण्याची त्यांना संवय नाहीं. गुलाब वारल्यावर अतोनात शोक झाला तेव्हां तंबोरा घेऊन त्यांनीं सारी रात्र गावून काढली व सारी रात्र विस्मरणानें एकच चीज छेडली जात होती. अलिकडे त्यांचें गाणें ऐकण्यास मनाई नाहीं. लांब लांबून लोक भैय्यांचीं ध्रपदें ऐकण्यास येतात. भैय्याहि गाण्याचा कंटाळा करीत नाहींत. पूर्वीच्या ताना आतां गळ्यांतून निघत नाहींत पण तपश्चर्या चालू आहे. इतर सहचऱ्या गेल्या पण या सहचरीचें प्रियाराधन अजून चालू आहे. भैय्यांचें उर्वरित आयुष्य म्हणजे एक सुंदर, स्वच्छ, गंभीर दूर्गा राग आहे.

# एक कारकून

बोलून चालून कारकून तो ! त्याच्या चरित्रांत तें विशेष काय असणार ? अंधाऱ्या रात्रीं भयाण अरण्यांत मुसळधार पावसांत भरधांव घोडा फेंकायला तो रजपूत राजपुत्र थोडाच होता ? सुंदर युवतीची एखाद्या खलापासून ऐन प्रसंगीं सुटका करायला तो काय कादंबरी-नायक होता ? तो जगाचा मार्ग सरळ, नाकासमोर दिसणाऱ्या वाटेनें चालणारा फक्त एक कारकून होता.

त्याला कोणी नव्हतें. मुगभाटांतल्या एका आडवळणी चाळींत तळमजल्यावरील एका असूर्यपश्या खोलींत त्यानें आपला संसार थाटला होता. खोलीच्या मध्यभागीं, जुनी ठिकठिकाणीं भोकें पडलेली बारा आणेवाली एक चटई होती. तिच्यावर कापूस बाहेर डोकावीत असलेल्या गादीची वळकटी भिंतीला लागून होती. गादीच्या त्या स्थितीला कदाचित् वळकटी असें म्हणतां आलें नसतें. कारण सकाळीं उठल्यावर पंत एका लाथेनें बिछाना भिंतीकडे झुगारीत तेव्हां यदृच्छेनें त्याचा जो आकार होईल तो खरा. रात्रीं भिंतीच्या बाजूनें एक लाथ पाठींत बसली म्हणजे ती गादी चटईवर उताणी होई. गादीवर जुन्या धोतराची चादर व जुन्या भल्या मोठ्या शब्दकोशाची उशी होती. चटईच्या आवतींभोंवतीं विड्यांचे तुकडे व जळक्या काड्या पसरल्या होत्या. कोपऱ्यांत टिनची एक ट्रंक उघडीच पडलेली होती. खुंटीवर

एकुलता एक कोट व त्याच्यावर मेणचटलेली टोपी होती. समोर भिंतीला एक जस्ती दिवा शोभत होता. एका कोपऱ्यांत बादली व कधीं न हात फिरला गेलेला तांब्या व दुसऱ्या कोपऱ्यांत एक टमरेल व फाटका दक्षिणी जोडा होता.

पंत गेल्या वीस वर्षें या ऐश्वर्याचा उपभोग घेत होते. या वीस वर्षांत त्यांच्या खोलींत गृहलक्ष्मीच्या कांकणाचा किंवा लहानग्या बाळाच्या रडण्याचा आवाज कोणी ऐकला नव्हता. या वीस वर्षांत कोणी शेजाऱ्यानें पंतांचा उंबरा ओलांडला नव्हता. चाळींतलीं व्रात्य पोरें पंतांच्या खोलीपर्यंत धिंगामस्ती करीत धांवत येत, पण खोली-जवळ येतांच गुपचुप खालीं मान घालून पुढें जात. पंत चाळीजवळ येतांच नळावरील बायकांचीं भांडणें थांबत व त्या एकमेकींकडे पाहात. पंत मात्र त्या घाबरलेल्या मुलांकडे किंवा गोंधळलेल्या बायांकड मान वळवून पाहात नसत.

रोज नियमानें खोलींत येणाऱ्या मांजराप्रमाणें पंतांचें आयुष्य नियमबद्ध झालें होतें. पंतांचा दिनक्रम अगदीं रेखीव, ठरलेला असे. सकाळीं उठल्यावर तोटीखालीं स्नान आटोपल्यावर बरोबर सात वाजतां पंत समोरच्या इराण्याच्या हॉटेलांत शिरत. नेहमींच्या एका कोपऱ्यांत छत्री ठेवून स्वारी खुर्चीवर बसे. खुर्चीचें तोंड नेहमींप्रमाणें भिंतीकडे नसल्यास आधीं ते तसें करीत. एका कपाच्यावर पंतांनीं दुसरा कप कधीं मागितला नाहीं. काकूंच्या खानावळींत साडेनवाच्या पहिल्या पंक्तीला पंत आपल्या नेहमींच्या पाटावर बसत. जेवण संपेपर्यंत त्यांची मान वर कधीं होत नसे. त्यांनीं कधींहि दह्याचीही जादा वाटी किंवा श्रीखंडाची बशी मागितली नाहीं.

पंतांची कचेरी कोटांत कुठेंशीशी होती. कचेरींत जाण्याचा रस्ता व रस्त्याची बाजू एकच. धोबीतलावाजवळच्या एका आंधळ्या भिकाऱ्याच्या हातावर नियमानें ते एक दिडकी ठेवीत असत. कचेरींत आपण बरे कीं आपलें काम बरें. तपकिरीची चिमटी घ्यायला पंत कधीं जागेवरचे उठले नाहींत. अकरा ते पांचपर्यंत पंतांचा टाक चुरूचुरू चालून त्यांतून तिरपीं कारकुनी बाण्याचीं अक्षरें निघत.

कचेरी सुटल्यावर चौपाटीवर एका ठराविक बांकावर समोरच्या चिवडेवाल्याकडे पहात पंत बसत. पाठ नेहमीं समुद्राकडे. हातांत नेहमीं पांढऱ्या रंगाची छत्री असावयाची, पण तिचा उपयोग ते काठीसारखा करीत. उन्हांत किंवा पावसांत छत्री उघडण्याचें स्मरण पंतांना क्वचितच होई, चालणें नेहमीं खालीं पाहून. चालतांना ओठ मधून मधून हालत; कधीं मधीं एखादा सुस्कारा बाहेर पडे. पण तो ऐकणार कोण ? संध्याकाळीं जेवण झाल्यावर पंत तडक बिऱ्हाडीं जात. दिवा लावण्याचा प्रसंग क्वचितच येई. एका लाथेसरशीं बिछाना घालून ते त्यावर पडून अंधारांतच वरच्या तुळईकडे पहात तासच्या तास घालवीत. अशींच आणखी वीस वर्षें गेलीं. पंतांचा दिनक्रम पूर्वींप्रमाणेंच चालला होता. जुन्या इराण्याचें दिवाळें निघाल्यामुळें व काकूस कैलासवास घडल्यामुळें जो बदल करावा लागला असेल तेवढाच. चाळीस वर्षांपूर्वीं होतें तसेंच टमरेल कोपऱ्यांत पडलेलें होतें. अन् पंत ? त्याच खोलींत राहात होते, त्याच कचेरींत काम करीत होते, त्याच रस्त्यानें जात व परत येत. रेकले जाऊन व्हिक्टोरिया आल्या; ट्रॅम्स झाल्या; त्यांचे घोडे जाऊन त्या तशाच धावूं लागल्या; दुसऱ्या बिनघोड्याच्या

गाड्या दिसूं लागल्या; पंत तेच पूर्वींचे पुराणपुरुष होते. पण आतां त्यांचें शरीर थकलें होतें. दम्याचा विकार जडला होता. रात्रभर खोकत बसावें लागे. परंतु पंतांनीं वैद्य डॉक्टर पाहिला नाहीं, शेजाऱ्या-पाजाऱ्यांचा सल्ला विचारला नाहीं. आतां चालतांना पाय कांपत व खांबाचा आश्रय घ्यावा लागे. कचेरींत आतां पूर्वींसारखें वळणदार अक्षर निघत नसे. हात कांपे, चुका होत. हेडक्लार्क खेंकसून म्हणे, पंत, तुम्हांला आतां म्हातारचळ झालाय्. काय हें अक्षर! परत ड्राफ्ट करा. त्या बेरजा पण चुकल्यात. बेअक्कल कुठचे!" पंत नाकाच्या टोंकावर असलेल्या चष्म्यांतून निर्विकारपणें हेडक्लार्क-साहेबांकडे पाहात व त्यांचें भाषण संपल्यावर शांतपणें कागद घेऊन आपल्या जागीं जात.

आजकाल लहान मुलांनीं आपल्या खोलींत यावें असें पंतांना वाटूं लागलें होतें. पण त्यांना कशी हांक मारावी, त्यांच्याशीं काय बोलावें हें माहीत नसल्यानें तें जमलें नाहीं. तरी पण अलीकडे एक उनाड शेंबडें पोर पंतांच्या खोलींत कधीं कधीं दिसे. पंत त्याच्याशीं न बोलतां पाठीवरून हात फिरवीत व त्याला दोन पेपरमिटच्या वड्या देत. शेजारच्या एक आजीबाईहि पंतांना दम्याची उबळी आली म्हणजे खोलींत येत. पंतांची पिकदाणी आजकाल कोणीतरी घेऊन जाऊन साफ करून आणून ठेवी. पंतांना हें कांहीं दिवसांनीं कळलें, पण त्यांनीं चौकशी केली नाहीं.

असेच दिवस चालले. दमा बळवला. रात्रीच्या रात्री जागरणें पडूं लागलीं. खोलीस थुंकीनें गटाराचें रूप येऊं लागलें. आतां तोटीवर जातांना त्यांना भिंतीचा आश्रय घ्यावा लागे. तें शेंबडें पोर

चहाचा कप आणून देई. आजीबाई घरगुती औषध देऊं लागल्या व पंत न बोलतां तें घेऊं लागले. कचेरीस जाणें बंद झालें. पंतांच्या खुर्चीवर नवा कारकून बसला, व काम पुढें चाललें.

एक दिवस उजाडला. शेजाऱ्यांना पंतांच्या खोकण्याचा आवाज ऐकूं आला नाहीं. आजीबाई बघण्यासाठीं आंत गेल्या. त्या चाळीस वर्षांच्या जुन्या गादीवर पंतांचें प्रेत पडलें होतें. जवळ बादली, टमरेल व ट्रंक होती. आजपर्यंत साथ दिलेल्या त्या मूक मित्रांचा पंतांनीं शेवटचा निरोप घेतला होता. आजीबाईंनीं लगबगीनें पुरुषमंडळीस बोलाविलें. पुढची तयारी चालली. पोलिस लोक आले, माल सरकार-जमा झाला. पंतांचें प्रेत गादीवरून काढल्यावर उशाचा शब्दकोश बाहेर पडला. एकजणानें तो उघडून सहज चाळला. त्याच्यांत एक सुंदर तरुणीचा फोटो होता ! फोटोला येत असलेला मधुर वास त्या घाणेरड्या खोलींत पसरला.

पंत कचेरीच्या रस्त्यानेंच सोनापुरास गेले. रस्त्यानें ट्रॅमगाड्या, मोटारी चालल्या होत्या; दुकानदार दुकानांत बसले होते; भय्येलोक दूध देऊन परतले होते. चाळींतील बाया भांडत होत्या व पोरें धिंगामस्ती करीत होतीं. अन् पंतांच्या ऐवजीं लागलेला नवा कारकून कचेरींत जाण्याची तयारी करीत होता.

# ५

# श्रीमंत सयाजीराव महाराज

"Grow old along with me."

—*Robbibin Ezra* ( Browning )

जगांत अनेक कलावंत आहेत. कोणी सुंदर शब्दांच्या साहाय्यानें काव्य निर्माण करतो; कोणी कॅन्व्हासवर कुंचल्यानें चित्र रंगवितो, कोणी दगड-माती घेऊन सुंदर पुतळे घडवितो. महाराजहि एक कलावंत आहेत, परंतु त्यांची कला, कलावस्तु, साधनें किती वेगळ्या प्रकारचीं आहेत! कवि एखादें खण्डकाव्य, महाकाव्य पांच, दहा, वीस वर्षें लिहील. मायकेल एंजिलोला सिस्तिन मादोना रंगविण्यास सात वर्षें लागलीं. व्हातिकानमधील जगप्रसिद्ध 'लगून' हा पुतळा किंवा लूव्ह म्युझियममधील सौन्दर्य व शरीरसौष्ठव यांची परमावधी अशी व्हीनस दमेलो घडण्यास पांच दहाच वर्षें लागलीं असतील. पण महाराज आपली कलावस्तु शाहत्तर वर्षें घडवीत आहेत, आणि ही घडण्याची क्रिया अद्यापि संपली नाहीं !

इच्छाशक्तीचा कुंचला हातीं घेऊन, सर्व क्षेत्रांतील विविध ज्ञानाचे विविध रंग वापरून महाराज आपलें जीवनचित्र रंगवीत आहेत. हें चित्र रंगवितांना कितीतरी निरनिराळे अनुभव आले असतील रंगाचें मिश्रण चुकलें असेल; कधीं पंचाहत्तर वर्षांच्या या दीर्घकालीन चित्रणामुळें कॅन्व्हास कांहीं ठिकाणीं विरळ झाला असेल, त्यानें

नीटपणें रंग घेतले नसतील; कधीं अपूर्णतेची निराशा व दुःख यांचे अनुभव आले असतील, डोळ्यांत एखाद दुसरा अश्रु उभा राहिला असेल, ओंठ घट्ट मिटले गेले असतील; परंतु कधींहि कुंचला हातांतून खालीं गळून पडला नाहीं, चित्रण थांबलें नाहीं! सर्व अनुभवांचा एकच परिणाम झाला. महाराजांनीं भडक रंग खिडकींतून बाहेर फेकून दिले. बारीक सारीक तपशील देऊन चित्रांत गर्दी करण्याच्या उच्च पद्धतीवरचा विश्वास उडाला. प्रमाणबद्धता व माफक थोडे फिके रंग या तत्त्वांवर चित्रण चालू राहिलें आहे.

एखादा मातीचा गोळा किंवा दगड हातीं घ्यावा त्याप्रमाणें स्वतःचें जीवन हातीं घेऊन तें घडवीत बसणें किती कठीण काम आहे! शिवाय इतर कलावंतांपेक्षां या राजचितार्‍याची आपल्या कलावस्तूकडे पाहाण्याची दृष्टि कितीतरी वेगळी आहे. 'जें रम्य तें बघुनियां मज वेड लागे, गाणें सवेंच मग होय मनांत जागें' या निर्हेतूक भावानें इतरांची कलाकृति होत असते, महाराज आपल्या कृतीकडे धर्मबुद्धीनें पाहतात. आपलें जीवन आपल्या मालकीची वस्तु नाहीं; ती देवाची देणगी आहे, असें ते म्हणतात. त्यांच्याच शब्दांत सांगावयाचें म्हणजे 'Life is a trust'. ही ठेव-ही देवाची देणगी सुरक्षित ठेवली पाहिजे व तिला सत्कारणीं लावलें पाहिजे असें त्यांचें मत आहे.

ही देवाची देणगी दीर्घकालपर्यंत टिकण्याकरितां, शरीराच्या व मनाच्या सुस्थितींत दीर्घकाल जगण्याकरितां महाराजांनीं आपलें आयुष्य नियमबद्ध केलें आहे, त्याला विलक्षण कडक शिस्त लावली आहे. काय खायचें, केव्हां खायचें व किती खायचें हें सर्व अन्न-

शास्त्राच्या आधारें ठरवून टाकलें आहे व त्यांत केव्हांहि अपवाद व्हायचा नाहीं. 'रेड मीट' प्रकृतिस अनिष्ट हें एकदां समजलें, कीं मग त्याला हात लावावयाचा नाहीं. खाण्याप्रमाणेंच झोप, व्यायाम, वाचन, करमणूक, काम—सारीं शिस्तीच्या सांच्यांत जखडून टाकलीं आहेत. स्वदेशीं असोत किंवा विलायतेंत असोत, महाराजांच्या ठरलेल्या जीवनक्रमांत फरक होत नाहीं. रोज स्नान करावयाचें हें ठरलें म्हणजे उतार वयांतहि भर थंडींत विलायतेंत रोजचें स्नान टळावयाचें नाहीं. दारूला स्पर्श व्हावयाचा नाहीं, सिगरेट–सिगारकडे हात जावयाचा नाहीं.

महाराजांनीं हा जीवनक्रम असा आंखला आहे कीं, सर्व कामें नियमित झालीं पाहिजेत व प्रत्येक क्षणाकडून एखाद्या हाताखालच्या अम्मलदाराप्रमाणें काम वसूल झालें पाहिजे. दैनिक वर्तमानपत्रें ऐकण्याची योजना, वेळ फुकट जाऊं नये म्हणून, दैनिक स्मश्रूच्या प्रसंगीं केली आहे. फिरणें व व्यायाम ते एकाच वेळीं साधतात.

दीर्घश्वास घेणें, छाती फुगविणें, हात विवक्षित स्थितींत ठेवणें, दृष्टि समोर स्थिर ठेवणें हे व्यायामाचे प्रकार रोज फिरतांना अगदीं धर्मभावनेनें चालू असतात. फिरण्याच्या वेळीं फिरणें, कामाच्या वेळीं काम, असा महाराजांचा कटाक्ष असे. फिरतांना कचेरींतील कामाच्या गोष्टी काढावयाचे नाहींत, काढूं द्यावयाचे नाहींत. कामाच्या वेळीं विनोदवार्ता ऐकावयाचे नाहींत. फिरतांना किंवा जेवणाच्या वेळीं, सामान्य संभाषणामध्यें त्यांना विनोद आवडतो. विनोदाचें महत्त्व ते जाणून आहेत व हिंदी लोकांत विनोदवृत्ति नाहीं याबद्दल त्यांना खेद वाटतो. अधःपतित राष्ट्रांना विनोद येत नाहीं असें त्यांचें मत आहे—

कचेरीच्या कामाला खुर्चीवर बसले म्हणजे मात्र एकदम चर्या बदलते, वृत्ति एकाग्र होते. या प्रसंगीं त्यांना यत्किंचितहि गडबड किंवा आवाज खपत नाहीं. इतर कोणत्याहि विषयांचा उल्लेख–उच्चार–कामाचा नाहीं. गंभीरपणानें, धर्मबुद्धीनें कचेरीचें काम चालतें. सकाळीं फिरतांना काव्यशास्त्रविनोदांत आनंद मानणारे हेच का ते महाराज अशी अजाणत्या माणसास शंका य़ावयाची.

दीर्घकाल जगण्याची ही महत्त्वाकांक्षा निर्हेतुक नाहीं. टेनिसनच्या 'कमलभक्षकां' प्रमाणें तंद्रेंत व सुखोपभोगांत महाराजांना दीर्घकालीन जीवन घालवावयाचें नाहीं. सुंदर ओजस्वी जीवन हें महाराजांच्या हातांतील एक साधन आहे व तें ज्ञानार्जन व जनसेवा ह्या ध्येयांसाठीं महाराज अहर्निश व्यतित करीत आहेत. महाराजांची ज्ञानपिपासा दुर्दम्य आहे. वयाच्या सत्तराव्या वर्षीं एखाद्या तरुणाप्रमाणें ते वनस्पतिशास्त्र व जीवशास्त्र शिकले. फ्रेंच भाषेचा अभ्यासहि त्यांनीं एखाद्या विद्यार्थ्याप्रमाणें केला. परवां पुण्याहून भल्या पहांटेस उठून नगराला जावयाचें होतें. परंतु मध्यरात्रीपर्यंत महाराजांच्या वृक्ष-संवर्धनशास्त्रावरील ( Tree-planting ) अभ्यास चालू होता.

महाराजांचें वाचन सर्वव्यापी आहे. तथापि त्यांतल्या त्यांत नीतिशास्त्र, समाजशास्त्र, मानववंशशास्त्र, राजकारण व कारभार ( Administration ) हे महाराजांचे आवडते विषय आहेत. महाराजांना रीडर लागत नाहीं. ते स्वतः वाचतात व फार जलद वाचतात; जवळ टिप्पण वही, शब्दकोश असावयाचा, नवीन शब्द काढावयाचे, ते घोकावयाचे, वाचलेल्या पुस्तकावर टिप्पणें लिहावयाचीं याचा महाराजांना कधीं कंटाळा येत नाहीं. पुस्तक वाचून

झाल्यावर तें केव्हां व कोठें संपलें हें ते अवश्य नमूद करितात. याप्रमाणें रोज ४–५ तास वाचन चालतें. आजपर्यंत वाचलेल्या पुस्तकांच्या किती टिप्पणवह्या झाल्या असतील कोण जाणें !

पुस्तकाप्रमाणें थोर गृहस्थांच्या सहवासापासून व संभाषणापासून महाराज ज्ञानसंवर्धन करितात. लंचला, चहाला किंवा रात्रीच्या जेवणाला ग्रंथकार, कवि, शास्त्रवेत्ते, समाजसेवक कोणीतरी पंक्तीला असावयाचेच. त्याचप्रमाणें विलायतेंतील उपयुक्त अशा शिक्षणसंस्था, सामाजिक संस्था, करमणुकीच्या संस्था, वगैरे अनेक संस्थांना भेटी देऊन त्यांचें सूक्ष्म निरीक्षण करून त्या हिंदुस्थानांतील व विशेषत: स्वत:च्या संस्थानांतील परिस्थितीला अनुसरून कोणत्या स्वरूपांत सुरू करतां येतील इकडे महाराजांचें लक्ष असतें.

विशाल व प्रखर बुद्धि आणि तिला खाद्य म्हणून गेलीं पन्नास-पंचावन वर्षें केलेलें विविध स्वरूपाचें ज्ञानार्जन यांमुळें महाराजांच्या मनाची भूमिका कांहीं वेगळ्याच प्रकारची बनली आहे. त्यांची वृत्ती एकदेशीय, एकराष्ट्रीय, परंपरानिष्ठ न राहतां जागतिक, आंतर्राष्ट्रीय बनली आहे. धर्म, राष्ट्र, जात, परंपरा या बाबतींत ते शास्त्रज्ञानाप्रमाणें निर्विकार आहेत. भावनांच्या उत्कटतेच्या अभावानें या जागतिक वृत्तींत अधिकच भर घातली आहे. कोणताहि प्रश्न पुढें येवो, महाराज आधीं बुद्धीच्या तीक्ष्ण धारेनें त्याचे बारीक बारीक तुकडे करितात, त्याचे धागे-दोरे उकलतात, त्यांचें शांतपणें निरीक्षण करितात व मग त्या प्रश्नाविषयीं आपलें मत बनवितात. हिंदुधर्म, मराठी साम्राज्य या प्रकारांचे जिव्हाळ्याचे प्रश्न असेनात कां, महाराजांच्या विकलनात्मक बुद्धीची (Analytical genius) झडप त्यांच्यावर

पडली कीं त्यांचे तुकडे तुकडे बनतात ! 'मराठी साम्राज्य ?' जगांतील रोमन, मोगल इत्यादि साम्राज्य किती टिकलें ? त्याचे सांस्कृतिक व सामाजिक परिणाम काय ? हें अल्पायुषी कां झालें ? याप्रमाणें विकलनक्रिया चालू होते. धर्माच्या बाबतींतहि असेंच. त्यांचा सर्वांत आवडता विषय म्हणजे तुलनात्मक धर्म. सर्व धर्मांचें विकलन करून त्यांचे बारीक सारीक तुकडे सांच्याच्या एका एका कप्यांत बसवून, त्यांतील साम्य व भेद अजमावून, जीवशास्त्रज्ञ ज्याप्रमाणें टेबलावरील छिन्न विच्छिन्न बेडकाकडे निर्विकार चित्तानें पहातो त्याप्रमाणें बुद्धिजीवी महाराज धर्माकडे पाहतात व त्याचें वजन करितात.

महाराजांची विकलन बुद्धि गेल्या पन्नास वर्षें हिंदुधर्म व समाज या क्षेत्रांत अप्रतिहत वावरत आहे. तिच्या व्यवसायाचें फळ म्हणजे बडोद्याचे जगप्रसिद्ध सामाजिक व धार्मिक कायदे! गेलीं ४०-५० वर्षें बडोदें अखिल हिंदु समाजाच्याकरितां विचार करीत आहे. जे प्रश्न इतरत्र अद्यापि वादग्रस्त आहेत, अनिर्णित आहेत, ते बडोद्यानें केंव्हांच सोडवले आहेत—सोडवीत आहे. भारतास अस्पृश्यांची परवां आठवण झाली. बडोद्यानें अस्पृश्यांना पाव शतकापूर्वीं हातीं घेतलें. पटेल, गौर हे लग्नाच्या कायद्यांत सुधारणा करण्यास झटले पण त्यांना अल्प यश आलें; आज बडोदें बिनबोभाट पाटलाच्या चावडीवर लग्नें नोंदीत आहे. बालविवाहप्रतिबंध, घटस्फोट, पुरोहित वर्गाचा प्रश्न, हे बडोद्यास 'प्रश्न' उरले नाहींत.

सामाजिक कायद्यांच्या बाबतींत विरोध होतातच; पण महाराज आंकडेशास्त्रानें आपल्या विचारांची सत्यता जनतेस पटवितात, घटस्फोटाचा प्रश्न निघाला तेंव्हां असा एक मुद्दा निघाला कीं, ही

वहिवाट नाहीं. महाराजांनीं शांतपणें कमिटी नेमून शोध केला. घटस्फोट अनेक जातींत प्रत्यहीं होत आहेत असें आढळून आलें. महाराज समाजसुधारक असले तरी भावनांनीं प्रेरित झालेले नाहींत. बुद्धीला सुधारणा पटल्यावर मग ते विरोधास जुमानीत नाहींत.

याप्रमाणें आपल्या ज्ञानाचा व अनुभवाचा उपयोग महाराज जनसेवेकडे करीत आहेत. अलीकडे वय जास्ती झाल्यापासून तर त्यांना अधिक उद्योग व अधिक सेवा करावीशी वाटते. आपल्या दीर्घकालीन आयुष्यांत ज्या अनेक चुका झाल्या व त्यामुळें अनुभव आले त्यांचा उपयोग करून घेण्याची हीच वेळ आहे असें ते म्हणतात. आजवर ज्या ज्या चुका घडल्या असतील त्यांचें A book of mistakes आपल्यामागें ठेवून जावें असें कधीं कधीं महा-राजांना वाटतें !

वखत थोडा उरला आहे ! सराईतून कारवानास कूच करण्याची घडी आली आहे ! ठोकलेले तंबू एकामागून एक उखडून उंटावर लादले जात आहेत. पाण्याच्या कुप्या भरल्या गेल्या. सहचरांनीं प्रवासासाठीं कफ्तान सांवरले, कमरा कसल्या ! महाराज अद्यापि आपल्या तंबूंत बसले आहेत. डाव्या बाजूस मधुर खजूर व सुवासिक हुक्का आहे. उजव्या बाजूला अद्यापि कामाचे भारे आहेत.

महाराजांचा परलोकापेक्षां इहलोकावर अधिक विश्वास आहे, प्रेम आहे. जीवनरसाचा प्याला कांठोकांठ पिण्याची, त्यांत एकहि थेंब शिल्लक न ठेवण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा आहे. या रससेवनांत ते इतके मग्न झाले आहेत कीं परलोकाकडे—मरणाकडे वळून बघण्याची त्यांना फुरसत नाहीं. बापाचा मार चुकविण्याकरितां एखादें भित्रें

कामचुकार मूल घराच्या कोपऱ्यांत सांदीकोंदींत अंधारांत दडून बसतें, त्याप्रमाणें महाराज मरणास भिऊन जीवनाच्या कोंपऱ्यांत अडगळींत बसलेले नाहींत. ते जीवनाच्या बुलेवारवर (राजमार्गावर) पीआत्सा (चौका) मध्यें उघड्या माथ्यानें वावरत आहेत.

महाराज मरणास भीत नाहींत. त्याप्रमाणेंच त्यांच्या नांवानें बोटेंहि मोडीत नाहींत व त्याचा अपमानहि करीत नाहींत. ते विनीत आहेत, शिष्टाचारांचे भोक्ते आहेत. कचेरीचें काम चाललें आहे, निरनिराळ्या प्रकरणांवर महाराज हुकूम डिक्टेट करीत आहेत; अशा वेळीं खोलीच्या दारावर टिचकी वाजली तर कदाचित् वर न पाहतां महाराज 'Come in' म्हणतील. परंतु पाय न वाजवितां हळू, अगदीं हळू, मरणानें खोलींत प्रवेश केला तर महाराज तांतडीनें पगडी घालतील. खुर्चीवरून उठतील, जवळ जाऊन मरणाशीं हस्तांदोलन करतील, 'How do you do' म्हणून स्मित हास्य करतील, किंचित् मान लववितील व सभ्यपणानें 'मी कामांत गुंतलों आहें; आपल्याशीं बोलण्यास मला वेळ नाहीं; थोडे बसाल काय?' असें म्हणून परत स्मित करतील. डॉ. मोडकांनीं पाहुण्यास कोंपऱ्यांत खुर्ची दिल्यावर महाराज परत आपल्या कामांत मग्न होतील व सांगितलेलें अर्धें वाक्य पुरें करतील !

# ६

# इंग्रज मुत्सद्दी--आर्थर बाल्फर

( रोजनिशींतील उतारा )

**लंडन**—१९ मार्च १९३०. आज सकाळीं लॉर्ड बाल्फर ८२ वर्षांचे होऊन वारले. त्यांचें मरण त्यांच्या जीवितासारखेंच गंभीर व निर्विकारमय होतें. मृत्युशय्येजवळ बायकामुलें, आप्त इष्ट, मित्र शिष्य वगैरेंचा घोळका नव्हता. मरण्यापूर्वी बालब्रह्मचारी बाल्फरांनीं जेम्स कोल्मन या बत्तीस वर्षें इमानें इतबारें सेवा केलेल्या नोकरास जवळ बोलावलें व त्याचा हात आपल्या हातांत घेऊन ते शांतपणें म्हणाले, " Goodbye, James. Thank you very much for all that you did."

जेम्सनें मान फिरविली. बाल्फर सावकाश म्हणाले, " मी गेल्यावर खिडक्यांचे पडदे खालीं सोडूं नकोस. बरंय् जा तूं आतां."

जेम्सनें दुःखातिशयानें खोली सोडली, इकडे एका कुशीवर वळून बाल्फरांनीं शांतपणें प्राण सोडला.

" मी उद्यां परगांवीं जाणार आहें. कपडे बांध." असें मामुली नेहमीचें काम गड्यास सांगावें त्याप्रमाणें जेम्सचा मोजक्या शब्दांत निरोप घेऊन बाल्फरांनीं इहलोक सोडला.

एका जणानें त्यांच्या मृत्युलेखांत म्हटलें आहे, " If Asquith was the last of the Romans, Balfour was the last of

the Greeks!" खरोखरच देहानें व मनानें बाल्फर ग्रीक होते. उंच देहयष्टि, विशाल व सुंदर डोळे, देवगुरुनेंहि पूजा करावी असें कपाळ.

गॉल्फ त्यांनींच इंग्लंडांत लोकप्रिय केला. उघड्या मैदानांत खेळण्या फिरण्याची त्यांना फार आवड. खेळांच्या आवडीप्रमाणें बाल्फरची बुद्धिमत्ताहि ग्रीक होती. आरिस्टॉटलप्रमाणें ज्ञात जगाला तिनें गवसणी घातली. अन् आश्चर्य हें, कीं बाल्फर आरिस्टॉटलनंतर दोन हजार वर्षांनीं जन्माला आले होते. त्यांचें जग आरिस्टॉटलच्या जगापेक्षां किती तरी व्यापक, विविध, खोल होतें. या अफाट जगांतील विविध ज्ञानाला आत्मसात् करून, तें आपण आत्मसात् केलें आहे हेंहि विसरून जाऊन, बाल्फर जगाच्या गर्दीकडे न पाहतां, डावी उजवीकडे न वळतां सरळ पुढें चालले व साक्रेटिसनें जितक्या शांतपणें विष प्राशन केलें तितक्याच शांत वृत्तीनें या आधुनिक ग्रीक पुरुषानें जगाचा निरोप घेतला. बाल्फरांचें कर्तृत्व अफाट होतें. पन्नास वर्षें ते स्वराष्ट्राच्या पुढें उभे होते—अनिच्छेनें उभे होते व विविध स्वरूपाचें कार्य करीत होते. लंडन टाइम्सनें त्यांच्या मृत्युलेखांत एक सुंदर वाक्य लिहिलें आहे; "Nothing less than the whole life could have disclosed the whole man in him." बाल्फरांची विभूति इतकी महनीय होती कीं तिचें सर्वांगीण स्वरूप व्यक्त होण्यास ८२ वर्षें लागलीं.

बाल्फर सर्वतोपरी भाग्यशाली होते. सरदार घराण्यांतच जन्म, सेसिल या ऐतिहासिक खानदान वैभवसंपन्न व बुद्धिसंपन्न घराण्याशीं जवळचें नातें, गर्भश्रीमंती, अचाट बुद्धिमत्ता, सुंदर शरीर.

देवानें या पलीकडे मानवास काय द्यावें! बाल्फरांची बुद्धि विलक्षण चिकित्सक होती. कोणत्याहि प्रश्नाच्या दोन्ही बाजू त्यांना एकदम दिसत असत; कोणत्याहि प्रश्नावर ते समतोलबुद्धीनें बोलत. त्यांच्या भाषणांत अतिशयोक्ति नसे—उत्प्रेक्षा, उपमा नसत, लांबलचक वाक्यें नसत. त्यांची बुद्धि वादविषयक प्रश्नाचें पृथक्करण करूं लागली कीं शत्रु व मित्र सारख्याच आतुरतेनें व आवडीनें त्यांचीं भाषणें ऐकत. भाषणानंतर टाळ्यांचा गजर होई, मित्र अभिनंदन करीत; बाल्फरांना त्याची जाणीव नसे. खालीं बसतांच परत त्यांचे ओंठ घट्ट मिटले जात, परत ते विचारांत मग्न होत. पार्लमेंटमध्यें प्रतिपक्षाकडून प्रश्नांचा व उपप्रश्नांचा मारा होत असतां, बाल्फर लांब पाय पसरून डोळे मिटून बसलेले असत. त्यांच्या चेहऱ्यावर कोणताच विकार उमटलेला नसे.

बाल्फर कैक वर्षें एका महत्त्वाच्या पक्षाचे नेते होते. त्यांनीं परराष्ट्रीय राजकारण केलें, मुख्य प्रधानपदाचाहि उपभोग घेतला; तथापि ते समाजविन्मुख होते, एकांतप्रिय होते. ते राजयोगी होते. गॉल्फ किंवा टेनिस खेळतांनासुद्धां कदाचित् त्यांचें तत्त्वज्ञानविषयक चिंतन चालत असेल. राजदरबारीं लेव्हीला, राजकारणी मैफलीला किंवा भोजनप्रसंगीं दरबारी पोशाखानें भूषित झालेले बाल्फर तशा त्या कोलाहलामध्यें सुद्धां कदाचित् आत्मनात्मविचार करीत असतील.

बाल्फरांनीं ५० वर्षें आपल्या राष्ट्रास आपलें बुद्धिसर्वस्व ओंजळी भरभरून दिलें. हृदय मात्र स्वतःसाठीं जपून ठेवलें. जणूं काय देवानें त्यांना सुंदर आत्म्याची देणगी देतांना त्या आत्म्यास मित्रप्रेमाच्या किंवा शत्रुद्वेषाच्या शरवृष्टीची बाधा होऊं नये म्हणून जन्मतःच

त्याच्याभोंवतीं अभेद्य कवच चढविलें होतें. जणूं काय पुढें आपल्याला दोन पिढ्यांना तारुण्य, सौंदर्य व सौख्य यांच्या बरोबरच सत्य व शिव यांची शिकवणूक द्यावयाची आहे, हें जाणून बाल्फरांनीं आरंभापासून तें कवच प्रयत्नानें अधिकच अभेद्य केलें होतें. त्यांच्या हृदयमंदिरांत कोणाहि व्यक्तीस प्रवेश मिळाला नाहीं. प्रेम, सुखदु:ख, आशानिराशा, प्रत्यक्ष मरण, कोणाचाहि कवच फोडून आंत शिरकाव झाला नाहीं. बाल्फरांचा सुरक्षित आत्मा शेवटपर्यंत निर्विघ्नपणें आपलें कार्य करीत राहिला व शेवटीं मृत्यु-शेजेजवळ उभ्या असलेल्या नोकरालाहि खोलीबाहेर घालवून बालब्रह्मचारी बाल्फर एकांतांत विराम पावले. The Last of the Greeks! The Last of the Greeks!

# ७

# एक इंग्रज व्यापारी

" गुड्मॉर्निंग, मि. गाटे, वेलकम् टु लेचवर्थ. "

लेचवर्थच्या लहानग्या सुंदर स्टेशनवर उतरतांच वरील शब्द माझ्या कानीं पडले व ताबडतोब मि. विक्स यांनीं पुढें होऊन माझ्याशीं हस्तांदोलन केलें.

मि. विक्स हे एक चवऱ्यायशीं वर्षांचे इंग्रज गृहस्थ होते. लंडनला मी ज्या गृहस्थांकडे रहात होतों त्यांचे हे सासरे. यांचा पियानो तयार करण्याचा मोठा कारखाना असून रिजंट स्ट्रीटमध्यें पियानो व इतर वाद्यें विकण्याच यांचें दुकान आहे. अलीकडे दुकानाची व्यवस्था मि. विक्स यांचा मुलगा व नातू पाहतात. म्हातारबुवा लेचवर्थ या प्रसिद्ध गार्डनसिटीमध्यें राहतात. तथापि तेथून आठवड्यांतून दोन दिवस स्वतःची मोटार स्वतः हांकीत ते लंडनला जातात व मुलगा आणि नातु यांच्या कामावर देखरेख करितात. लंडनला त्यांच्या जांवयाच्या घरीं त्यांचा माझा परिचय झाल्यावर त्यांनीं लेचवर्थ पाहावयास येण्यास मला आमंत्रण केलें होतें. वर उल्लेखिलेली लेचवर्थच्या प्लॅटफॉमवरील आमची भेट या आमंत्रणाचेंच फल होय.

२

मि. विक्स हे सुमोर सहा फूट उंचीचे सडपातळ गृहस्थ होते.

नाक लांबट व अगदीं तरतरीत; डोळे नेहमीं हंसणारे, पण भारी लबाड व भेदक! जणुं काय ते (डोळे) समोरच्या माणसास बोलतात, " काय बच्चंजी! कुठें पळून जातोस! हरलें बघ तुला. चल जरा गंमत करूं." डोळ्यांवरील भिवया दाट बर्नार्ड शॉच्या पद्धतीच्या होत्या; ओंठ नेहमीं मिटलेले, दृढनिश्चयी. डोळे हंसले कीं ओंठांच्या उजव्या कोंपऱ्याला किंचित् बांक येई व त्यांतून स्मित बाहेर पडे. केंस पांढरे शुभ्र, चापून चोपून विंचरलेले, खिशांतील रुमालाला प्यारिसच्या उंची सेंटचा सूक्ष्म व मधूर गंध.

मि. विक्स सुंदर होते. ऐन तारुण्यांत कुणीहि सुंदर दिसेल! कायसें म्हणतात, सोळावें वर्ष लागलें म्हणजे–छे:, खरें सौंदर्य त्यालाच म्हणावें कीं जें म्हातारपणीं टिकतें. महाराणी अलेक्झांड्रा मरेपर्यंत सुंदर होत्या. विक्स ८४ व्या वर्षीं सुंदर होते. त्यांच्या त्या निळ्या हंसऱ्या डोळ्यांकडे, तरतरीत नाकाकडे, बांकदार ओंठांकडे व सुरूच्या झाडाप्रमाणें उंच, सरळ, सडपातळ देहयष्टीकडे वारंवार पाहावेंसें वाटे.

२

मि. विक्सनीं गॉल्फ खेळण्याच्या वेळचा 'प्लस् फोअर्स' नांवाचा करड्या रंगाचा सूट घातला होता. 'प्लस फोअर्स–'मध्यें ते अधिकच उंच दिसत होते. हस्तांदोलन केल्यावर मीं त्यांना हंसत हंसत विचारलें.

" मि. विक्स, तुम्ही अजून गॉल्फ खेळतां वाटतें?" कांहींतरी गुपित सांगतांना चार वर्षांचें बाळ डोळे मिचकावितें, तसे डोळे मिचकावून ते ८४ वर्षांचे म्हातारबुवा म्हणाले, " छे, आठदहा

वर्षांपासून गॉल्फ खेळणें सोडलें आहे मीं. अलीकडे गॉल्फ खेळतांना लोक 'प्लस् फोअर्स' घालतात म्हणून मीहि घातलें. खेळायच्या वेळचा पोषाक केला म्हणजे मनाला अन् शरीराला आपण खेळतच आहोंत असें वाटतें व आनंद होतो."

मी म्हणालों, "वा:, तुम्हीं हा मानसशास्त्रांतला मोठाच शोध केलात बुवा. उद्यां मीहि सेंट पॉलसमध्ये जाऊन डीन इंगचे कपडे चोरतों."

म्हातारबुवा खो खो हंसले. इतके कीं, त्यांच्या डोळ्यांत पाणी आलें. डोळे पुसून ते म्हणाले, "बरें चला, आपल्यास वेळ होतोय्. तुम्हांला संध्याकाळच्या गाडीनें लंडनला परत जावयाचें आहे ना? तर मग आपल्याला घाई केली पाहिजे. मला तुम्हांला कितीतरी गोष्टी दाखवायच्या आहेत. आपण आधीं घरीं जाऊं, मग शाळा पाहायला जाऊं. शिक्षकांना मीं सकाळींच तुम्हीं येणार आहांत असें कळविलें आहे. चहानंतर आमचे चौक, रस्ते, बगीचे व लायब्ररी पाहूं. आमचा कार्सेटचा प्रसिद्ध कारखाना पाहूं. मग तसेच स्टेशनवर जाऊं."

मी आश्चर्यानें विचारलें, "पण मि. विक्स, तुमच्या वामकुक्षीची काय वाट? तुम्हांला इतकें फिरणें झेंपणार नाहीं. लंचनंतर माझ्याबरोबर कोणी माणूस द्या; तुम्ही विश्रांति घ्या."

परत डोळे मिचकले. बुवा म्हणाले, "वामकुक्षीची काळजी करूं नका. मीं सगळी व्यवस्था केली आहे. रात्रीं एक दीड तास अधिक झोंपलों. शिवाय लंचनंतर घ्यायची वामकुक्षी आधींच घेऊन टाकली. आतां मी अगदीं ताजातवाना झालों आहे बघा." आपल्या म्हणण्याच्या समर्थनार्थ मि. विक्स एखाद्या तरण्याताठ्या टॉमीप्रमाणें छाती

काढून चालूं लागले. मी हरलों. मि. विक्सच्या मागोमाग मीं मोटर-मध्यें बसलों. म्हातारबुवांनीं कुशलतेनें मोटर चालवून अल्पावधींत तिला स्वतःच्या दाराशीं उभी केली.

४

लेचवर्थ ही एक उद्यान-नगरी आहे. शहरांत दाटीनें राहणें योग्य नाहीं व उद्योग-धंद्याचें कारखाने शहरांतच काढून माणसांना कोंबड्यांच्या खुराड्यांप्रमाणें कोंदट चाळींत राहावयास लावण माणुसकीच्या धर्माविरुद्ध आहे असें ३०।४० वर्षांपूर्वीं कांहीं जाणत्या व सौंदर्यसमीक्षक लोकांस वाटून त्यांनीं लंडनभोंवतीं गार्डन सबर्ब्स व दूरवर लेचवर्थसारख्या उद्यान-नगरींची उभारणी केली. प्रत्येक घर वेगळें, प्रत्येक घराच्या मागें–पुढें टुमदार बगीचे, सुंदर व विस्तृत रस्ते, शोभिवंत चौक, सार्वजनिक उपवनें, मुलांना खेळण्याचीं मैदानें, सुंदर झांकलेले पोहण्याचे तलाव, वाचनालयें, टौनहॉल–असा या उद्यान-नगरींचा थाट असतो.

मि. विक्स हे लेचवर्थच्या संस्थापकांपैकीं एक आहेत. त्यांचें घर दुमजली असून घरासमोर ट्यूलिपचे चार वेगळ्या रंगाचे सुंदर ताटवे होते. वाऱ्यानें मंदमंद हालणाऱ्या ट्यूलिपांकडे मी कौतुकानें पाहात असतां मि. विक्स अभिमानानें म्हणाले, “ आहे कीं नाहीं मौज ? माझ्या घरच्यासारखे ट्यूलिप तुम्हांला ‘ क्यू ’ खेरीज कोठें आढळणार नाहींत. ती बघा निजावयाची खोली; निजून उठतांच माझ्या आवडत्या ट्यूलिपांकडे डोकावून पाहण्याचा माझा कैक वर्षांचा परिपाठ आहे. तेहि मीं पाहतांच खुषीनें डोलतात. जुना स्नेह ! मिसेस विक्सनें मुद्दाम हारलेमहून त्यांना आणिलें. तिला

फुलांचा विलक्षण नाद. साऱ्या फुलझाडांचीं लॅटिन नांवें पाठ. मरतांना माझ्या टयूलिप्सना जपा असें बजावून गेली."

मि. विक्सनीं हळूच प्रेमानें एका टयूलिपवरून हात फिरविला. मला वाटलें गतपत्नीच्या स्मृतींनें ते गहिंवरतील. पण छे; इच्छाशक्तीच्या जोरावर जन्मभर भावना मनांतल्या मनांत दाबून जगाचा कारभार हांकणारा तो इंग्रज तसाच पुढें गेला व घरांत शिरला.

५

दिवाणखाना प्रशस्त व सुंदर होता. मँटलपीसवर आणि दोन तीन लहान मोठ्या तिपायांवर फुलांचे सुंदर गुच्छ ठेवले होते. कॉन्स्टेबल, टर्नर वगैरे इंग्रज चित्रकारांचे कांहीं निवडक लँडस्केप्स टांगलेले होते. प्रमुखस्थानीं राफेलचें जगप्रसिद्ध 'सिस्टिन मॅडोना' आणि बॉत्तिशलीची 'व्हिनस' विराजमान होती. जमिनीवर उंची इराणी गालीचे असून मधोमध एक चेस्टरफिल्ड ( कोच ), त्यापाशीं विजेची शेगडी व तिच्यापाशीं मोरक्कोहून आणलेलें, नक्षीकाम केलेलें पिवळ्या चामड्याचें पाय ठेवण्याचें वाटोळें आसन होतें. चेस्टरफिल्डवर बसून शेगडीकडे पाय पसरून विक्स म्हणाले.

"तुम्हीं लंडनला नवीन आला आहांत. तुम्हांला पुष्कळ नवीन गोष्टी आढळतील. नवीन चालीरीति दिसतील, नवीन मतें ऐकूं येतील; जपून असा. अलीकडे हे सोशालिस्ट लोक मोकाट सुटले आहेत. त्यांच्या नादीं लागूं नका. रशियांत त्यांच्या मताप्रमाणें उलथापालथ झाली, बेबंदशाही माजली; त्यामुळें यांना स्वर्ग दोन बोटें उरला आहे. आमच्याकडे त्या म्हाताऱ्या लॅन्सबरीनें गाढवाप्रमाणें

पॉप्लर* डॉक्ट्रिनची घोषणा चालवली आहे. काय न्याय आहे? कारखानदारांनीं, व्यापाऱ्यांनीं आपल्या बुद्धिप्रभावानें मेहनतीनें संपत्ति मिळवावी अन् या धूर्त सोशालिस्टांनी करांच्या रूपानें त्यांना लुबाडून ती आळशी, ऐतखाऊ लोकांना वाटून द्यावी. मेल्यावरसुद्धां डेथ ड्युटीज् आहेतच."

मीं भीतभीत विचारलें, "गरीब लोकांच्या सुखसोयींसाठीं इंग्लंडांत जें लोकोत्तर कार्य होत आहे, तें या करांशिवाय कसें होऊं शकलें असतें?"

म्हातारबुवा म्हणाले, "अहो, कसलें लोकोत्तर कार्य घेऊन बसलां आहांत! या लोकांनीं गरीब लोकांना फुकट खायला घालून, फुकट दुसऱ्यांच्या जीवावर चैन करायला शिकवून त्यांच्यामधला आत्मविश्वास नाहींसा केला, इभ्रत नाहींशी केली. आजकाल कामकरी वर्गांत हौस नाहीं, चिकाटी नाहीं, वर डोकें काढण्याची महत्त्वाकांक्षा नाहीं. स्टेटहेल्पच्या पांघरुणाखालीं दुसऱ्यांकडून दान घेणें आपला हक्क आहे असें यांना वाटूं लागलें आहे; यापेक्षां अधःपात तो कोणता? अहो, मीहि गरिबींतूनच वाढलों आहे. दिवसभर कारखान्यांत राबून घरीं आल्यावर रात्रीं जागून अंधुक दिव्याखालीं पुस्तक घेऊन बसावें अन् अभ्यास करावा. आम्हांला कुठें होत्या वर्कर्स इन्स्टिट्युटस् व वर्किंगमेन्स कॉलेजेस? ट्रेड स्कूल्स, अन् कंटिन्यूएशन स्कूल्स या भानगडी आम्हांला नव्हत्या ठाऊक! पण आमच्या मनगटांत धमक होती.

* श्रीमंतांकडून शक्य तितके पैसे कराच्या रूपानें काढून गरीबांच्या सुखसोई करणें. पॉप्लर (लंडनच्या गरीब वस्तीचा एक भाग) येथील स्थानिक संस्था ताब्यांत असतां लॅन्सबरींनीं हा पायंडा पाडला.

देवानें बुद्धी दिली होती, तिचा आम्हीं उपयोग केला, चिकाटी धरली म्हणून हे दिवस पाहिले. आमच्या पिढींतल्या सगळ्या कारखानदारांची हीच कहाणी. आम्हीं आमच्या चिकाटीनें ब्रिटनला हे दिवस आणिले. आतां काय ? नोकरी नाहीं, रोजगार धंदा नाहीं, नसेना. स्टेट आहेच पोसायला. खुशाल घरबसल्या आठवड्याच्या आठवड्याला 'डोल' मिळतात, डोलच्या कमाईवर लग्नं उरकून संसारसुद्धां थाटतां येतो. हे ऐदी लोक ब्रिटनचे भावी आधारस्तंभ! काय म्हणे 'The new poor!' जशी काय आमच्या अमदानींत गरिबी नव्हतीच. व्यासपिठावरून प्रीस्ट, पार्लमेंटांतून मुत्सद्दी, हाइड पार्कमधले रविवारचे वक्ते—जो उठतो तो गरिबांना कवळायला धांवतोय. मला या गरिबांचा हेवा वाटूं लागला आहे बघा."

"तुम्हीं लवकरच परत इंडियांत जाल. तुमच्या लोकांना तुम्ही हेंच सांगत जा. जगायचें असेल तर, राबा; कष्ट करा, स्टेटवर विसंबूं नका, धनिकांना लुबाडूं नका. स्वसामर्थ्यानें नांव काढा, पैका मिळवा. दरिद्री राहूं नका. यांतच पुरुषार्थ आहे."

लंचची घंटा झाली. भोजनाचा बेत मि. विक्स यांच्या ऐश्वर्यास साजेसाच होता. ते म्हणाले, "मला क्षमा करा, माझ्या मेजावर तुम्हांला मद्य आढळणार नाहीं. जिंजर एल् व जिंजर बीअरवर तुम्हांला तहान भागवावी लागेल.

मी म्हणालों, "चिंता नको. निर्मळ पाण्यावरच तहान भागवण्याची मला संवय आहे."

जेवण झाल्यावर म्हातारबुवांनीं मला लेचवर्थच्या सर्व शाळा दाखविल्या, सार्वजनिक स्थळें दाखविलीं व चहानंतर कार्सेट तयार

करण्याचा अवाढव्य कारखाना दाखविण्यास घेऊन गेले. कारखाना दाखवित असतां बुवा म्हणाले, "या कारखान्यांत काम करणाऱ्या मुलींना आम्ही एक क्षण फुकट घालवूं देत नाहीं; पण वेतनहि तसेंच जबर देतों व सोईहि तशाच करून देतों. हें पहा त्या मुलींसाठीं वाचनालय, हीं स्नानगृहें; पलीकडच्या बिलियर्ड्स पिंक-पांगच्या खोल्या; हें लंच घेण्याचें दालन. मुलींना थोड्या पैशांत ऊन ऊन लंच येथें दिलें जातें. त्यांच्या पगारांतून पैसे कापले जातात. औषध-पाण्याची व्यवस्था आहेच. आम्ही त्या फोर्डच्या मताचे आहोंत. खूप वेतन द्या व खूप काम घ्या. तुमच्या 'पॉप्लर डाक्ट्रिन' ला येथें थारा नाहीं.

संध्याकाळ झाली. आम्ही स्टेशनवर गेलों. गाडीची वाट पहात असतां मि. विक्स म्हणाले, "तुमचा इंडियांतला पत्ता द्या मला." मी म्हणालों, "तुमचा पत्रव्यवहार अद्यापि चालू आहे वाटतें ?" मि. विक्स म्हणाले, "छे, कामकाजाचीं पत्रें तेवढींच सांगतों. पत्र-व्यवहारासाठीं नको तुमचा पत्ता. मी लवकरच आमच्या पियानोंच्या प्रसारासाठीं तिकडे इंडिया चायनाकडे येणार आहें. बॉंबेपासून जवळ असलांत तर येईन तुम्हाला भेटायला; मग तुमचा ताजमहाल, बनारस, दिल्ली दाखवा मला."

गाडी आली, मी गाडींत बसलों. मि. विक्स डोळे मिचकावित म्हणाले, "One thing, Ghate, life is enjoyable. Live it. Bye-bye."

# एक जर्मन म्हातारा

## १

मध्यरात्र ! एका जर्मन खेड्यांतील टेंकडीच्या पायथ्याशीं असलेल्या काफेमध्यें आम्हीं कांहीं मित्र ईस्टरचा सण मनोभावानें साजरा करीत होतों. इंग्रजांचा जसा नाताळ तसा जर्मनांचा ईस्टर म्हणजे फार आवडता सण. जिकडे तिकडे आनंदी आनंद भरला होता. काफेच्या यजमानीणबाईची धांदल काय विचारतां ! एकीकडे ती आपल्या लाग ( र ) बीअरच्या बाटल्या भराभर फोडून प्याल्यांत ओतीत होती व एकीकडे आल्यागेल्यांकडे कधीं नुसतें स्मित हास्य तर कधीं गोड आवाजांत आफ्विद झेन् ( aufwider zehn नमस्कार ), तर कधीं कुणीं कांहीं बोलल तर कुतूहलपूर्वक भिवयांना बांक देऊन 'सोऽ' 'सोऽऽ' असें म्हणत होती. प्याले नेणाऱ्या छोकरीला तर क्षणाची फुरसत नव्हती. कोणाचा प्याला रिकामा झाला रे झाला कीं ती आलीच दुसरा घेऊन. काफेच्या एका कोपऱ्यांत पियानोवर मधून मधून फॉक्सट्राट, वाल्ट्झ्, टँगो इत्यादि नृत्यांचे सूर निघत होते व त्यांच्या तालावर मंडळी नृत्य करीत होती.

आम्ही एका टेबलाभोंवतीं खुर्च्या घेऊन बसलों होतों. मध्यभागीं माझा मित्र फ्रिट्झ् गंभीरपणाचा आव आणून यजमानकार्य करीत होता. त्याच्या शेजारीं त्याची बहीण एलिझ्बेथ, नंतर एक भयंकर

लठ्ठ जर्मन तरुण, त्याच्या लठ्ठपणाच्या आड झांकली गेलेली मिस् वेअरमन नांवाची एक हाडकुळी मास्तरीण, पुढें फ्रिट्झ्चा मेहुणा झिकूमन्, पुढें फ्रिट्झ्चे तीनचार स्नेही. मी सन्मान्य पाहुणा म्हणून फ्रिट्झ्च्या उजवीकडे व माझ्या शेजारीं ऐंशीं वर्षांचा एक म्हातारा गवई अशी आमची वाटोळी परिषद् भरली होती.

आम्ही सर्व मंडळी तरुणच होतों. अपवाद फक्त ते गवईबुवा. पण त्यांना वृद्ध कोण म्हणेल ? आम्हां सर्वांपेक्षां त्यांचा उत्साह दांडगा होता. सर्वांपेक्षां अधिक बिअर त्यांच्या विशाल उदरांत गेली होती—चालली होती. त्यांनीं त्या पवित्र रात्रीं अखंडपान आरंभलें होतें. बंपर भरून आला कीं ते एक एक घोंट घेत तो रिकामा करीत व रिकामा झाल्यावर आपल्या विस्तीर्ण आणि सपाट अशा टकलावर तो ठेवून डोळे मिचकावून जर्मन भाषेत ओरडत "Standing on platform forbidden." प्लॅटफॉर्मवर जास्ती वेळ बंपर उभा ठेवणें बेकायदेशीर आहे हें जाहीर होतांच ती छोकरी दुसरा भरललेला बंपर घेऊन येई, तो म्हातारबुवांच्या ताब्यांत देई व मग कायदेभंगाच्या आपत्तींतून बुवांच्या टकलावरील बंपरला मुक्त करी. यजमानीणबाई नवीन बंपर भरतांना तो कितवा हें सर्व काफेला ऐकूं जाईल अशा आवाजांत जाहीर करी. याप्रमाणें हा पानविधी चालू होता. बुवांनीं सतरा बंपर्सना पोटांत ठाव दिला. दांडगी तपश्चर्या ! त्यांची साथ कोण करणार ? फ्रिट्झ् हाइडलबर्गच्या छात्रवृंदांत नावाजलेला—मुरलेला वस्ताद; सर्वांपेक्षां अधिक बंपर्स झोंकून मग शेवटीं टेबलाखालील भूमिभागाचा आश्रय करणारा तो खंदा वीर. पण बारा बंपर्सपर्यंत तो

टिकला. माझ्यासमोर बसलेल्या त्या भयंकर लठ्ठ जर्मन तरुणानें मात्र पंधराव्या बंपरपर्यंत साथ दिली. बुवा त्याच्याकडे बोट दाखवून अभिमानानें मला म्हणाले, " माझे चिरंजीव. "

मला चिरंजीवांच्या पितृभक्तीचें व शालीनतेचें कौतुक वाटलें. वडिलांचा अपमान होऊं नये म्हणून त्या शूर पुत्रानें मुद्दाम हार खाल्ली असावी व ' आपण वडील आहांत; आपण पुढें व्हा. ' म्हणून त्यानें वडिलांचा मान ठेविला असा मी तर्क केला. परंतु फ्रिट्झ म्हणाला " छे रे ! तो पोरगा म्हाताऱ्यापुढें काय टिकतोय् ? म्हाताऱ्याचें साठ वर्षें अखंडपान चाललें आहे. आग्रह कर जरा, आणखी झोंकील स्वारी !"

२

म्हातारबुवांनीं एक वाजल्यानंतर नृत्यांत भाग घेण्यास सुरुवात केली. आधीं ते एक ' वनस्टेप ' नाचले. मला त्याचें विशेष आश्चर्य वाटलें नाहीं. अंमळशानें " फाक्स्ट्रॉट " सुरू झाला. सर्वजण उठून जोड मिळवून नृत्यांत सामील झाले. म्हातारबुवा उठले, जोड पाहूं लागले. कोणी रिकामी स्त्री दिसेना. इतक्यांत ती छोकरी बिअरचा बंपर घेऊन कोणाला तरी देण्यास चाललेली बुवांनीं हेरली. तात्काळ तिला मध्येंच पकडून बुवा तिला जबरदस्तीनें नाचवूं लागले " अहो, बिअर सांडेल. सोडा मला. " अशी ती बिचारी ओरडतच होती. बुवांनीं झट्कन् तिच्या हातांतील बंपर घेतला व तो हात वर करून नाचूं लागले. ते पुढें भरभर सरकत, मागें येत, मधींमधीं तालावर जागेवर डुलत. पण आश्चर्य हें कीं, बंपरमधला एकहि थेंब जमिनीवर

सांडला नाहीं कीं दुसऱ्या नाचणाऱ्या जोड्यांना या जोडीचा स्पर्श झाला नाहीं.

नाच संपतांच आपल्या सहचारिणीचा गालगुच्चा घेऊन बंपर पोटांत रिकामा करून बुवा स्वस्थानीं विराजमान झाले. इतक्यांत त्यांचे ते वपुश्रीमान चिरंजीव घरीं गेले होते ते परत आले. त्यांनीं दारांतूनच यजमानीणबाईंना ओरडून विचारलें, "आईनें विचारलें आहे, आमचे बाबा सुरक्षित आहेत ना ? आज तूं त्यांना घरीं पाठवणार कीं नाहीं ?"

सर्वत्र हंशा पिकला. म्हातारबुवांनीं यजमानीणबाईच्या गळ्यांत हात घालून मोडक्या इंग्रजींत मला वरील विनोद समजावून सांगितला.

पियानोमधून वॉल्ट्झचे गोड सूर निघूं लागले. वॉल्ट्झ हा जर्मनांचा आवडता नाच. सर्वजण आतुरतेनें उठले. सर्वांनींच बिअरचें वाजवीपेक्षां फाजिल सेवन केंलेल. वॉल्ट्झ् नाचणें कोणासच झेपेना. कांहीं जण तसेच झोकांड्या खात परतले. कांहींजण साधा मॉडर्न वॉल्ट्झ् नाचत नुसते पुढें पुढें सरकूं लागले. म्हातारबुवांनीं केवळ आठ आठ दहा दहा बाटल्यांनीं जमीनदोस्त झालेल्या त्या अध:पतित तरुण पिढीकडे तिरस्कारपूर्वक पाहिलें व 'My Cream!' 'My Cream!' म्हणत ते यजमानीणबाईकडे गेले. बुवांनीं मान लववून दोन्ही हात पुढें करतांच यजमानीणबाईंनीं स्मित केलें, व आपलें एप्रन सोडून त्या बुवांबरोबर नाचावयास तयार झाल्या.

तें नृत्य अद्भुत होतें. सारीं नाचणारीं जोडपीं तें नृत्य पाहण्यास थांबलीं. जमिनीवर कलंडलेले लोकहि आपापल्या जागांवरून तें दृश्य पाहूं लागले बुवांनीं आरंभापासूनच जुन्या वाल्ट्झला सुरुवात केली. या वॉल्ट्झच्या सहा स्टेप्समध्यें दोनदां स्वत:भोंवतीं गिरक्या घेतल्या.

गिरक्या फार वेळ घेणें कठीण असतें. भोंड येण्याचा संभव फार. बुवा ऐशीं वर्षांचे. पोटांत भरपूर बीअर गेलेली. त्यांचें एकहि स्टेप चुकलें नाहीं किंवा गिरकीहि तालाच्या बाहेर गेली नाहीं. उलट कांहीं वेळानें नृत्याची गति मंद वाटून त्यांनीं पियानो वाजविणाऱ्या बाईस जलद वाजविण्यास आज्ञा केली. तें नृत्य इतकें सुंदर, इतकें सहज होतें कीं जणुं काय मानससरोवरांत राजहंसांचें जोडपें सहजभावानें पोहत आहे. यजमानीणबाईंनाहि नृत्याच्या गतीनें व नादानें एकप्रकारचा नशा चढला व भराभर गिरक्या घेत असतां त्या तृप्तिदर्शक गोड असें स्मित करीत होत्या. नृत्य संपतांच बुवांनीं आपल्या सहचारिणीस स्वस्थानीं पोहोंचविलें व लवून तिला वंदन करून ते आमच्याकडे आले.

बुवा मजपाशीं बोलूं लागले, " अहो, मनुष्यप्राणी प्रेम करायचा केव्हां थांबवतो, तुम्हांला माहीत आहे का ?" मी विस्मयानें त्यांच्याकडे पाहूं लागलों. बुवा हंसत पुढें म्हणाले, " एका फ्रेंच गृहस्थाची अशी गोष्ट सांगतात कीं, तो एकदां आपल्या आजीकडे गेला व तिला म्हणाला, " काय ग आजी, तुझ्या अनुभवावरून सांग बरें मनुष्य प्रेम करायचें केव्हां थांबवतो ?' आजीनें उत्तर दिलें, ' बाळ, मला अद्याप माहीत नाहीं.' माझी त्या फ्रेंच आजीबाईसारखी स्थिति आहे. मीं अद्यापि प्रेम करायचें सोडलें नाहीं. गांवांतल्या साऱ्या सुंदर मुली मला आवडतात व मी त्यांचीं चुंबनें घेतों."

४

मंडळीनीं बुवांस गाण्याचा आग्रह केला. मोठ्या प्रयासानें बुवा तयार झाले. काफेची मालकीण स्वतः पियानोवर बसली. तिनें हळूच

पट्ट्यांवरून एकदां हात फिरवून गोड आणि संकीर्ण असा नाद उत्पन्न केला. बुवा भिंतीला टेंकून उभे राहिले. दोन्हीं हातांचीं बोटें एकमेकांत जुळवून त्यांनीं हात खालीं सोडले. वर ताठ मान करून ते शूबर्टच्या संगीतांतले गोड आलाप घेऊं लागले. आम्ही त्यांच्याकडे श्रद्धेनें पाहूं लागलों. ते बारके डोळे—त्यांच्या खालीं पडणारी मांसाची वळकटी —आमच्या दृष्टीपुढून नाहींशी झाली. बुवांच्या डोळ्यांत एक वेगळीच चमक दिसूं लागली. बुवा संगीताच्या उच्च भूमिकेवर उभे असलेले आम्हांला दिसले. दृष्टीप्रमाणेंच त्यांचें तें स्थूल शरीर—तीं बोजड अवयवें—सारींच क्षणार्धांत दैवी तेजानें तळपूं लागलीं.

बुवा आवाजीच्या दृष्टीनें Tenor होते. काफे दुमदुमली. धुंदींत लोळणाऱ्यांच्या माना एकदम वर झाल्या. आम्हीं सर्व वेगळ्याच वातावरणांत विहरूं लागलों. आम्हीं आमच्या मनाशीं गूढ तरल भावनांच्या भाषेंत बोलूं लागलों. आम्हांला एकाच समयीं सुख व दुःख झालें व तीं सुखदुःखें आमच्या डोळ्यांत दिसूं लागलीं.

गाणें संपतांच बुवा कोणाशीं न बोलतां जाण्यास निघाले. दारांत मागें वळून कातर व दुःखी आवाजांत gooten nacht (गूटन नाख्ट) म्हणून ते वसंतांतल्या उषःकालीन किरणांत बाहेर पडले.

आम्हीं सर्वजण कितीतरी वेळ दाराकडे पाहात होतों!

# ९

# एक इतिहाससंशोधक

परवां कसल्याशा कामाला मला × × × गांवीं जावें लागलें. या गांवीं इतिहाससंशोधनाच्या कार्यांत अनेक वर्षांपासून गुंतलेले एक म्हातारबुवा रहातात हें मला माहीत होतें. माझें काम संपल्यावर तडक मी म्हातारबुवांच्या घराकडे वळलों.

दुपारची वेळ होती. मीं आंत डोकावून पाहिलें. म्हातारबुवा एका जीर्ण सतरंजीवर उघडेबोडके बसले होते. पाठीमागें एक लाल रंगाचा तक्या होता. समोर ५०-७५ विड्याचीं पानें पडलीं होतीं. जवळ पानसुपारीचा डबा होता. बुवा खलबत्त्यांत विडा कुटित होते. हात कुटण्याचें काम करीत होता, पण लक्ष सारें समोर लांबवर पसरलेल्या जुन्या पिवळ्या उज्जनी कागदावर होतें.

मी तसाच पुढें जाऊन नमस्कार केला. बुवांनीं मारक्या म्हशी-प्रमाणें वर पाहिलें. त्यांना हुंदडण्यास संधि न देतां मी म्हणालों, "मी आपल्या भेटीस आलों आहें. माझी आपली ओळख नाहीं. मला इतिहासाचा थोडाफार नाद आहे आपले ग्रंथहि कांहीं चाळले आहेत. येथें कामाकरितां आलों होतों; म्हटलें जावें भेटून."

बुवा खणखणीत आवाजांत म्हणाले, "असें काय! बाहेरून आलांत म्हणतां? या, या; बसा इथं. पानबीन खातां का? नाहीं?

बरे आहांत बुवा. आम्हाला यावांचून होत नाहीं. ही आमची अफीणच होऊन बसली आहे."

मी भीत भीत बुवांच्या समोर सतरंजीच्या एका टोकाला बसलों व खोलीभोंवतीं एकदां नजर फेंकली. जिकडे बघावें तिकडे एकावर एक रचलेल्या रुमालांच्या राशी! बुवांशेजारीं कांहीं पिवळसर कागद पडल होते. जवळच कांहीं इंग्रजी मराठी पुस्तकें होतीं. हाताशीं बोरूच्या लेखण्या, कलमदान आणि कांहीं हत्तीछाप कोरे कागद होते.

साराच भूतकाळ! त्या जुन्या तीन–चारशें वर्षांच्या खोलींत ऐशीं वर्षांचा तो म्हातारा, शेकडों वर्षांपूर्वीच्या कागदपत्रांच्या दप्तरांच्या ढिगामध्यें जुनें पेशवाई कलमदान जवळ घेऊन जुन्या खलबत्त्यांत विडा कुटीत होता. वर्तमानकाळानें–विसाव्या शतकानें –त्या खोलींत प्रवेश केला नव्हता. मीं समोरच्या भिंतीकडे पाहिलें. शिवाजीमहाराज व थोरले माधवरावसाहेब यांच्या तसबिरी भिंतीला टांगलेल्या होत्या. मला भिंतीकडे पाहातांना पाहून खलबत्त्यांतल्या विड्याची एक फक्की मारून म्हातारबुवा म्हणाले, 'बस्, दोनच माणसें. महाराज अन् थोरले माधवराव म्हणजेच मराठशाही. अजून माधवरावांची योग्यता तुम्हां लोकांना कळायची आहे. थोडे दिवस जगूं द्या आणखी म्हणजे दिसेल तुम्हांला गम्मत."

मी म्हणालों, "आपले आणखी किती भाग बाहेर पडतील? खर्ड्यापर्यंत तर आपण आलांत. १८१८ पर्यंत नेणार का?"

बुवा म्हणाले, "किती भाग बाहेर पडतील? अहो, अनंत. त्यांना कांहीं मर्यादा आहे का? इकडे या; या खोलींत पाहा." मीं शेजारच्या दालनांत डोकावून पाहिलें. जुन्या रुमालांनीं खोली गच्च

भरली होती. रुमाल कडीपाटापर्यंत भिडले होते. म्हातारबुवा म्हणाले, " पाहिलेत ना हे रुमाल ? एवढें अजून वाचणें आहे; त्यांच्या मिल्या जुळविल्या पाहिजेत, नकला केल्या पाहिजेत, वर्गीकरण केलें पाहिजे. खुलाशाचीं टिपणें लिहिलीं पाहिजेत. किती भाग होतील, बोला ? "

" पण—पण, " मी भीत भीत म्हणालों, " हें किती दिवस चालणार ! "

बुवा गंभीरपणानें बोलले, " अहो, मरेपर्यंत ! मेलों कीं झालें, संपलें. तसा माझा पुनर्जन्मावर विश्वास आहे म्हणा. परत माझ्या छत्रपतीच्या महाराष्ट्रांत जन्म घेईन, परत तुम्हांला घाणेरडे दिसणारे कागद उराशीं वाळगून काम करीन. " बोलतां बोलतां बुवांनीं हळूच एका जुन्या रुमालावरून प्रेमानें हात फिरवला. जणूं काय तें त्यांचें नातवंडच होतें.

बुवा पुढें म्हणाले, " पण पुनर्जन्मापर्यंत दम कसचा निघतोय्. या जन्मांतच होईल तें काम केलें पाहिजे. मी तसा आणखी पंधरा वर्षें नाहीं मरत ! लिहून देतों तुम्हांला. बघा हें मनगट. जुना जमाना पाहिला आहे, राव ! उगाच नाहीं. "

मी म्हणालों, " पण बुवा, तुम्ही आतां वृद्ध झालांत. थोडी दुसऱ्यांची मदत घ्यावयाची होती आतां. नकला तरी दुसऱ्याकडून करून घ्याव्यात. "

" छेः छेः छे ! तें बोलूं नका. मदत ? कोणाची मदत घेऊं ? तुमच्यासारख्या तरण्याताठ्यांची ? रामाचें नांव घ्या. अहो, नुसती नक्कल करायला दिली तर सतरा चुका करतील. ' हंबीरराया ' ला ' बहीरराव ' बनवतील. ' मंबाजी 'चा ' लांबाजी ' करतील. तें कांहीं विचारूं नका. माझें काम मलाच केलें पाहिजे—सगळें मलाच केलें

पाहिजे. वेळ थोडा उरलाय्. दहा पंधरा वर्षें हां हां म्हणतां जातील. आमचा नाना म्हणतो, “ आतां विश्रांती घ्या. देवळांत देवदर्शनाला, पोथीपुराणाला जा. ’ त्या लेंकाला काय माहीत याच खोलींत ( शिवाजीमहाराजांच्या तसबिरीकडे बोट दाखवून ) माझा देव बसला आहे. या खोलींत या माझ्या पोथ्या पडल्या आहेत. हा आमचा महाराष्ट्र–वेद ! ह्यः ह्यः ह्यः ! म्हणे देवधर्म करा. कसला बोड-क्याचा देव न् धर्म ! अहो, एखाद्या गुंतागुतीच्या निवाडापत्राच्या किंवा महजराच्या मागें लागलों कीं रहातें दोन दोन दिवस स्नान अन् जेवण. लाह्या एका हातानें खायच्या, एका हातांत कागद. बस्. अशीं हीं चाळीस वर्षें या खोलींत घालवलीं. तुमच्या जगांत काय चाललें आहे कुणा लेकाला दाद ! तुमचें तें महायुद्ध सुरू झाल्यावर दोन वर्षांनीं मला समजलें. अन् परवांपर्यंत मी समजत होतों तें चाललेंच आहे अझून. आम्हाला काय करायच्या तुमच्या या नव्या भानगडी ? भांडा, व्याख्यानें द्या. मरा ! वाटेल तें करा ! आमचा सारा जन्म पेशवाईंत चालला आहे. पेशवाईतच आम्ही मरणार. १७९६ पर्यंत तर येऊन पोहोंचलों. पुढील पल्ला गांठायची धडपड चालू आहे. पण १८१८ पर्यंत जाऊन पोहोंचणें कठीण. मध्येंच घोडें दगा देणार. वसई गाठली तरी भिळविली. पुढचा कसला इतिहास ! वसईलाच मराठशाही बुडाली ! ”

बुवांना दम लागला. स्वारींनीं परत सतरंजीवर आसन ठोकलें, विडा केला, खलबत्त्यांत कुटला. परत विड्याची फकी तोंडांत गेली. बुवा पुढें म्हणाले, “ जगलें पाहिजे मला. अहो, काय तुमचें नांव ? सांगितलें नाहींच वाटतें अझून ! मीहि विसरलों म्हणा. बरें असूं

द्या. काय सांगत होतों ? हं. मी जुन्या पिढींतला शेवटचा उरलोंय. मीं डोळ्यांनीं जें पाहिलें आहे तें तुम्हांला स्वप्नांतहि दिसणार नाहीं. अहो, पेशवाईंत वावरलेलीं माणसें मीं पाहिलीं आहेत, त्यांच्या तोंडून अनेक गोष्टी ऐकल्या आहेत. तुम्हीं नवे लोक. काय इतिहास लिहिणार ? तुमची भाषा वेगळी; रहाणें, बोलणें, चालणें सारेंच वेगळें. राव, पेशवाईचा इतिहास लिहायला पेशवाई मन लागतें; हो, अन् ( छाती काढून ) पेशवाई देह लागतो. म्हणून म्हणतों, मला पांच-दहा वर्षें जगलें पाहिजे. डोक्यांत जें जें भरलें आहे तें तें लेखणींतून उतरलें पाहिजे. एकच गोष्ट सांगतों, भीमथडी गंगथडी घोड्यांनीं दादांना अटकेपार नेलें; कोठें गेली ती अवलाद ? सांगा ! नाहींच सांगतां येणार. राव, पेशवाई आटोपल्यावर एक लाख घोडें ठाणावर मेलें, ठाणावर. दहा-वीस कोसांची मजल मारायचा त्यांचा पिढीजात देहधर्म. लढाया संपल्या, खलक खुदाका मुल्ख अंग्रेज सरकारका झाला. काम संपलें. ठाणावर बांधल्या बरोबर पटापट तट्टें मेलीं. जुने शिलेदार गेले, जुनीं तट्टें गेलीं. तुमची अवलादच वेगळी. म्हणे आम्ही इतिहास लिहिणार !"

परत बुवांना दम लागला. परत एका विड्याचा खलबत्त्यांत चुरा झाला. परत तोंडांत फक्की गेली. बुवा म्हणाले, " बरें आतां जा तुम्हीं. बराच वेळ घेतलात. एवढ्यांत दोन-तीन नकला झाल्या असत्या. बाहेरगांवाहून आलांत म्हणून बोललों तुमच्याशीं; येथच्या कोणाची आंत येण्याची बिशाद नाहीं. हा सोटा घेऊन धांवतों. विक्षिप्त म्हणतात; म्हणेनात लेकाचे. बरेंच झालें. रिकाम्या गप्पा मारायला वेळ आहे कुणाला ? बरें या !"

# १०

# नाना न्हावी

त्या दिवशीं माझा वडगांवच्या डाकबंगल्यांत मुक्काम होता. सकाळीं पुढें जाण्याच्या तयारींत होतों इतक्यांत पटेवाल्यानें वर्दी दिली, " नाना न्हावी आला आहे." मला त्याच्या म्हणण्याचा अर्थ समजेना. मीं कोणाहि न्हाव्यास बोलाविलें नव्हतें. नाना न्हावी—तो नाना असेल आणि न्हावीहि असूं शकेल—पण असें अनाहूत येण्याचें त्याला प्रयोजन नव्हतें. मी पटेवाल्याकडे प्रश्नार्थक मुद्रेनें पाहिलें. तो म्हणाला, " साहेब, नानाचा हा जुना दस्तुर आहे. कुणी सरकारी अमलदार वडगांवीं आला, म्हणजे नाना आलाच. कुणी तसें गेलेलें नानाला खपायचें नाहीं. तो कोणाकडून कधीं पैसा पण घेत नाहीं हजामतीचा."

हा निव्वळ जुलूम होता. इच्छा असो नसो, एका अनोळखी खेडवळ न्हाव्यापुढें मुकाट्यानें मान द्यायची म्हणजे काय ? नानाला खपायचें नाहीं म्हणे ! तो नाना असला म्हणून काय झालें ? त्याला कोणी अधिकार दिला हा एवढा ? तो काय By special appointment to all Government officers नेमला गेलाय ?

माझ्या मनाची गोंधळलेली स्थिति पाहून पटेवाला म्हणाला, " साहेब, नानाला खरेंच नाहीं आवडायचें आपण तसेंच पुढें गेलांत तर. त्याचा फार जुना दस्तुर आहे. रावबहादूर भडभडे एवढे संतापी,

पण नानानें त्यांना तसें जाऊं दिलें नाहीं. नाना सांगेल त्यांची हकीकत. साऱ्या तालुक्यांत पोराबाळांच्या तोंडीं झाली आहे."

रावबहादूर भडभड्यांना मी ओळखत होतों. जुन्या जमान्यांतले ते प्रांत होते. त्या गलमिशा, तो खणखणीत आवाज, तें टप्पेदार हंसणें, तें खेंकसणें अन् नाक फेंदारणें–हो, ते आतां नाहींस होत चाललेले होल बुट! अशा अमलदाराचा जर त्या नानानें नक्षा उतरवला तर–तर मग मी कोणच्या झाडाचा पाला. मी निरुपायानें म्हणालों, "दस्तुर आहे म्हणतोस? मग बोलाव तो कोण नाना आलाय त्याला."

नानानें प्रवेश केला. डोक्यीस लाल रंगाच्या मुंडाशाचे तीन चार वळसे, अंगांत कोपरी, खालीं गुढघ्यापर्यंत पोहोचणारा पंचा, पाठीशीं धोपटी–असा नानाचा जामानिमा होता.

तोंडाचें बोळकें झालें होतें; नाकाड वर आलें होतें; पोटऱ्यांवर शिरा फुगून त्यांचीं जाळीं झालीं होतीं. शरीरावर अनावश्यक मांस दिसत नव्हतें आणि जुना पीळ अद्याप कायम होता.

मीं नानाकडे नखशिखांत निरखून पाहिलें. सर्व अमलदारांवर खेंकसणाऱ्या भडभड्यांवर–अंमल चालविणारें व्यक्तिमत्त्व मला कोठें दिसेना. मीं वर डोळ्यांकडे पाहिलें. तेहि मंजवर भिडले होते. झालें, मीं हार खाल्ली, गलमिशावाले भडभडे कां गडगडले याचें कारण मला समजलें.

नानाचे डोळे प्रभावी, निश्चयी, रहस्यमय होते. त्यांच्यांत आत्मविश्वास आणि रुबाब असूनहि मार्दव होतें. दीर्घकालीन आयुष्यांत सुखदु:खाचे भलेबुरे जे नानाविध अनुभव आले होते

त्यांची नीटनेटकी गोठवण करून कृतकृत्य झालेल्या माणसाचे ते डोळे होते ! पुस्तकाला न शिवलेल्यां पण मोकळ्या हवेंत निसर्गाच्या साहचर्यांत आणि धरित्रीमातेच्या अंकावर सुसंस्कृत झालेल्या हिंदी खेडुताचे ते डोळे होते ! जीवनाचें रहस्य जाणलेल्या संयमी तत्त्वज्ञान्याचे ते डोळे होते !

आंत येतांच नानानें पटेवाल्यास हुकूम केला, " भाऊ, ऊन पाणी आण अन् चांगले दोन हंडे पाणी गरम कर. साहेब, भडभडसाहेबांप्रमाणें आपण जणूं मला नापास करीत होतां. छे: छे: असें खालीं बसूं नका. मला सारी रीतभात कळते. कुणाची तक्क्याशीं, कुणाची खुर्चीवर, कुणाची फस्ट किलास, कुणाची सेकंड किलास— सारें समजतें मला. आपण खुर्चीवर बसा. "

नानानें माझा ताबा घेतला. घरमालकाप्रमाणें तो मला हुकूम देत होता. मीं हळुच त्याला विचारलें, " का रे नाना, त्या भडभड्यांची काय भानगड झाली होती ? " नाना रंगांत येऊन सांगूं लागला, " प्रांत-साहेब आल्याची खबर मिळतांच मीं रिवाजाप्रमाणें धोकटी घेऊन बंगल्यावर वर्दी दिली; मला पाहतांच साहेब ओरडले, 'गावठी माणूस, ना गूट !' मला राग आला. मी गावठी माणूस ? मी ना गूट ? तसाच राग गिळून मी म्हणालों, " साहेब इतक्या वर्षं अंमलदारांची हजामत करीत आलों. पोलिससाहेब, रजिष्टारसाहेब, शाळांचे डिपुटी, मामलेदार, चिटणीस, बिनमिशावाले, दाभणमिशावाले, गलमिशावाले शेंडीवाले, संजाबवाले, दाढीवाले—झाडून सगळ्यांची गेलीं पन्नास वर्षं मीं हजामत केली. अन् साहेब मी ना गूट ? साहेब परचिती बघा. मूर्ति डोळ्याखालीं घाला. धोकटी फेकून देईन ना गूट ठरलों

तर'. मग तात्या शिपायाला सांगितलें, 'तात्या तीन इंडे तापव. इबीरमलच्या दुकानीं जा. आवळ्याचें तेल आण. माझें नांव सांग. फस्ट किलास हजामत आहे म्हणाव. समजेल तो'. हजामतीला सुरवात केली. डोकें म्हणजे काय तें! अशी हजामत कधीं मागें झाली नाहीं. कधीं पुढें व्हायची नाहीं. साबू लावीं, टुवालानें पुसीं; साबू लावीं, टुवालानें पुसीं. असा सफाईनें हात घेतला कीं साहेब गुंगूं लागले. पैसे देवूं लागले. म्हटलें मी नापास—नागूट. पैसे कसे घेऊं? द्या पावती लिहून हजामत फस्ट क्लास. मला पैसे पावले. भडभडेसाहेब सरदार माणूस. नखं काढतांना असे ओरडायचे, असे हुकूम द्यायचे कीं जणूं खर्ड्याची लढाई जुंपलीय. माझ्यावर फार खूष. आठ आठ दहा दहा दिवस दौऱ्यांत मला घेऊन फिरायचे. नातवंडाची मुंज झाली, आधीं माणूस माझ्याकडे. थोर माणूस. चाळिस जिलब्या फस्त करायचे अन् ढेकर द्यायचे. चहा कॉफी माहित नव्हती त्यांना. सकाळीं उठले कीं मिशा वर धरून दुधाची चरवी खलास करायचे."

२

मीहि भडभड्यांप्रमाणें नानाच्या आहारीं गेलों. त्याचा माझा परिचय वाढत गेला. वडगांवास माझे अधिक मुक्काम होऊं लागले. डाकबंगल्याच्या व्हरांड्यांत आरामखुर्चीवर पडून नानाशीं गप्पा मारणें हा एक मुक्कामांतील महत्त्वाचा कार्यक्रम होऊन बसला.

नाना फटिंग होता. मूल ना बाळ. कारभारणीलाहि जाऊन १०।१५ वर्षें झालीं होतीं. भूक लागली म्हणजे भाकर बडवावी. नाहींतर चूल थंड. आळस आला तर शेजारणीला पीठ द्यावें, भाकरी

करून घ्याव्या. परान्न मात्र वर्ज्य. उलट सर्व गांवचा कोणच्या ना कोणच्या कारणानें नानाच्या घरीं हात ओला झाला होता. गांवच्या बाप्यांना हुक्की आली कीं त्यांचा मोर्चा नानाकडे वळे आणि मग जें असेल नसेल त्याचा फन्ना उडे. वडगांवला अलीकडे चहाचें बंड सुरू झालें होतें. गांवकऱ्यांसाठीं नानाला हंडेच्या हंडे चहा करावा लागे. मंडळी मधून मधून म्हणे, "नाना नगरला सिनेमा छान लागलाय. हुसन्या मोटारवाला म्हणत होता मघा अड्ड्यावर. चलत असशील तर चल बग." झालें. हुसन्याची चंगळ होई. मंडळी नानाच्या खर्चानें पेशल मोटारींतून नगरला जायची, सिनेमा बघायची, सिंगल चहा पाव खायची अन् परत वडगांवला जायची. धुळवडीच्या दिवशीं तर नानाचे हाल विचारूं नका. त्याला मढ्याप्रमाणें बांधून तिरडीवरून नेत, त्याच्या नांवानें "रामनाम सत है, शिरापुरीका वेत है" असा घोष करीत आणि शेवटीं त्याच्याकडून चहा उपटीत. नाना हें सर्व मुकाट्यानें सहन करी. त्यानें कधीं तक्रार केली नाहीं किंवा कधीं हौसेनें गांवच्या कार्यक्रमांत भागहि घेतला नाहीं.

३

मीं माझ्या अनुभवावरून माणसांचे कांहीं कामचलाऊ वर्ग केले आहेत. नाना माझ्या कोणत्याच वर्गांत नीट बसत नाहीं. कुठेंहि त्याला बसवा, त्याचा थोडाबहुत भाग शिल्लक राहतोच. त्याचा कांहीं भाग असा ओबडधोबड खाच्याखुच्याचा आहे कीं तो कोणत्याच चौकटींत नीट बसत नाहीं.

नाना नास्तिक आहे. गेल्या चाळीस वर्षांत तो गांवच्या देवळांकडे कधीं वळला नाहीं. एकदां आम्ही बोलत बसलों होतों. रस्त्यावरून

पंढरीचे पांच–दहा वारकरी चालले होते. मी म्हणालों, "नाना, तूं पिकलें पान. पट्‌दिशीं जाशील मरून एक दिवस. पंढरीची वारी कर एखादी." नाना एकदम उद्गारला, "छत्, छत्. साहेब, असें भलतेंच काय सांगतां? या देवधर्माच्या भानगडींत मी नाहीं पडत कधीं." मी विचारलें, "देवधर्म म्हणजे भानगड कायरे?" नाना उत्तरला, "नाहींतर काय साहेब? मी एवढा म्हातारा झालों आहें. देवावाचून माझें कांहीं अडलें नाहीं बगा. पावसावांचून अडतें; पीकें मिळत नाहींत. नदीनाल्यावाचून अडतें; पाणी मिळत नाहीं. डाक्तरावांचून अडतें. देवळांतल्या देवावांचून नाहीं अडत कांहीं. लहानपणीं जात होतों देवाला, पण समजूं लागल्यापासून देवाचें नांव टाकलें. परवां म्हातारी मेली तेव्हां थोडी मनांत चलबिचल झाली; पण तें तेवढेंच तें."

मीं कुतुहलानें विचारलें, "असा देवावर कां तुझा राग?" नाना शांतपणें म्हणाला, "रागबीग कांहीं नाहीं साहेब. मला आपलें तें पटत नाहीं. तें असें आहे बगा. मला वाटतें देवांत अन् माणसांत कांहीं तरी सोईर-सुतक असावें. पण तो बसलाय देवळांत थंड, कमरेवर हात ठेवून. सत्यान्नवचा दुकाळ झाला, आम्हांला निवडुंगाचीं बोंडें पण खायला उरलीं नाहीं. पोरेंबाळें डोळ्यांसमोर पटापट मेलीं. त्या जांभुळवाडींतल्या कुंभारणीनें आपलें पोटचें मूल खाल्लें म्हणतात. पण आमचा देव जसाच्या तसा. विटेवर उभा कटीवर हात. साहेब, चंद्र माणसासारखा लहान मोठा होतो. कधीं उजेड देतो, कधीं दडून बसतो. सूर्य इकडून निघून तिकडे जातो. आमची भीमा कधीं आटते, कधीं तट्ट फुगून दुथडी भरून चालते. आम्ही सुखी तर ती

सुखी. साहेब, या सर्वांचें आमचें सोईर-सुतक आहे. पण ह्या देवळांतला देव काय कामाचा ? लहान मोठा होत नाहीं, ओला सुका होत नाहीं. आमचा मोरू मास्तर पोरें जरा चुळबुळ करूं लागलीं कीं ओरडतो, ' अरे, देवासारखीं बसा.' देवासारखें व्हायचें म्हणजे गप्प बसायचें; काम धाम नाहीं. साहेब, दुकाळांत बाया-बापड्यांनीं नवस केले, धरणें धरलीं. मी शपथ घेतली, ' माझ्या दाम्याला भुकेनें मरतांना पाहून जो देव जागचा हालला नाहीं त्याचें तोंड बघायचें नाहीं."

मी विचारलें, ' देवळांतला देव जाऊं दे. पण त्याच्या ऐवजीं दुसरा कांहीं देव तूं मानतोस कीं नाहीं, दुसऱ्या कोणाला—दुसऱ्या कशाला तरी भिऊन वागतोस कीं नाहीं ?

नाना उत्तरला, " साहेब, दुसरा देव आहे तर. ( छातीवर हात ठेवून ) हा बगा माझा देव साहेब, इमान—इमान हाच खरा देव. इमान देवाच्या बापाला ऐकत नाहीं. आतांची हवाच न्यारी. इमान नाहीं म्हणून बामण मोटेच्या बैलावाणी मागें मागें सरले. करणीमुळें. जोंधळे पेरून गहूं कसे मागायचे साहेब ? इचार आहे, तेथें आचार आहे. झाडून काढावं, हरामाची भाकर खाऊं नये. तो खूष, आपण खूष. इमानानें वागलें, म्हणजे मनाला समाधान होतें साहेब. मन मोठें ओढाळ गुरूं आहे बगा. त्याचें समाधान होणें कठीण. त्याला फसवणें फार कठीण. त्याच्यावर स्वार झालें पाहिजे. त्याला ताब्यांत ठेवलें पाहिजे; मोकाट सोडूं नये. त्याला देवाच्या, भटाबामणांच्या, पोथ्यापुराणांच्या, कोल्हाटणी तमासगिराच्या, गुत्तेवाल्याच्या, साव-सावकाराच्या कुणाच्याच आहारीं जाऊं देवूं नये. मोकाट सोडलें

म्हणजे धक्के बसतात. ताब्यांत ठेवलें म्हणजे कारभारणीसारखें समाधानानें नांदतें."

मी म्हणालों, "पण नाना, तूं तर नशापाणी करतोस म्हणे ?"

न डगमगतां नाना म्हणाला, "हो, साहेब, रोज नऊटाक घेतों. कधीं कमी नाहीं, कधीं जास्ती नाहीं. आज तीस वर्षें झालीं. कधीं माझ्या तब्येतींत बिघाड झाला नाहीं. कुणाला कधीं शिवीगाळ केली नाहीं, का कुणाच्या गळ्यांत पडून 'तूं माझा भाऊ' म्हणून रडलों पण नाहीं. अति झालें म्हणजे माती होते. मला दारुनें कांहीं झालें नाहीं. उलट आमच्या गांवचा नाऱ्याभट दूध पिऊन मेला. फुकट मिळाली म्हणून एकदां त्यानें १०।१५ शेर दुधाची साय खाल्ली. पोट फुगलें. चांगला कमरेपर्यंत त्याला वाळूंत पुरला. पण मेला. माझी म्हातारी मरेपर्यंत आफिण खात होती. कांहीं नाहीं झालें तिला. उलट शेवटच्या आजारांत तिला आफिण मिळाली नाहीं. तिनें खुणा केल्या, पण आम्हीं उमगलों नाहीं. आफिणीवांचून म्हातारी मेली."

नाना माझ्या विचारशक्तीस सारखे धक्के देत होता. बोलण्यांत आढ्यता नव्हती, आत्मगौरव नव्हता. ए. एस् बी एस् सी सारखें तो बोलत होता. त्याचा इनाम–वाद फार व्यापक होता. मला त्यांत कांहीं उणीवाहि दिसत होत्या. पण चुका दाखवणार मी कोण ? अन् जी माझ्या दृष्टीनें चूक, ती त्याच्या दृष्टीनें त्याच्या आयुष्यांत चूक होणारहि नाहीं. मी वेगळा, तो वेगळा ! त्यानें आपल्या आयुष्याची त्याच्या अनुभवांप्रमाणें नीटनेटकी गोठवण केली होती. तिनें त्याला समाधान मिळत होतें. अडदांडासारखा त्याच्या खोलींत शिरून 'हें

भांडें इकडे नको. बाज त्या कोपऱ्यांत पाहिजे. चूल इथें पाहिजे.' अशी फिरवाफिरव सुचविणारा मी कोण?

मीं कांहीं वेळानें विचारलें, "नाना, तुझें समाधान विचित्र दिसतें. तराजूच्या मधोमध लोंबकळण्यांत तुला समाधान वाटतें. त्रिशंकू आहेस तूं. तूं स्वर्गांतला नाहींस अन् पृथ्वीवरचा पण नाहींस. वेड्या, कुणाच्या आहारीं गेल्याखेरीज त्या कुणावर प्रेम कसें बसणार? अन् प्रेम केल्याखेरीज तूं कसा जगणार—कसा जगलास? कारभारणीवर तरी प्रेम केलंस का?"

माझ्या शेवटच्या प्रश्नाकडे लक्ष न देतां नाना म्हणाला, "साहेब, मला तुम्ही थंड गोळा समजतां जणूं? माझा पण आणखी एक देव आहे—नाहीं खूप देव आहेत. गांवचीं मुलें, महाराचांभारांचीं, वाण्याबामणांची, कुणब्यामाळ्यांचीं—सगळीं मुलें माझे देव आहेत. त्यांना खारिक, खोबरें, गूळ दिल्यावांचून माझा एक दिवस सुना जात नाहीं. आंत इमान, बाहेर मुलें! माझ्या घरीं मुलांचें राज्य असतें. कुणी मांडीवर, कुणी खांद्यांवर, कुणी पाठीशीं—सारे माझे देव मला सांभाळून असतात. काम असो नसो, आपला एक दोन चकरा शाळेंत घालतों. बिचारीं पोरं कशी देवावाणी गप्प बसलीं असतात. मोरू-मास्तर तापून तापून छडी आपटीत असतो. मला बघितलं म्हणजे पोरांच्या जिवांत जीव येतो. मी त्यांना हळुच वाकोल्या दाखवून येतों परत. पोरें हंसतात, मास्तर ओरडतो. मास्तर रजेवर गेला म्हणजे मीच शाळा चालवतों. एक पोर गैरहजर राहत नाहीं. मला कुठें लिहावाचायला येतंय्? सांगतों पोरांना गोष्टी. त्यांच्याशीं खेळ खेळतों अन् शेतांत नेवून त्यांना काम करायला लावतों."

कांहीं वर्षें गेलीं. मुंबईस मी मित्रमंडळीसह संध्याकाळीं गप्पा-गोष्टी करीत बसलों होतों. दरवाजावर धक्का बसला. दार उघडलें. नानानें आंत प्रवेश केला. मी आश्चर्यचकित झालों. वडगांवच्या व नानाच्या आठवणी बुजून गेल्या होत्या. नाना मुंबईस कसा? नाना हंसत हंसत म्हणाला, " कांहीं नाहीं. ममई बघावी म्हणून विचार आला. निघालों झालें. मास्तर म्हणाला, ' साहेब आतां ममईलाच आहेत.' म्हटलं साहेबांची भेट होईल अन् ममई पण बघायला मिळेल ? "

दुसऱ्या दिवशीं सकाळीं नाना जुहूला विमानें पहाण्यास गेला.

# ११
# आमचे प्रोफेसर

" Yes, you are playing " हें मोजकें वाक्य आमच्याकडे पाहात उच्चारून प्रोफेसर साने रोज संध्याकाळीं आमच्या क्रीडांगणा-वरून पुढें फिरावयास जात. यापेक्षां जास्त वाक्यें त्यांनीं कधीं उच्चारलीं नाहींत, किंवा एकाद्या खेळाडूस सलगीचा प्रश्न विचारला नाहीं.

आमचे कांहीं प्रोफेसर बुद्धिमत्तेची उणीव विनोदानें व सलगीनें भरून काढीत. सान्यांना या उपायांची जरूर नव्हती. विद्यार्थ्यांच्याच काय पण इतर प्रोफेसरांच्या भूमिकेहून त्यांची भूमिका भिन्न होती—उच्च होती. त्या भूमिकेवर त्यांनीं बायकामुलांस, आप्तेष्टांस—कोणासच येऊं दिलें नाहीं. या भूमिकेवर त्यांनीं आपलें एकाकी जीवन शंकराचार्य व प्लेटो, तुकाराम व ब्राउनिंग यांच्या सहवासांत घालविलें. साने आमच्या पातळीवर कसे उतरून येणार ? आमच्याशीं विनोद-वार्ता कशी करणार ?

परंतु अनुनासिक कोंकणी स्वरानें उच्चारलेलें तें वाक्य आम्हां विद्यार्थ्यांना पृथ्वीमोलाचें वाटे. तसें म्हटलें तर सान्यांच्यांत व आमच्यांत कांहींच साम्य नव्हतें. आमचें कॉलेज म्हणजे इंग्लंडच्या पब्लिक स्कूलच्या वळणावरचें होतें. खूप खेळावें, व्यायाम करावा व सपाटून खावें हा आमचा उद्योग. सकाळीं उठावें, थंड पाण्यानें नळाखालीं स्नान करावें, हाफ् पँट बांधीतच ' शेड ' मध्यें जावें, उषःकालच्या

अंधुक उजेडांत बारा-पंधरा जणांच्या तुकडीनं कॅप्टनच्या हुकमती-खालीं मैल दीड मैल दौड मारून यावी व मग ' शेड 'मध्यें सिंगल बार, डबल बारवर कसून कसरत करावी; संध्याकाळीं सक्तीनें हॉकी किंवा फुटबॉल यांपैकीं कोणचा तरी एक ' हार्ड ' गेम खेळावा (क्रिकेट हा ' सॉफ्ट ' गेम समजला जाई ) अन् थकल्यावर विश्रांतीसाठीं व करमणुकीखातर टेनिसचा एखादा सेट खेळावा, तशीच रॅकेट घेऊन क्लबांत जावें व दामुअण्णांनीं केलेल्या पोळ्यांवर भुकेल्या लांडग्यांप्रमाणें तुटून पडावें; रात्रीं थोडाबहुत अभ्यास करावा व लहान मुलांप्रमाणें गाढ झोंपी जावें--हा आमचा दिनक्रम.

आमचा प्रिन्सिपाल आमचा आदर्श. म्हातारा झाला होता पण अजून हॉकींत सेंटर फॉरवर्ड खेळायचा ! सकाळीं आम्हीं दौड करूं लागलों कीं स्वारी आपल्या घोड्यावरून दौडत मागून यायची. आमच्या कॉलेजांत अभ्यासी विद्यार्थ्यांस किंमत नव्हती असें जरी म्हणतां आलें नसतें, तरी त्याला महत्त्व मात्र खास नव्हतें. सेंटरला उभी किक् मारून गोल करणारा धिप्पाड देव आमचा हिरो ! त्याची आज्ञा मानण्यांत आम्हांला भूषण वाटे, त्याचें अनुकरण करण्यांत आम्हांला धन्यता वाटे.

साने आमच्याहून कितीतरी भिन्न ! तरुणपणीं ते टेनिस खेळत असें म्हणतात. परंतु आम्हां विद्यार्थ्यांच्या कित्येक पिढ्यांनीं त्यांना खेळतांना कधीं पाहिलें नव्हतें. त्यांच्या अंगावर अनावश्यक मांस नव्हतेंच पण अवश्य तेवढेंहि नव्हतें. ठेंगणा बांधा, सुदाम्याला शोभणारी कृश देहयष्टि, गालफडें वर आलेलीं, डोकें भल्या मोठ्या टेंगळासारखें पुढें डोकावणारें, डोळे खोल व भुवयांखालीं झांकलेले,

दाभणकाठी मिशा, हत्तीसारखे टवकारलेले कान—एवंगुणविशिष्ट साने आमच्या आडदांडांच्या कॉलेजांत लिलिपुटहून आलेल्या तिऱ्हाइत पाहुण्यासारखे दिसत.

पण कॉलेजला सान्यांचा व सान्यांना कॉलेजचा अभिमान वाटे. आमच्या कॉलेजला जें कांहीं विशिष्ट वळण लागलें होतें तें लागण्यास साने बरेच कारणीभूत होते. आमच्या कॉलेजच्या कांहीं विशिष्ट परंपरा होत्या. त्या अलिखित असल्या तरी युनिव्हर्सिटीच्या कायद्यापेक्षां, प्रिन्सिपालच्या हुकुमापेक्षां किंबहुना आईबापांच्या आज्ञेपेक्षां त्यांना अधिक किंमत होती, नव्या विद्यार्थ्यानें कॉलेजांत प्रवेश केला म्हणजे अरेबियन नाइटमधल्या लोहचुंबकाच्या डोंगराप्रमाणें कॉलेजच्या परंपरा त्याला आपल्याकडे ओढीत.

आम्ही नुसतेच खेळत व खात नव्हतों. आमच्यांत शिस्त होती. लष्करी शिस्त होती. आमच्यांत स्वायत्तता होती व ती जतन करण्यासाठीं आम्ही वाटेल त्याच्याशीं झगडण्यास सिद्ध होतों. आम्ही फक्त आमच्या परंपरा शिरसामान्य मानीत होतों. आम्ही फक्त त्या परंपरांची जोपासना करणाऱ्या, त्यांची अंमलबजावणी करणाऱ्या 'सीनिअर' विद्यार्थ्यांचे हुकुम मानीत होतों. सीनिअर विद्यार्थ्यांनीं राज्य करावें, अंमल चालवावा, कित्ता घालून द्यावा व ज्यूनिअर विद्यार्थ्यांनीं तो गिरवावा ही एक आमची महत्त्वाची परंपरा होती. सीनिअर विद्यार्थ्यानें कारभारी मंडळाचें अध्यक्ष व्हावें, खुर्चीवर बसावें व प्रिन्सिपॉल आणि स्टाफ यांनीं त्यांची आज्ञा पाळावी. ग्यादरिंगच्या वेळीं सीनिअर विद्यार्थ्यानें सामोरें जाऊन सन्मान्य पाहुण्याचें स्वागत करावें, त्याच्या खुर्चीला खुर्ची लावून उच्चासनावर बसावें, भाषण

करावें आणि प्रिन्सिपॉल व प्रोफेसर मंडळीनें खालीं इतरेजनांत बसावें. या आणखी कितीतरी कमी जास्ती महत्त्वाच्या कॉलेजच्या परंपरा होत्या. या परंपरा रूढ होण्यास सान्यांची दूरदृष्टी व श्रम कारणीभूत झाले होते. प्रोफेसर साने म्हणजे आमच्या कॉलेजची एक चालती बोलती परंपराच होती व म्हणून आम्हाला त्या तशा जरत्कारु व्यक्तीचा अभिमान वाटत असे.

प्रत्येक माणसाला बुद्धिबरोबर भावना ही असतेच असें मानस-शास्त्र म्हणतें. या नियमाप्रमाणें सान्यांना भावना असलीच पाहिजे. मात्र ती व्यक्त झालेली आम्हीं कधीं पाहिली नाहीं. त्यांचें बोलणें अगदीं मोजकें व रुक्ष असे. त्यांचे ओठ अगदीं पातळ व रुक्ष होते. बोलतांना त्यांची हालचाल अगदीं बेताची होत असे. सान्यांना देवानें कां ओठ दिले याचें आम्हाला कोडें वाटे. डोळे ओठासारखेच खोल. त्यांच्यांतलें गुपित हुडकून काढण्याचा प्रयत्न करावा तर भुवयांची वळचण पुढें आलेली.

सान्यांचें सारें आयुष्य लेखनवाचनांत व चिंतनांत गेलें. विलायतेंत त्यांचें नांव महशूर होतें. तिकडील मासिकांत येणारे त्यांचे लेख तिकडील विद्वान मंडळी आवडीनें व आदरानें वाची. परंतु आमच्या गांवीं त्यांना फार थोडे लोक ओळखीत. सकाळीं लिहावें, दुपारीं कॉलेजांत शिकवावें, संध्याकाळीं तास दीडतास फिरायला जावें, रात्रीं आपल्या वाचनालयांत मध्यरात्रपर्यंत वाचावें व चिंतन करावें– हा त्यांचा क्रम. यांत सहसा फरक होत नसे.

फिरायला ते एकटेच जात. चालतांना कांहींतरी पुटपुटत व बोटें मोजीत. परत येतांना शिवराम गडी कंदिल घेऊन पुढें चाले. एकदां

गम्मत अशी झाली कीं कंदिलाचा उजेड डोळ्यांवर पडून डोळ्यांना त्रास होऊं लागला. परंतु शिवरामला कंदिल दुसऱ्या बाजूस फिरवा-वयास सांगण्याइतकें भान सान्यांना कोठून असणार? त्यांनीं आपला हात कंदिलाच्या उजेडाच्या आड धरला व तसेंच घरापर्यंत आले. या नंतर अनेक वेळां आम्ही सान्यांना डोळ्यांसमोर हात धरून चालतांना पाहिलें. पण त्यांना हांसण्याची कुणाची प्राज्ञा नव्हती. कांहीं दिवसांनीं खरा प्रकार आमच्या लक्षांत आल्यावर आम्हीच शिवरामला कंदिल नीट धरून चालण्यास सांगितलें. उजेडाचा रोख बदलल्याबरोबर सान्यांचाहि हात आपोआप खालीं आला!

घरींसुद्धां साने आपल्या तंद्रींत असत. त्यांचें ताट त्यांच्या वाचनालयांतच येई. बायकोनें सर्व पदार्थ वाढूनच ताट टेबलावर आणून ठेवावें व मुकाट्यानें खोलीबाहेर जावें. जेवतांना जवळपास कोणी असलेलें सान्यांना खपत नसे. काय पाहिजे काय नको हें त्यांना विचारण्याचीहि सोय नव्हती. रात्रीं तर आठवण होईल तेव्हां —लहर लागेल तेव्हां ते जेवत.

सान्यांचें घर कॉलेजच्या आवारांतच होतें. मध्यरात्रीं सर्व कॉलेज झोपीं गेलें म्हणजे वाचनालयांत सान्यांच्या येरझारा सुरू होत. अशा शांत वेळीं त्यांचें डोकें विचारांनीं इतकें भारावलें जाई कीं त्यांच्यानें खुर्चीवर बसवत नसे. एकाद्या क्षुब्ध पण बंदिवान सिंहाप्रमाणें ते त्या लहानशा खोलींत वेगानें येरझारा घालीत.

सान्यांना भावना नव्हत्या असें म्हटलें तें अगदींच खरें नाहीं. त्या होत्या, पण जिवंत माणसांबद्दल नव्हत्या. बाराशें तेराशें वर्षांपूर्वीं होऊन गेलेल्या एका व्यक्तींत त्या सर्व केंद्रित झाल्या होत्या. ती

व्यक्ति म्हणजे श्रीशंकराचार्य. "शंकर"—त्यांचा आवडता शब्द—त्यांचें मर्मस्थळ होतें. कुणी आचार्यांबद्दल कमीजास्त बोललेलें त्यांना खपत नसे. एकदां एका घमेंडानंद बंगाली प्रोफेसरांचें आमच्या कॉलेजांत व्याख्यान झालें. भगवान गौरांगाची व भक्तिसांप्रदायाची स्तुति करतांना त्यांनीं विनाकारण आचार्यांवर दुगाण्या झाडल्या. अध्यक्षस्थानीं साने होते. आम्ही त्यांच्याकडे भीत भीत पाहिलें. डोळ्यांतून खदिरांगार बाहेर पडत होता. संतापानें कापत कापत ते बोलण्यास उभे राहिले. ते व्याख्यात्याचे आभार मानण्यास विसरले. एक तर व्याख्याते आभार मानण्याच्या लायकीचे नव्हते व शिवाय शंकराचार्यांची हेटाळणी करून त्यांनीं सान्यांचा अक्षम्य अपराध केला होता. एक तासपर्यंत सान्यांनीं व्याख्यात्यावर जळजळीत आग पाखडली, शंकराचार्यांचें व त्यांच्या अद्वैत मताचें समर्थन केलें. त्या प्रसंगास आतां उणीपुरीं २५।३० वर्षें झालीं. सान्यांना दिवंगत होऊनहि जवळ जवळ तितकींच वर्षें गेलीं. परंतु आम्ही त्यांचे कांहीं विद्यार्थी कधीं कधीं एकत्र येतों तेव्हां अजूनहि त्या प्रसंगाचें आम्हांस स्मरण होतें, आमची विनोदवृत्ति लुप्त होते व आम्ही हलक्या आवाजांत एकमेकांशीं कुजबुजूं लागतों. त्या दिवशीं सान्यांनीं आम्हांला उपनिषत्कालांत नेलें, नैमिष्यारण्यांत फिरवलें. त्या दिवशीं आमच्यापुढें सान्यांची ती नेहमींची क्षुद्र व रुक्ष मूर्ति उभी नव्हती. त्यांच्या वाणींत त्या दिवशीं वेदव्यासांचें ओज, त्यांच्या संतापांत दुर्वासाचें सामर्थ्य आणि विवेचनांत वशिष्ठांचें गांभीर्य होतें!

सान्यांची ज्ञानपिपासा दुर्दम होती. युरोपांत व अमेरिकेंत प्रसिद्ध झालेलीं तत्त्वज्ञानावरचीं निवडक पुस्तकें त्यांच्याकडे नियमानें येत

असत. हीं पुस्तकें ते नियमानें वाचीत, महत्त्वाचीं वाक्यें व शब्द अधोरेखित करीत व मार्जिनमध्यें अनेक सांकेतिक खुणा करीत. शेवटचें एक वर्ष ते बिछान्याला खिळून होते. उठून बसण्याची त्यांना शक्ति नव्हती. डॉक्टरांनीं त्यांना वर्ष दीड वर्षांची मुदत दिली होती. जगण्याची आशा नव्हती; उलट यमदेव एक एक पाऊल टाकीत अधिकाधिक जवळ येत होता....आणि सान्यांना त्याच्या प्रत्येक पावलाची चाहूल स्पष्टपणें ऐकूं येत होती. तथापि त्यांनीं वाचन सोडलें नाहीं. शेवटीं शेवटीं तीं लठ्ठ जर्मन पुस्तकें उचलण्याचें हातांत त्राण उरलें नाहीं तेव्हां सान्यांनीं पुस्तकाचें एक एक पान फाडावें व वाचावें. उजवा हात कामांतून गेला तेव्हां ते डाव्या हातानें लिहिण्यास शिकले. याच सुमारास जर्मनींत व अमेरिकेंत प्रायोगिक मानसशास्त्रास सुरवात झाली होती व महत्त्वाचे शोध प्रसिद्ध होत होते. साने तशा त्या असहाय स्थितींत अधाशाप्रमाणें तिकडील ग्रंथ व संशोधनावरील मासिकें वाचीत व काळजीपूर्वक टिपणें लिहून घेत. जसजसा मृत्यु जवळ येत चालला तसतशी त्यांची ज्ञानपिपासा वाढूं लागली. त्यांना या शेवटच्या दिवसांत दुःख एवढेंच वाटे कीं मानस-शास्त्राच्या मंदिराचें एक नवीन दालन उघडलें जात होतें पण त्यांत त्यांना प्रवेश नव्हता, त्यांच्या भाग्यांत केवळ दारांतून डोकावून पाहणेंच होतें. मोझेसप्रमाणें त्यांना Promised Land दिसत होती पण मोझेस-प्रमाणेंच नदी ओलांडून तिचा ताबा घेण्याचें त्यांच्या नशिबीं नव्हतें!

सान्यांनीं शिकवणेंहि थांबवलें नाहीं. वास्तविक ते रजेवर होते. कॉलेजचें काम करण्याचें त्यांना कांहीं कारण नव्हतें. परंतु त्यांची कर्तव्यनिष्ठा इतकी जाज्वल्य होती, कीं आमच्या फिलॉसॉफी

ग्रूपला अर्धवट शिकवून तसेंच सोडणें त्यांना प्रशस्त वाटलें नाहीं. तो देखावा जितका गंभीर तितकाच हृदयद्रावक होता. अस्थिपंजर झालेले साने शरपंजरीं खिळलेले, भोंवतीं पुस्तकें व टिपणवह्या पडलेल्या. आम्हीं सात आठ विद्यार्थी त्यांच्या बिछान्याभोंवतीं खुर्च्या घेऊन बसलों. सान्यांच्या विवेचनाचा प्रवाह सारखा चालत असे. मधून मधून पोटांत कळ येई, वेदना असह्य होत, तेव्हां ते बोलणें थांबवून कुशीला वळत. हेतु हा कीं, आपली ती केविलवाणी स्थिति—ते हाल आम्हीं पाहूं नयेत व सहानुभूति दाखवूं नये. सहानुभूतीची तर त्यांना फार चीड. आम्हीं बापडे मुकाट्यानें मान खालीं घालून कांहीं तरी लिहिण्याचें निमित्त करीत असूं. अंमळशानें वेदना कमी झाल्यावर साने आमच्याकडे वळत व परत बोलूं लागत. आम्हींहि कांहीं झालें नाहीं असें दाखवीत असूं. एकदा एकजणानें थोडीशी सहानुभूती व्यक्त करण्याचा प्रयत्न केला. सान्यांनीं त्याला खोलीबाहेर घालवलें. प्रत्यक्ष बायकोला कारणाशिवाय आपल्या रुग्णशय्येपाशीं ज्यांनीं शेवटपर्यंत उभें राहूं दिलें नाहीं, ते परक्या विद्यार्थ्यांच्या सहानुभूतीला काय महत्त्व देणार ?

साने शेवटपर्यंत आमच्या ग्रूपला शिकवीत होते. शेवटच्या दिवशीं तास संपल्यावर 'उद्यां येऊं नका' म्हणून हलक्या आवाजांत त्यांनीं आम्हांला निरोप दिला. त्या आवाजांत थोडी आर्द्रता असावी असा आम्हांला संशय आला, ज्या कॉलेजांत २५।३० वर्षें शिकविलें, त्याच्या शेवटच्या फिलॉसॉफी ग्रूपला शेवटचा पाठ देतांना त्यांच्या अंतःकरणांत थोडीबहुत खळबळ उडाली असावी असें आम्हांला वाटलें. पण आम्ही जड पावलांनीं भीतभीतच खोलीबाहेर पडलों.

ती रात्र कॉलेजनें जागून काढली. सर्वांचे डोळे समोर दिसणाऱ्या त्या बसक्या घराच्या वाचनालयांतल्या एका खिडकीकडे लागले होते. कांहीं दिसत नव्हतें. अंधुक दिवा तेवत होता. पण आम्हीं सर्वजण भयचकित मुद्रेनें त्या खिडकीकडे पाहात होतों. दिसत नसेना, आमचें अंतःकरण आम्हांला ग्वाही देत होतें, त्या खिडकींतून रात्रीं ते दोन रुक्ष डोळे—ते दोन खोल गेलेले डोळे—कॉलेजच्या इमारतीच्या अंधुक आकृतीकडे पाहात पाहात तिचा शेवटचा निरोप घेत होते !

सकाळीं आम्हीं आमच्या पूज्य गुरूस आमच्या खांद्यावरून नेलें. साऱ्यांचा दरारा विलक्षण, त्यांना सहानुभूतीची चीड ! आम्हीं निःशब्दपणें त्यांना स्मशानांत पोहोचविलें !

मात्र आमच्या सर्वांच्या मनांत साऱ्यांच्या आवडत्या 'Grammarian's Funeral'* मधील ओळी घोळत होत्या.

Our low life was the level's and the night's; His for the morning !

Step to a tune, square chests, erect the head, 'Ware the beholders !'

This is our Master, famous, calm, and dead, "Borne on our shoulders."

* Browning.

# १२

# म्हाताऱ्यांचें गांव

तुम्हीं नाना प्रकारचीं गांवें पाहिलीं असतील. तरुणांचें गांव पाहिलें असेल, कदाचित् मुलांचें गांव पाहिलें असेल—मीं तें नेहमीच पाहत असतों, पण तुम्हीं कधीं म्हाताऱ्यांचें गांव पाहिलें आहे काय ? ऐकलें आहे काय ?

मी तरी कशाला मुद्दाम म्हाताऱ्यांचें गांव पाह्यला जातोंय्. पण योग आला खरा. गेल्या वर्षीं हिंवाळ्यांत एके दिवशीं माझा मुक्काम —गांवच्या डाक बंगल्यांत होता. सकाळची वेळ. चहा आटोपून मी दुसऱ्या गांवीं जाण्याची तयारी करीत होतों व जामानिमा चढवतां चढवतां शिक्षकमंडळींशीं बोलत होतों.

इतक्यांत तीन चार म्हाताऱ्यांनीं खोलींत प्रवेश केला. मीं प्रश्नार्थक मुद्रेन त्यांच्याकडे पाहिलें. त्यांच्यांतील एकजण म्हणाला, " साहेब, आमचा गांव इथून जवळच पांच सात मैलांवर आहे. आपण आमची शाळा पहावी अशी फार इच्छा आहे. आल्यास उपकार होतील."

ही बुड्ढी मंडळी लष्करी पेन्शनर होती. त्यांचे खाकी रंगाचे कोट, लष्करी थाटाचे पटके, उभी राहण्याची ढब, लष्करी सलामी देण्याची ऐट पाहून मला कौतुक वाटलें. मी म्हणालों, " मी आतां पुढें जाण्यास निघालों आहें. पण माझी मोटर तुमच्या गांवीं नेतां येत असेल तर मी अवश्य येतों."

मला काय माहित त्या म्हाताऱ्यांचें गांव कुठें व कसें आहे. मी सहजभावानें बोललों. जवळ बसलेले एक शिक्षक हांसून म्हणाले, "होय, साहेब, मोटर जात असेल तर जावें त्यांच्या गांवीं." म्हातारी मंडळी आपसांत कुजबुजूं लागली. त्यांचा म्होरक्या म्हणाला. 'साहेब आपली मोटर नेण्याची तजवीज होईल. पण आतां आपण धांदलींत आहांत आम्हीं आग्रह करीत नाहीं. सहा महिन्यांनीं तपासणीला परत याल तेव्हां भेटूं. सर्व म्हातारे रांगेंत 'अटेन्शन' करून ताठ उभे राहिले. त्यांनीं मला लष्करी सॅल्यूट केला व अबौट टर्न करून ते रवाना झाले.

मींहि पुढें कुच केलें व त्या म्हाताऱ्यांना व त्यांच्या गांवाला विसरून गेलों. पांच सहा महिन्यांनीं परत माझा त्या बंगल्यांत मुक्काम झाला. म्हातारे पाळतीवर होते. मीं टोपी खुंटीला टांगून खुर्चीवर बसतों न बसतों तोंच ती म्हाताऱ्यांची तुकडी माझ्यासमोर अटेन्शन करून उभी राहिली. त्यांची मुद्रा विजयी होती, चर्या करारी होती. तो म्होरक्या म्हणाला, "साहेब, तयारी झाली. उद्यां आपण मोटारनें आमच्या गांवीं चलावें." 'तयारी झाली' याचा अर्थ आम्हा फिरत्या अंमलदारांना एकच माहित. तयारी झाली म्हणजे कोंबडे कापले किंवा बासुंदी पुरीची सिद्धता झाली! मी म्हणालों, "मला तुमची तयारी नको. कबूल केल्याप्रमाणें मी तुमची उद्य सकाळीं शाळा पाहीन व परत येथें मुक्कामाला येईन."

तो म्होरक्या मिलिटरी माणूस. तो मला काय दाद देतोय? तो निश्चयपूर्वक म्हणाला, "साहेब, उद्यां मुक्काम आमच्या गांवींच झाला पाहिजे. आमची मीठ-भाकर खाल्ली पाहिजे. उद्यां येथें आपल्याला

कांहीं काम करतां यायचें नाहीं, सारे वकील, मास्तर, शेटसावकार झाडून साऱ्यांना उद्यांचें आंवतण केलें आहे. उद्यां येथली शाळा बंद."

मीं तात्काळ हेरलें, उद्यां कांहीं तरी गमतीचे अनुभव येणार. म्हातारी मंडळी परत गांवीं गेली. दुसरे दिवशीं सकाळीं उठून बाहेर येतो तों बंगल्यासमोर तीन माणसांनीं गच्च भरलेल्या मोटारी माझी वाट पाहत उभ्या होत्या! त्या मोटारींमध्यें गांवची सर्व ठळक मंडळी बसली होती. जणूं काय ते लष्करी म्हातारे Conscription पुकारून या सर्व पुढारी मंडळींना सैन्यांत भरती करण्यास घेऊन चालले होते! पुढच्या दोन मोटारींच्या फ्रंटसीटवर एक एक म्हातारा वाट दाखवायला बसला होता. तिसऱ्या मोटारीची पुढची जागा मजसाठीं राखून ठेवली होती. मी मुकाट्यानें जाऊन बसलों.

मोटारी चालू झाल्या. दोन अडीच मैल गेल्यावर आम्हांला एक ल्हानशी घाटी लागली. तोंपर्यंत रस्ता ठीक होता. घाटी चढल्यावर अफाट असें कातळ दिसलें. रस्ता सरळ पुढें गेला होता. पण पुढच्या मोटारींतील म्हातारबुवांनीं ड्रायव्हरला उत्तरेकडे मोटार नेण्याचा हुकूम दिला. त्या दिशेला रस्त्याचा मागमूस नव्हता. ड्रायव्हर कुरकुरूं लागला. बुवा संतापले, "लेका, तुझ्या मोटारीला धक्का लागला तर भरून देईन." ड्रायव्हरला असें आश्वासन देवून त्यांनीं भरतीला मोडक्या इंग्रजींत त्याला लष्करी शिव्या हांसडल्या.

मोटारी कातळावरून चालूं लागल्या. एक फर्लांग गेलों न गेलों तोंच चुन्यानें कातळावर काढलेल्या दोन रेषा स्पष्ट दिसूं लागल्या. या रेषांमधून मोटारी जाण्याचा रस्ता त्या म्हाताऱ्यांनीं केला होता, मधून मधून खड्डे खळगे होते तेथें भर घालून रस्ता तयार केलेला

दिसत होता. एका ठिकाणीं तर मोठमोठ्या दगडांची भर घालून त्यावर माती पसरून मोटारी पुढें नेण्याची व्यवस्था केली होती. दर फर्लांगावर एक म्हातारा रस्त्याच्या कडेला उभा होता. मोटारी जवळ येतांच तो लष्करी सलामी देई व हातांतलें निशाण फिरवी.

आतां कुठें माझ्या डोक्यांत प्रकाश पडला. म्हाताऱ्यांनीं पांच सहा महिने मुदत कां मागितली तें आतां मला उमगलें. आमच्या शिक्षकानें थट्टा केली, एक प्रकारचें त्या म्हाताऱ्यांना आव्हान केलें. त्यांनीं आपल्या लष्करी बाण्याप्रमाणें तें शांतपणें स्वीकारलें व दोन अडीच मैल रस्ता स्वतःच्या हातानें तयार करून मोटारी आपल्या गांवच्या शाळेपर्यंत नेल्या !

आम्हीं शाळेपाशीं येऊन पोहोचलों. तेथें सर्व गांवकरी आमच्या स्वागतासाठीं जमले होते; पण इतर ठिकाणीं दिसून येणारा गोंधळ, गडबड, अव्यवस्था यांचा तेथें मागमूसहि नव्हता. शाळेच्या इमारतीच्या एका बाजूस मांडव घातला होता व त्यांत व्यवस्थितपणें गांवकरी बसले होते; पण गम्मत अशी कीं जमलेल्या लोकांत औषधाला कोणी तरुण नव्हता. सारेच म्हातारे ! माझ्याबरोबरीचे एक वृद्ध वकील मला हंसत हंसत म्हणाले, “ आहे कीं नाहीं गम्मत ? अहो, हा बोलून चालून म्हाताऱ्यांचा गांव ! येथें तुम्हाला तरुण मनुष्य सहसा दिसणार नाहीं. म्हातारे आणि त्यांचे शाळेंत जाणारे नातू अन् पणतू ! सारी तरुण मंडळी तुमच्या मुंबईस पोलिसांत, गिरण्यांत किंवा लष्कर, इंदूर, धार व ब्रिटिश मुलखांतल्या फौजेंत नोकरी करतात. येतात कधीं कुळधर्म-कुळाचारांसाठीं. पण त्यांच्यावांचून या म्हाताऱ्यांचें कांहीं अडत नाहीं.”

आमच्या स्वागतासाठीं गार्ड ऑफ ऑनरच्या दोन रांगा उभ्या होत्या. पहिली लष्करी व पोलिस पेन्शनर म्हाताऱ्यांची व दुसरी तिच्या मागें त्यांच्या नातवांपणतवंडांची. म्हातारे आपले फाटके तुटके कां होईना लष्करी खाकीचे चामड्याच्या बटनांचे कोट घालून, मिशांचे आकडे पिळून, छाती काढून उभे होते. कोणाच्या कपाळांवर त्रिपुंड्र शोभत होते तर कोणी चंदनाचा गरगरीत टिळा व कानशिलांवर मुद्रा लावल्या होत्या. पोरेंसुद्धां स्नान करून स्वच्छ लंगोट्या घालून आलीं होतीं. सर्वत्र लष्करी स्वच्छता, टापटिप व व्यवस्था दिसत होती. स्वागतसमारंभ छोटासाच, पण सर्व कामें वेळेवर झालीं. मुलांचीं गाणीं संपल्यावर मास्तर ' कृपासागर 'नी सुरुवात करून लांबलचक भाषण करण्याचा मनसुबा करीत होता, पण एका गलमिशावाल्या म्हाताऱ्यानें असे डोळे वटारले कीं त्यानें दोन मिनिटांत आपलें भाषण पुरें केलें.

मास्तर एकंदरींत त्या म्हाताऱ्यांशीं वचकून वागतांना दिसला. पुढें दुपारीं आम्हीं गप्पा मारीत असतां एका म्हाताऱ्यानें त्याबाबत खुलासा केला. तो म्हणाला, " साहेब, रागावूं नका. पण बघा तुमच्या या मास्तर लोकांत कांहीं शिस्त नाहीं. शाळा सोडून पळून काय जातात. खोटे अर्ज काय करतात, भांडणें काय लावतात. आमच्या शेजारच्या गांवचा एक मास्तर आहे. त्याला तें गांव नाहीं आवडत. तो दर सहा महिन्यांनीं रजेचा अर्ज करतो अन् लिहितो बायकोचें बाळंतपण नजीक येऊन ठेपलें आहे. आमच्या शाळेवर एक असाच मास्तर आला होता. शुक्रवारची शाळा करून पळून जायचें अन् मंगळवारीं हजर व्हायचें अशी त्याची संवय. आमच्या

गांवीं आल्यावर एक दोनदां गेला तो पळून असा. आम्ही बोलून चालून लष्करी माणसें. आम्हांला हें कसें चालणार ? आमचा कायदा पण लष्करी. तुमच्या दिपोटीना अर्ज करायचा, त्यांनीं तीनचार महिन्यांनीं चौकशी करायची अन् शेवटीं काय तर मास्तरला ताकीद मिळायची. या भानगडींत आम्ही नाहीं पडलों. शुक्रवारीं पाळत ठेवली, मास्तर लपून छपून लागला जाऊं. पाठवली एक तुकडी त्याला गिरफदार करायला. आणला पकडून अन् शाळेंत केलें त्याचें कोर्ट मार्शल. दिली दोन दिवसांची अंधार कोठडीची सजा. सोमवारीं बाहेर काढला. सांगितलें, ' मास्तर, तुमचा हा पहिला गुन्हा म्हणून माफक सजा दिली. दुसऱ्या गुन्ह्याला अंधार कोठडी अन् कांजी, तिसऱ्या गुन्ह्याला चक्की, चौथ्याला फटके. सारें लष्करी कायद्याप्रमाणें होईल. लिहून घ्या सारें.' मास्तर हातापाया पडला. सुतासारखा सरळ वागूं लागला. साल अखेर खटपट करून त्यानें आपली मुकाट्यानें बदली करून घेतली. आतां आम्हांला चांगले मास्तर मिळतात. आम्हीहि त्यांना राह्याला घर, मराठा असेल तर दर पंधरवड्याला कोंबडी, ब्राह्मण असेल तर दूध, भाजीपाला सारें देतों."

शाळा तपासल्यावर आम्हीं गांव पाहिला. कोंकणांतला गांव तो. समांतर टेकड्यांच्या दुबेळक्यांत बसला होता. मधून एक लहानशी नदी वहात होती. व तिच्या पाण्यावर वायंगणी ( उन्हाळी ) भात पिकत होतें. सीमेवर टेकडीवरून एक व्हाळ वहात होता. त्याचें पाणी या म्हाताऱ्यांनीं श्रीशंकराच्या देवालयाजवळ गोमुखांतून आणून तेथें स्नानाची उत्तम व्यवस्था केली होती. तेथून तें पाणी बाहेर काढून त्याच्या साह्यानें एक छानदार बगीचा तयार केला होता.

तें गांव म्हणजे त्या म्हाताऱ्यांची एक कर्मभूमि होती. पेन्शन घेतल्यावर ते कमलभक्षक होऊन स्वस्थ बसले नव्हते. त्यांनीं स्वकष्टानें शाळेची इमारत बांधली, शाळा वाढवली, इंग्रजी वर्ग सुरू केला. एक शंकराचें व एक विठ्ठल–रखमाईचें देऊळ बांधलें, नदीला बांध घातले, शेतांना ताल्या बांधल्या. बगिचा थाटला व देवळाच्या सभामंडपांत सहकारी संस्थेची कचेरी काढली. या सभामंडपांत सर्व मंडळी नित्यनियमानें जमे, सर्व प्रश्नांवर चर्चा करी व चर्चेंत जें ठरे तें सर्वजण अंमलांत आणीत. या बैठकींत ‘ शेतकी व शेतकरी ’ व इतर मासिकें आणि रामविजय, पांडवप्रताप, भक्तलीलामृत वगैरे पोथ्या यांचें वाचन नियमानें होत असे. गांवाला येण्यास नीट रस्ता नव्हता तो माझ्या भेटीच्या निमित्तानें तयार झाला.

म्हाताऱ्यांना भांडण्यास, गटारगप्पा करण्यास वेळ नव्हता. मात्र तरुण माणूस हा त्यांचा थट्टेचा विषय होता. त्यांच्यांत अवेळीं पेन्शनींत निघालेलीं ५०।५५ वर्षांचीं दोनचार ‘ पोरें ’ होतीं. त्यांना म्हातारे ‘ बच्चे लोग ’ म्हणत व त्यांची नेहमीं थट्टा व्हायची. म्हाताऱ्यांचें वय समजणें कठीण होतें. त्या गांवचा म्होरक्या चांगला पाउणशें वर्षांचा होता. तो २०–२५ वर्षें पेन्शन खात होता. त्याचें मी आमच्या बैठकींत कौतुक करूं लागलों. पलीकडे कोपऱ्यांत दुसरे एक बुवा बसले होते. त्यांना तें सहन झालें नाहीं. ते उठून माझ्यापुढें ताठ उभे राहिले अन् म्हणाले, “ साहेब त्या पोराला काय तुम्ही वाखाणताय् ? झालीं असतील त्याला सत्तर-पाउणशें वर्षें. पण अवतार पहा त्याचा. आतांच खोकूं लागलाय्. घाटी चढला कीं बसतोय खालीं. हीं अलिकडचीं पोरें, साहेब.

यांना आमची ताकद कुठून येणार?" मीं विचारलें, "पण बुवा, तुम्हीं कोण?" बुवा म्हणाले, "मी याचा काका ना? हा पोर माझ्या कडीखांद्यावर खेळलाय. याचा काय दिमाख? याचे दांत बघा दांत. नुसतें बोळकें झालंय. साहेब, मी अजून दांताखालीं काटकन् नळी फोडतों. या पोराला वरंवटा लागतो. तो पलीकडे बसलाय पिंजारलेल्या मिशावाला. परवा पेन्शनींत आला. माझा नातू तो. मीं आदरानें विचारलें, "मग बुवा, पेन्शन किती खाल्लंत?" बुवा म्हणाले, आठवत नाहीं नक्की. पण झालीं असतील सत्तेचाळीस अठ्ठेचाळीस वर्षे. सांगा साहेब, हा माझा पुतण्या म्हातारा तर मग मी कोण? मी चटकन् उत्तर दिलें, "म्हाताऱ्याचा काका," पण त्यानंतर म्हाताऱ्यांच्या वयांबद्दल कौतुक करण्याचें मीं सोडून दिलें. हो, काय घ्या? एकाद्याला म्हातारा म्हणावें अन् तो 'बच्चा' निघावा, एखाद्याला तरुण समजावें अन् तो खरोखुरीचा म्हातारा निघावा.

संध्याकाळीं मंडळी आम्हांला पोहोचवायला गांवठाणापर्यंत आली. मोटारी सुरू होण्यापूर्वीं आम्हांला सर्वांनीं सलामी दिली. मोटरीबरोबर दोन पावलें चालत येऊन तो म्हाताऱ्याचा काका म्हणाला, "साहेब, पुढच्या वर्षीं जरूर या. यंदा रस्ता घाईघाईत केला. पुढच्या सालीं बघा कसा फक्कड रस्ता बनवतों."

मोटारी पुढें गेल्या. मीं वळून पाहिलें. सारे म्हातारे छात्या काढून ताठ उभे होते, हंसत होते व आम्हांला हातांनीं खुणावत होते!

# १३

# कविराज चंद्रशेखर

१९१०–११ साल असेल. मे महिन्यांत संध्याकाळीं बगलेंत कवितांची वही व हातांत घाम पुसायचा रुमाल घेऊन मी मामांच्या पोळांत प्रवेश केला. पुष्कळ घरीं चौकशी केली, परंतु महाराष्ट्राच्या एका कविश्रेष्ठाच्या घराचा पत्ता त्यांच्या अरुंद गल्लींतील कोणाहि रहिवाशास माहित नव्हता. शोध करीत करीत मी एका अगदीं शेवटच्या घराच्या चिंचोळ्या बोळांत शिरलों. बोळांत अंधार होता. चांचपडत जावें लागलें. दहा पंधरा पावलें चालल्यावर एक लहानसा दुसोपी चौक लागला. चौक ओलांडून अंधारांत पुढें होऊन मी हाक मारली. 'कोण आहे?' अंधारांतूनच एक उग्र पण भरीव आवाज आला व लगेच दिव्याच्या लहानशा वर्तुलामध्यें ठेंगणीशी पण कसदार देहयष्टि, विशाल पण त्रस्त डोळे, काळी कुळकुळीत लांब व टोकाला गांठ मारलेली शेंडी, स्वच्छ साधा पंचा, अशी कविराजाची मूर्ति दिसली. "दत्त कवींचा मुलगा" हे माझे शब्द ऐकतांच त्यांची मुद्रा बदलली. डोळ्यांत अश्रु आले व गहिंवरून ते मला भेटले. याप्रमाणें अंधारांतच आमचा परिचय झाला.

बडोद्यास अंधारांतच चंद्रशेखरांचें आयुष्य गेलें. वैद्यकीय खात्याच्या कचेरींत रक्त आटवून कारकूनी करावी; संध्याकाळीं देवदर्शनास जावें व रस्त्याच्या कडेनें परत घरीं यावें; हातपाय धुवून व माडीवरील

मठींत बैठक मारावी व काव्यचिंतनांत मध्यरात्र जागवावी. सकाळीं उशिरां उठावें, स्नान करून सूर्योपासना करावी व पोटांत दोन घास घालून कचेरीचा रस्ता धरावा. यात्रमाणें चंद्रशेखरांचें आयुष्य गेलें. बडोदें त्यांना ओळखत नव्हतें. गरीब कारकुनाला कोण ओळखणार ? बडोद्यास बडेबडे पाहुणे पाहुणचार घेऊन गेले. वक्ते आले, ग्रंथकर्ते आले, कवि आले, धर्मोपदेशक आले. सर्वांचे सत्कारसमारंभ झाले, यथायोग्य संभावना झाली. संभावना–विचारपूस झाली नाहीं मात्र चंद्रशेखरांची. त्यांचा जन्म ३०।४० रुपयांवर कारकुनी करण्यांत गेला ! टिळकांनीं म्हटलें आहे, " जातीच्या भ्रमरास सोडुनि फुलें घे फोड हीं लाकडें । ऐसें कोण म्हणेल कोण भलतें घालील हें साकडें ॥ " असलें भलतें साकडें बडोद्यास चंद्रशेखरांस घातलें होतें.

चंद्रशेखर संस्कृतीनें प्राचीन होते. अभिरुचि व मनोरचना या गुणांनीं ते भवभूति व जगन्नाथ पंडिताचे समकालीन होते. ते समकालीनांप्रमाणें प्राचीन कवींचा उल्लेख करीत. त्यांच्या इतकी भूतकालांत वावरणारी आणि रमणारी व्यक्ति मीं अद्यापि पाहिली नाहीं. वर्तमान परिस्थितीशीं त्यांचें कांहींच साधर्म्य नव्हतें. बडोद्यानें केलेल्या अवहेलनेनें तर ते भूतकालांत अधिकच गुंगून गेले होतें. कचेरींतून घरीं आल्यावर ते खुंटीला उपरणें व पागोटें ठेवीत. बडोद्याची धूळ झाडीत व हातपाय धुवून माडीवर आपल्या मठींत व भूतकालांत शिरत, मग आपण गरीब आहोंत, कारकून आहोंत, उपेक्षित आहोंत हें सर्व ते विसरून जात. ते कालिदासाबरोबर राजदरबारीं बसत, वाल्मीकीसह तमसेच्याकाठीं समिधा गोळा करीत, जगन्नाथ पंडिताबरोबर दिल्लीश्वराच्या कृपाछत्राखालीं लवंगीशीं प्रणया-

लाप करीत. त्यांना विसाव्या शतकांतले ब्राह्मण मराठे दिसत नव्हते. शापादपि शरादपि प्राचीन ब्राह्मणांच्या सहवासांत त्यांचें आयुष्य गेलें. आश्रमांत तपसाधन करून त्या तपाचा अंशभाग क्षत्रियांना देणाऱ्या ब्राह्मणांचें रक्षण करणाऱ्या राजांच्या मांडीला मांडी लावून ते बसत. प्राचीन समाजव्यवस्था, ब्राह्मणांचें तपःसामर्थ्य, क्षत्रियांचें तेज, प्राचीन नगरें, विलासमंदिरें, वाटिका, प्रासाद, प्राचीन राजे त्यांच्या राण्या आणि परिवार; प्राचीन राजकवि, पंडित, नर्तिका, वीट त्यांना डोळ्यासमोर दिसत व या प्राचीन वातावरणांत ते रंगून जात. मामाच्या पोळांत आणि विसाव्या शतकांत चंद्रशेखर मनानें कधींच राहिले नाहींत.

आमच्या त्या मामाच्या पोळांतील मठींतील बैठका मी कधीं विसरणार नाहीं. आम्हीं तरुण मंडळी बहुधा श्रवणभक्तीच करीत असूं. बडोद्यांत ते उन्हाळ्याचे दिवस, अंगांतून घामाच्या धारा चालत. पण बैठक जमली म्हणजे कोणाला कशाचें भान नसे. रोज उशिर होई, रात्रीच्या तोफेची वेळ जवळ येई, कधीं कधीं तोफ होऊनहि जाई. खालून चंद्रशेखरांना फराळाचीं बोलावणीं येत; पण काव्यानंद चालू राही. अनिच्छेनें आम्ही बिऱ्हाडीं परत जातांना ऐकलेल्या ओळी गुणगुणत जात असूं. रस्त्यावरचे लोक हांसत, पण आम्हाला त्याचें भान नसे. इंदुरला परत जाण्याच्या वेळीं तर बैठकीला फार रंग भरे. आम्हीं जेऊनच चंद्रशेखरांकडे जात असूं. रात्रभर काव्यगायनाचा जलसा होई. झुंजू मुंजू झालें म्हणजे आम्हीं कविराजांचा निरोप घ्यावा व तसेंच उठून स्टेशन गांठावें. या आमच्या स्टेशनच्या प्रभातफेऱ्यांत चंद्रशेखरांच्या कवितांचेंच गायन होत असे व तें गाडी सुटेपर्यंत थांबत नसे.

समोर एक सुंदर लहानशी पेटी ठेवून चंद्रशेखर बसत. कधीं स्वतःच्या कविता, कधीं जगन्नाथ पंडितांचा एखाद दुसरा सुंदर श्लोक, कधीं त्यांना आवडणारी एखादी इंग्रजी कविता, तर कधीं "अर्वाचीन कवितेंतून" लेंभे, मोगरे, कीर्तिकर वगैरेंच्या आवडत्या कविता यांची हाजरी होई. चंद्रशेखरांना गाणें येत नसे; पण त्यांचा गळा गोड असे व म्हणण्यांत विलक्षण प्रेमळपणा व गांभीर्य भरलेलें असे. म्हणतां म्हणतां अनेक प्रसंगीं ते देहभान विसरत व गहिंवरून जात. "काय मजा आहे!" म्हणून आपणच जिभल्या चाटून गहिंवर दाबून ते पुढें म्हणूं लागत. त्यांच्याइतक्या मनोभावानें व तल्लीनतेनें फक्त तांबेच कविता म्हणूं जाणत; इतरांना तें साधलें नाहीं. फार रंग भरला म्हणजे चंद्रशेखर उठून उभे राहत व पाठी-कडे एकमेकांत हात जुळवून खोलींत येरझारा करीत. आम्ही चकित व श्रद्धामय मुद्रेनें त्यांच्याकडे वर पहात असूं. ते मध्येंच थांबत, आमच्याकडे वळत, एक गुडघा किंचित् वांकवीत व आवेशानें आणि आवेगानें परत कविता म्हणूं लागत. "कसा आहे झेलम कांठचा गालिचा?" असें म्हणून ते हंसत व परत फेऱ्या घालीत. अशा प्रसंगीं कधीं ते काव्यकलेचें सुंदर वर्णन करीत तर कधीं मम्मट किंवा वर्डस्वर्थ यांच्या व्याख्यांची चर्चा गंभीरपणानें करीत. राव-बहादुर महाजनींच्या "केवळ समाधी"च्या व्याख्येचा ते वारंवार उल्लेख करीत. "परत ये परत ये मम मनोमय मृगा। वय तुझें जिवलगा सरत ये सरत ये ॥" ही कविता म्हणतांना तर चंद्रशेखर बहार करीत. "अमृत तें गरलसे" या चरणापर्यंत आल्यावर ते नागासारखे डुलूं लागत. अशा प्रसंगीं त्यांच्या डोळ्यांत ओतप्रोत

उल्हास भरलेला दिसे. "वसंत माधव" म्हणतांना "माझ्या मना सवंगड्या थिजलास कां रे" या एकोणचाळिसाव्या श्लोकापासून योगसमाधीचें वर्णन करतांना ते चाल बदलीत, वेग कमी करीत आणि कांपऱ्या व हलक्या आवाजांत म्हणूं लागत. या वेळीं ती खोली त्या अंधुक उजेडांत एका सूक्ष्म व पवित्र वातावरणानें भरून जाई. "या होऊं भाऊ" हें आपलें एकुलतें एक पद म्हणतांना त्यांची भूमिका इतकी उज्ज्वल असे कीं हिमालयाच्या पवित्र शिखरावर बसून कोणी वेदकालीन महात्मा विश्वास आवाहन करीत आहे असें आम्हांस भासे. "गोदागौरवा" चीं तर पारायणें होत. अशा प्रसंगीं नाशिकला गोदातटाकीं काढलेल्या बाळपणाच्या आठवणी निघत—'भटजी'च्या मठांतील आरास, ते जुने पटाईत पोहणारे गडी, नदीवर फिरावयाला आलेले गुलहौशी लोक, यांचें ते मार्मिक वर्णन करीत.

आपण कवींचे आत्मलक्षी ( Subjective ) आणि परलक्षी ( Objective ) असे वर्ग पाडतों. आम्हांस आत्मलक्षी कवी विशेष आवडतात. कारण त्यांचें जीवन व काव्य हीं एकरूप झालेलीं आम्हांस दिसतात. काव्य त्यांच्या जीवनाचें प्रतिबिंब असतें. तांबे याच कारणानें नवीन पिढीचे आवडते कवि झाले आहेत. ज्यांच्या जीवनाचा त्यांच्या कलाकृतीशीं फारसा संबंध नाहीं, ज्यांची कला स्वानुभवावर अधिष्ठित नाहीं त्यांच्याविषयीं आम्हांस फारशी सहानुभूती वाटत नाही. जेथें कवींत अनुभूती नाहीं तेथें वाचकास सहानुभूती कोठें येणार ?

मला कलावंतांचें असलें स्थूल वर्गीकरण आवडत नाहीं. व्याकरणानें शब्दसृष्टीचे वर्ग ( Parts of speech ) करून शब्दांचें

व्यक्तिमत्त्व नाहींसें केलें ती अवस्था वर्गीकरणानें कलावंतांची होणार आहे. कोण इसम कोणत्या गटांत पडतो हें हुडकतांना इतर इसमाशीं असलेलें त्याचें साधर्म्य पाहण्याकडे आमची दृष्टी असते. इतरांहून त्याच्यांत विशेष निराळें असें काय आहे हें आम्हीं पाहत नाहीं. चंद्रशेखरांना परलक्षी ठरवून मोकळे होण्यांत असाच अन्याय होणार आहे. चार लोकांना दिसणारें त्यांचें रुक्ष एकमार्गी जीवन त्यांच्या काव्यांत प्रतिबिंबीत झालें नाहीं, हें सत्य आहे. पण मी एक मेडिकल खात्यांतील कारकून आहें, जग माझ्यावर अन्याय करीत आहे, असें म्हणून त्यांनीं करुणगीतें गावीं असा आम्ही आग्रह कां धरावा? बाह्य जीवनाहून भिन्न असें चंद्रशेखरांचें आंतरजीवन होतें. त्यांतच ते गुंगून गेलेले असत. दारिद्र्य, हाल, अवहेलना यांचीं त्यांच्या ओजस्वी व प्रसन्न काव्यावर शबल छाया पडूं शकली नाहीं इतकं तें आंतरजीवन प्रभावी होतें. जुन्या पिढींतील संयम हा गुण--कदाचित् कांहींना तो अवगुण वाटेल--चंद्रशेखरांत होता. स्वतःच्या जीवनाचें स्पष्ट चित्र वाङ्मयांत चित्रित करणें, चार-चौघांत वस्त्रें फेकून नागवें हिंडण्यासारखें आहे, असें त्यांच्या पिढीस वाटत असे. वस्त्रें पाहिजेतच व तीं सुंदर, शरीराला खुलवून दाखविणारीं, इतकेंच नव्हे तर शरीराचे अवगुण झांकणारीं अशीं पाहिजेत असें त्यांना वाटे. स्वतःचा अनुभव सांगावयाचाच तर त्याला किंचित् मुरड घालावी, त्याला थोडेंबहुत व्यापक रूप द्यावें, क्वचित् त्याचा आरोप दुसऱ्यावर करावा व त्याचा कल्पनाविलास रचावा अशी त्यांची वृत्ति असे. प्रणयिनीवर काव्य लिहावयाचें तर अशरीरिणी प्रेमदेवतेवर त्यांना भागवून घ्यावें लागे. अनेक जुन्या कवींनी काव्यदेवता या

अमूर्त शक्तीशींच प्रणयालाप केले किंवा राधाकृष्ण-प्रेमाच्या रूपान– by proxy–प्रणयक्रीडा केली तर त्याचें मानसशास्त्रीय कारण हेंच असावें.

परंतु अनुभवास मुरड घालणें, आपल्या जीवनाकडे वाचकाची दृष्टि न वळेल अशी खबरदारी घेणें हें वेगळें आणि अनुभव नाहीं, जगाशीं सहानुभूति नाहीं, अर्थात् सहृदयता नाहीं अशा कवींनी पांडित्यप्रदर्शक काव्यरचना करणें हें वेगळें. चंद्रशेखर पंडितकवि नव्हते. त्यांच्या काव्यांतील प्रसाद व जिव्हाळा पांडित्य-साध्य नाहीं. त्यांनीं सृष्टि पाहिली होती. त्यांचें विपुल व विविध असें सृष्टिज्ञान पुस्तकी नव्हतें. गोदेवर हाडामासाच्या व्यक्तीइतकी त्यांची भक्ति होती. एका निर्जीव नदीवर असें जिवंत प्रेम करणें व गुजराथच्या मरुभूमींत पन्नास वर्षें तिचा ध्यास घेणें, हें जिवंत भावनाप्रधान कवीखेरीज कोणास साधणार आहे ? चंद्रशेखरांना फळाफुलांचा अनुभव होता. त्यांच्या गंधरंगांचीं ते तज्ञाप्रमाणें वर्णनें करीत. "कुंज-कूजन" या त्यांच्या काव्यास शेलीचा आधार असला तरी त्यांनीं प्रत्यक्ष त्या अदृश्य पक्षाचा रव ऐकला होता व पक्षी त्यांना वेड लावूं शकला इतके ते संवेदनानुकूल वृत्तीचे होते. मुंबईच्या चाळींत बसून चंद्रशेखरांनीं भारद्वाज, चंडोलांवर काव्यें लिहिलीं नाहींत किंवा अरुणोदय न पहातां त्याचें वर्णन केलें नाहीं. त्यांनीं आपलें वैयक्तिक जीवन काव्यांत स्पष्टपणें व्यक्त केलें नसलें तरी त्यांच्या काव्यांत सृष्टी व मनुष्य यांच्याशीं झालेली त्यांची समरसता क्षणोक्षणीं दृष्टिगोचर होते.

चंद्रशेखरांइतकी कवितेची निस्सीम सेवा क्वचित् कोणी केली

असेल. ते सूर्योपासक होते. सूर्योपासनेइतकीच काव्योपासना त्यांना पवित्र व अगत्याची वाटे. रोजच्या आन्हिकास जसे ते शुचिर्भूत होऊन पवित्र भावनेनें आणि श्रद्धामय अंतःकरणानें बसत, तितक्याच शुचिर्भुत वृत्तींत संध्याकाळीं माडीवर जाऊन ते काव्याराधना करीत. कचेरींतील रुक्ष काम ५।६ तास इमानानें करावें, कदन्न खाऊन दिवस काढावेत, मित्रांच्या सहवासा-संभाषणावांचून वर्षें घालवावींत, प्रेमानंदावांचून जीवन जगावें——याची कल्पना वाचकांनीं मनाशीं करावी व मग चंद्रशेखरांकडे व त्यांच्या काव्याकडे पाहावें. पेटीवर एक दगडी पाटी व पेन्सिल, पाटीवर वळणदार सुंदर तिरपीं अक्षरें व कविराज केवल—समाधींत त्या पेटीभोंवतीं येरझारा घालीत आहेत, असें चित्र डोळ्यासमोर आणावें. वेळेचें भान नाहीं, रात्रीचा फराळ आहे तर आहे नाहीं तर नाहीं, अशा अनेक रात्री जात. चंद्रशेखरांच्या काव्यास दिव्याच्या तेलाचा वास येतो असें म्हणणारांस मी इतकेंच सांगेन कीं तें सार्वेसुधें बाजारी तेल नव्हतें; हृदय पिळून काढलेलें तेल होतें. चंद्रशेखरांनीं जागरणें, कदन्नसेवन, उपास, क्लेश, अवहेलना या स्वतः सोसल्या, पण महाराष्ट्रास मात्र त्यांनीं निर्भेळ आनंद दोन्हीं हातांनीं भरभरून वांटला. हा स्वार्थत्याग आणि हा संयम अपूर्व आहे. दुसऱ्या एका चंद्रशेखराप्रमाणें हलाहल विष स्वतः प्राशून त्यांनीं महाराष्ट्रास गंगापान करविलें.

# १४

# आईचें मरण !

आज आई सर्वांचा निरोप घेत होत्या. वातावरणांत एक प्रकारची प्रसन्नता—उल्हास, एक प्रकारचें गांभीर्य भरून राहिलें होतें. आज आई आम्हाला सोडून जात होत्या. आई स्वस्थ एका जागीं कधींच बसत नसत. कुठेंतरी जात असत, कांहींतरी करीत असत. पण आज मात्र त्यांनीं महाप्रस्थान मांडलें होतें.

बोलून चालून दवाखाना तो. तेथील वातावरण कशा प्रकारचें असणार ? दुखणाइतांचें विव्हळणें, फिनाइलचा वास, चिंतातुर चेहरे, उदास मनें—यांखेरीज तेथें काय दिसणार ? पण गेल्या दोन दिवस आईचें तेथें वास्तव्य होतें. आई मरण्यासाठीं दवाखान्यांत आल्या होत्या, पण त्यांनीं आपल्याबरोबर उत्साह, आनंद, विनोद आणला होता.

तसें म्हटलें तर मरण किती अमंगल, किती उद्वेगजनक ! मरणासमोर माना खालीं जातात, डोळ्यांत आंसवें उभीं राहतात, जगावरचा—जीवनावरचा विश्वास क्षणभर कां होईना नाहींसा होतो, स्मशानांत कां होईना पण वैराग्य येतें. पण आईचें सारेंच आनंदमय. त्यांचें मरणहि मंगलमय, हास्यमय, आनंदमय होतें. दवाखान्यांतील नर्सेस, डॉक्टर, नोकर-चाकर—साऱ्यांच्या चेहऱ्यांवर प्रसन्नता विलसत होती. सर्व श्रद्धाभावानें आईच्या वॉर्डकडे पाहत होते. वातावरण एकप्रकारच्या वीजेनें भारलें होतें. झाडांवर पक्षी मंजुळ

गाणें गात होते. रात्रभर जागलेला वार्डबॉय स्ट्रेचरवर रोग्याला नेतां नेतां कसलें तरी गाणें गुणगुणत होता; व स्ट्रेचरवरील रोगी आपल्या अशक्त हाताच्या दोन लांबट बोटांनीं स्ट्रेचरच्या कडेवर ताल देत होता. आई आपल्या असंख्य मुलांना सोडून चालल्या होत्या !

आईंचें सर्व आयुष्य विनोदांत गेलें. त्या दीर्घ कालांत त्यांना अनेक दुःखें सहन करावीं लागलीं, पतिवियोग सहन करावा लागला, गरिबींत दिवस काढावे लागले. पण आयुष्यभर त्यांचें सारथ्य दोघांनीं केलें. निस्सीम ईश्वरभक्ति आणि विनोद. मीं अनेक विनोदी माणसें पाहिलीं आहेत, पण आईंच्या सारखा आनंददायक, निर्मळ, शुद्ध, प्रेमळ विनोद मीं अजून पाहिला नाहीं. कुणी विनोद म्हणजे विडंबन, उपहास समजतात. कुणी विनोदाचा उपयोग दुसऱ्याच्या वर्मीं घाव घालण्यास व अंतःकरणास घरे पाडण्यासाठीं करितात. विनोद त्यांच्या वाग्युद्धांतील विषारी वायु असतो. कुणी विनोदाचा उपयोग सज्जनांच्या माना शरमेनें खालीं लवविण्याकडे करितात. विनोद हें या मंडळीच्या हातांतील एक शस्त्र असतें, साधन असतें.

विनोद ही आईंची एक ललितकला होती. त्या ती कला कुठें शिकावयाला गेल्या नाहींत. त्यांना ती उपजतच प्राप्त झाली होती. विनोदाचा जन्म विसंगतीमधून होतो असें म्हणतात. आईंचें सर्व आयुष्य विसंगतिपूर्ण होतें. त्यांत विनोदाला भरपूर जागा होती. यामुळें आईंच्या विनोदाला विषय बहुधा त्या स्वतःच असत. विनोदी माणसें दुसऱ्यांचा विनोद करतात. दुसऱ्यांनीं उलट त्यांचा विनोद केल्यास त्यांना तो आवडतोच असें नाहीं. आई दुसऱ्यांस स्वतःचा

विनोद करण्यास संधिच देत नसत. त्या स्वतःच स्वतःचा —स्वतःच्या व्यंगांचा, कुरूपपणाचा, अज्ञानाचा—विनोद करीत !

विनोद आईंची अफू—ईथर होती. त्याच्या साह्यानें त्यांनीं आपल्या कष्टांवर –दुःखांवर मात केली. शेक्सपियरच्या एका नाटकांत जॉन ऑफ् गांट हा मरतांना आपल्या नांवावर कोटी करितो व हास्यरस उत्पन्न करितो. सकृद्दर्शनीं हें चमत्कारिक वाटतें. पण त्यांत असंभवनीय असें कांहीं नाहीं. स्वतःच्या दुःखमय परिस्थितींतील विसंगती—चमत्कृति शोधून काढावयाची व स्वतःच तिला हासायचें ही एक दुःखभार हलका करण्याची युक्ति आहे. जॉननें मरतेवेळीं ही युक्ति उपयोगांत आणली. आमच्या आई जन्मभर तेंच करीत आल्या व शेवटीं स्वतःला हांसत हांसत व लोकांना हांसवीत हांसवीत मरण पावल्या. विनोद आईंची नुसतीच अफू नव्हती. ती त्यांच्या जीवनक्रमाची एक पद्धत ( a way of life ) होती. ती तें त्यांच्या फुरसतीच्या वेळचें करमणुकीचें साधन नव्हतें. जगाशीं झगडतांना, संकटांना टक्कर देतांना, अवहेलना—क्लेश सहन करतांना त्यांनीं टाकलेला तो डाव होता !

आईंना असह्य वेदना होत असतां दवाखान्यांत आणलें. त्यांची स्थिति चिंताजनक होती. ऑपरेशन करणें धोक्याचें होतें. परंतु एक क्षणभरहि विचार न करितां त्यांनीं ऑपरेशनला मान्यता दिली. स्ट्रेचरवरून ऑपरेशनरूमकडे नेतांना बापडी नर्स आईंच्या तोंडावर चादर घालूं लागली. चादर दूर सरकवून आई म्हणाल्या " अग, तूं मला भित्री समजतेस काय ?" आई उघड्या डोळ्यानें हांसत हांसत ऑपरेशनरूममध्यें गेल्या. डॉक्टरनें आधीं स्पायनल इंजेक्शन दिलें.

डॉक्टर आंतड्याचें ऑपरेशन आईच्या डोळ्यांदेखत त्या पूर्ण शुद्धिवर असतांना करीत होता. आई त्या तशा स्थितींत डॉक्टरची थट्टा करीत होत्या. डॉक्टर लष्करी पेशाचा, मेजर हुद्देवाला, गंभीर स्वभावाचा; पण त्याला हंसू आवरेना. ऑपरेशन करावें कीं हंसावें? आणि हा सर्व प्रकार मृत्यु स्ट्रेचरच्या भोंवतीं, डॉक्टरच्या मागें मागें घिरट्या घालीत असतां चालला होता. अखेरीं डॉक्टरनें हार खाल्ली. आईंना क्लोरोफॉर्म दिला व निर्विघ्नपणें ऑपरेशन केलें.

आईंना खोलींत आणलें. दवाखान्यांतल्या रिवाजाप्रमाणें त्यांच्या दोन वेण्या घातल्या होत्या. त्या दाखवून त्या आपल्या लाडक्या नातवंडाला म्हणाल्या, " अरे, बघ कसे लहान पोरीसारखे माझे सोपस्कार चालले आहेत. "

आईंना बघावयास गांव लोटलें. रोग्यास भेटण्यास ठरलेल्या वेळा असतात. माणसेंहि फार येतां कामा नये. पण आईंना सात खून माफ होते. आई जगन्माता होत्या. त्यांच्या मुलांचा परिवार फार मोठा. साठ वर्षांच्या र.ब.बहादुरापासून पांच वर्षांच्या " आजाबाया " म्हणणाऱ्या मांगाच्या पोरांपर्यंत आईंचीं मुलें होतीं. तीं सर्व जातींचीं, सर्व धर्मांचीं असत. त्या सर्वांना आई अरेतुरे म्हणायच्या व कामाला लावायच्या. त्यांची मुलगी त्यांना थट्टेनें म्हणायची, " आई, प्रत्यक्ष पंचम जॉर्ज तुला भेटण्यास आले तर तूं म्हणशील ' अरे बाबा, जरा तें दार लाव अन् पलीकडचा तांब्या आण बरें. '

आईंना भेटण्यास हरिभक्तिपरायण आले, आई म्हणाल्या, " बुआ, बघा कसा आत्मा आणि कुडीचा झगडा चालत आहे. बघूं या कोण जिंकतें तें ! "

कांहीं स्त्रिया भेटण्यास आल्या. आईची कळी परत खुलली. त्या म्हणाल्या, "अग, तुम्ही माझा सत्कार-समारंभ केलात ना ? त्याची लागली मला दृष्ट. थोड्याशा मीठमोहऱ्या ओवाळून टाका माझ्यावरून.'

आपल्याला पहायला आलेल्या मंडळीच्या गर्दीकडे पाहून आईंना विनोद सुचला. त्या नर्सला म्हणाल्या, "अग, बघितलेंस कसे सारेजण मला 'बघायला' येतात. लग्नाच्या आधीं असें कुणीच बघायला आलें नाहीं."

आईंच्या खोलींत प्रायमस स्टोव्ह होता. त्यांनीं तो खोलींतून काढण्यास सांगितलें व त्या ऐवजीं वातीची चूल आणावयास लावली. त्या म्हणाल्या, "या नर्सेस मोठ्या अचपळ असतात. एखादी पदर-बिदर जाळून घेईल."

याप्रमाणें दिवसभर आईनीं सर्वांना हांसविलें, सर्वांची काळजी वाहिली. आल्यागेल्याची पुसपास केली. कोणाला रडायला त्यांनीं फुरसतच दिली नाहीं. सर्वांना हांसविणाऱ्या त्या म्हातारीपुढें रडण्याची कोणाची प्राज्ञा होती ?

रात्र झाली. इष्टमित्र आपापल्या घरीं परतले. जवळचीं एक दोन माणसें आसपास राहिलीं. पण कोणालाहि आई त्या रात्रीं जाणार असें वाटलें नाहीं. आईनीं सर्वांनाच आपल्या विनोदानें फसविलें होतें, त्यांनीं आपल्या सगळ्या मुलांना आपल्या विनोदाची बाळगोळी दिली होती. त्या गोळीच्या नशेंत सारेजण गाढ झोपीं गेले !

बारा वाजून पन्नास मिनिटें झालीं. आईची तयारी झाली. त्या निघाल्या. निघतांना त्या नेहमीं धांदलींत असत, पण फेब्रुवारीच्या तेवीस तारखेच्या त्या मध्यरात्रीं, त्या नितांत शांततेमध्यें, त्या गंभीर एकांतांत

अत्यंत शांतपणें अत्यंत समाधान वृत्तीनें आई निघाल्या होत्या. डोळे मिटले होते. तोंडावर समाधान, तृप्ति विलसत होती. चेहऱ्यावर सूक्ष्म हास्य चमकत होतें. आई "मृत्युच्छायेच्या खिंडींतून" चालल्या होत्या, परंतु मृत्यूचा त्यांच्या चर्येवर कांहींच परिणाम दिसत नव्हता. आई मृत्युंजय होत्या.

आईच्या स्मशानयात्रेंत भजनी मंडळी "जिंकून मरणाला मरणाला, जीव कुडींतून गेला" हें भजन म्हणत म्हणत गेली. खरोखरच आइनीं मरणाला हांसवलें होतें---जिंकलें होतें व विजयी वीराप्रमाणें त्या निजधामास गेल्या होत्या. आईंच्या मरणासारखें प्रसन्न, उज्वल व हास्यमय मरण मीं कधीं पाहिलें नाहीं, पुढें कधीं पाहिन असें वाटत नाहीं.

IRBK-0102406
IRBK-0102406

# स्वस्तिक प्रकाशन

| | | |
|---|---|---|
| वाङ्मयांतील वादस्थळें | प्रो. वा. ल. कुळकर्णी | ४—०—० |
| माझा नाटकी संसार, प्रथम खण्ड | भा. वि. वरेरकर | १-१२-० |
| विचारसौंदर्य | प्रो. वा. म. जोशी | २—८—० |
| अर्वाचीन मराठी वाङ्मयसेवक द्वितीय खण्ड | गं. दे. खानोलकर | ३—०—० |
| सुगम हिंदी व्याकरण | सुळे, नायक | १—०—० |
| हिंदी भाषानु सुगम व्याकरण | ,, | १—०—० |
| प्राथमिक शाळांत मराठी भाषा कशी शिकवावी | प्रो. वा. दा. गोखले | २—८—० |
| नवीन अभ्यासक्रमानुसार प्राथमिक शाळांत पाठ कसे घ्यावे ? | र. मं. कडुलकर | ०—१०—० |